किरकोळ अंकास ........................॰४

नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस........॰१ ०६
दुसरे खेपेस .... ........॰१

Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ........................ 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 3 OCTOBER 1898 NO 39

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख ३ माहे आक्टोबर सन १८९८ इ० अंक ३९

## जाहिरात

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटींवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson ent.

## जाहिरात

### पाहिजे.

एक नऊ इयत्ता पास झालेला मनुष्य जिनिंग फ्याक्टरी मध्यें क्लार्कीचें काम करण्यास पाहिजे आहे. पगार दरमहा १० रुपये मिळेल. काम पसंत पडल्यास १२ महिन्या नंतर १२ रुपये पगार केला जाईल. चांगल्या वर्तणुकी बद्दल दाखला आणिला पाहिजे. कळावें.

मलकापूर. २४।९।९८ { विष्णुसा बाळकृष्णसा साहू.

## जाहीरनामा

ज्या भागांत अगर जिल्ह्यांत प्लेग चालूं आहे त्या भागांतून अकोले, खामगांव, शेगांव येथें येणारे सर्व लोकांनीं दाखल झाल्या पासून १० दिवस पावेतों दररोज एक वेळ आकोले, खामगांव व शेगांव च्यारीटेबल डिस्पेन्सरी मध्यें परिक्षा करून घेण्यासाठीं स्वतः गेलें पाहिजे. कुलीन नेटीव स्त्रियांना मात्र जाण्याचें कारण नाहीं. त्यांनीं आपला पत्ता स्टेशनवर हजर असलेले पोलिसचे हेड कान्स्टेबल याज जवळ द्यावा ह्मणजे एक दाई दाहा दिवस पावेतो. दिवसांतून एक वेळ त्यांचे कडेस परिक्षे करितां जाईल. ज्यांचे जवळ मेहेरबान डाक्टर हापकीन्स साहेब यांच्या पद्धतीनें काढलेल्या प्लेग प्रतिबंधक देवींचें सर्टीफिकेट असेल त्यांनीं कामावर असलेले हेड कान्स्टेबलला दाखवावें ह्मणजे त्यांना हा हुकूम लागू होणार नाहीं.

ज्या भागांत अगर जिल्ह्यांत प्लेग चालूं आहे त्या भागांतून अगर जिल्ह्यांतू येणारे लोकांनां दाखल झाल्या तारखे पासून १० दिवसांचे आंतच जर आकोले, खामगांव आणि शेगांव सोडून जाण्याचें असेल तर त्यांनीं आपल्या जाण्या बद्दलची वर्दी अकोले, खामगांव आणि शेगांव टाऊनचे चीफ कानस्टेबल यांस दिली पाहिजे. या हुकुमाची अमान्यता करणारा कोणी इसम आढळेल तर त्याजवर मुकदमा केला जाईल.

Akola
Date 26/9/98

F. W. A. Prideaux
District Magistrate
and
Deputy Commissioner
Akola District.

### नोटीस

रा० रामलाल नानुराम शेट राहणार मौजे पान्हेर परगणें रोहिणखेड ता० मलकापूर जि० बुलडाणें यांस सावतराम बिर्दीचंद शेट दुकान मौजे पान्हेर ता० मलकापूर याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तारीख ६ माहे मे सन १८९७ इसवी रोजीं तुमची व आमची इस्टेटी संबंधानें फारकत होऊन तुह्मी आपल्या निमे ½ हिश्याच्या इस्टेटी वरील हक्क तीस हजार रुपयास सोडून दिला. व तीस हजार रुपये दरसाल पांच हजार रुपये प्रमाणें घेण्याचे कबूल केलें. त्याप्रमाणें पहिल्यानेंच तुह्माला पांच हजार रुपये दिले. दुसरी सालबंदी माहे मे सन १८९८ इसवीत देण्याची होती. व त्याप्रमाणें कांहीं रुपये तुह्मांस दिले. व बाकी रुपये आह्मी देण्यास तयार आहो. परंतु सर्व स्थावर जंगम मिळकतीचे आह्मी मालक झालो असताना तुह्मी आज पावेतो. आपल्या ताब्यांत असलेली स्थावर जंगम मिळकत आमचे ताब्यांत दिली नाहीं. ह्मणून पान्हेर येथील किराणाची दुकान व जागा व त्याच्या वह्या तसेंच भांडीकुंडी व डागिणे वगैरे आमच्या ताब्यांत दिलें नाहीं. तसेंच पान्हेर दुकानचे मारवाड खात्यांत बरेच रुपये घेणें निघत आहे. त्याचा हिशेब करून तें घेणें तुह्मी दिले नाहीं परंतु तेथील इस्टेट मात्र तुमचे ताब्यांत आहे. मारवाडांत आपण दोघेही गेलो होतो त्यावेळीं तुमचे जवळ हिशेब मागितला असतां दिला नाहीं व त्या शिवाय पुष्कळ वेळा तुमचे जवळ हिशेब मागितला परंतु तुह्मी दिला नाहीं ह्मणून ही नोटीस दिली आहे. तरी एक महिन्याच्या आंत मारवाड खात्याचा हिशेब करून जे घेणें निघेल ते आह्मास द्यावे. व तुमच्या ताब्यांत जो स्थावर जंगम माल आहे. तोंही आमच्या ताब्यांत द्यावा. आणि आपले सालबंदीची रक्कम घेऊन जावी. याप्रमाणें एक महिन्याचे आंत न केल्यास कायद्या प्रमाणें तजवीज केली जाईल. व तुमच्या रकमे संबंधानें आह्मी व्याज वगैरे कोणत्याच प्रकारे आह्मी जबाबदार रहाणार नाहीं व त्या संबंधानें सर्व खर्च तुह्मास द्यावा लागेल. तुह्मी लबाड लोकांचे नादी लागून व्यर्थ तंटा करूं पहात आहा तरी लवकर निकाल करून टाकावा. ह्मणजे दोघास ही फायदेशीर होईल. कळावें. तारीख २९ माहे सपटेंबर सन १८९८ इ०

( सही )
सावतराम बिरदीचंद शेट
दुकान मौजे पान्हेर ता०
मलकापूर दस्तुर
खुद्द.

### नोटीस.

ठमकाई मर्द कालुराम लहरीये राहणार धैसांग तालुके व जिल्हे अकोले. ईस नोटीस देणार पन्नाबाई मर्द मनुसिंग लहरीये राहणार घुसर तालुके व जिल्हे अकोले. इजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं तुझा नवरा कालुराम वलद ज्यानसिंग यानें माझा नवरा मनुसिंग वलद निवनसिंग याजला मौजे धैसांग येथील सर्वे नंबर ३३ सालीम सेता बद्दल रुपये ९५ चे गहाणखत तारीख १७-५-९४ इसवीचे लिहून दिल्हे तो दस्तऐवज मी किसन टिकाराम लहरीये अकोले याजला रुपये ९५ यास खरीदी दिला करितां आतां गाहणाबद्दल रुपये आह्मास न देता मशार निल्हे. कळावे तारीख १९-माहे सपटेंबर सन १८९८ इसवी.

सही.
पन्नाबाई मर्द मनुसिंग लहरीये
निशाणी बांगडी.

## इंग्लंड व इंडिया

बाबू रोमेशचंद्र दत्त सिव्हिल सर्व्हंट, पेनशनर आफिशिएटिंग कमिशनर, ओरिसा हे हल्लीं विलायतेंत इंडियाची दांडगी देशसेवा करीत आहेत. 'इंग्लंड व इंडिया' नांवाचा एक सुंदर ग्रंथ त्यांनीं लिहिला आहे त्यांतील उत्तम उत्तम विचार मराठी वाचकांस कळावे ह्मणून आमचे मित्र 'सारासार विचारी' यांनीं आज त्या ग्रंथाची पहिली प्रस्तावना प्रसिद्धी साठीं पाठविली आहे.

इ. सन १८९७ साल हें जगांतील एकंदर इंग्रजी वसाहतींत फारच आनंदाचें होतें. फक्त हिंदुस्थानांत मात्र हें वर्ष आनंददायक न जातां अतिशय दुःखाचें गेलें. प्लेगचा धुमाकुळ, धरणीकंपाचा तडाखा व आणखीही अशाच कितीएक भयंकर गोष्टींनीं सर्व हिंदुस्थानभर धिंगाणा करून सोडला. हिंदुस्थानांत प्रत्येक २० वर्षांच्या अंतरांनीं फारच विलक्षण तऱ्हेच्या गोष्टी घडून आल्या आहेत. इ. स. १८५७ साला पासून जर पाहिलें तर असें समजून येईल कीं उत्तर हिंदुस्थानांतील कित्येक प्रांतांत मोठा भयंकर दुष्काळ पडला होता. १८७७ सालीं दक्षिण हिंदुस्थानांत फार भयंकर दुष्काळ पडला होता. व १८९७ सालीं तर काय काय गोष्टी घडून आल्या याचें कोणासही अनुमान करतां येणारें आहे. सुवर्णभूमी ह्मणून नांवाजलेल्या या आर्यावर्तांत अशा प्रकारच्या हानिकारक गोष्टी वरचेवर कां घडून येतात हा एक महत्वाचाच प्रश्न आहे. आगगाड्या, तारायंत्रें, कनाल, आणखीही कित्येक उपयुक्त गोष्टींची त्या देशांत चंगळ झाली असूनही अशा गोष्टी घडणें हें वाईट आहे. कंपनी सरकारचा अमल असतांना हिंदुस्थानांत काय काय गोष्टी घडतात याजबद्दल विचारपूस करण्याकरितां पुष्कळ मार्ग होते. परंतु निराकार सरकारच्या ताब्यांत राज्यव्यवस्था गेल्यापासून अशा गोष्टीस अगदींच फांटा मिळाला ह्मणण्यास हरकत नाहीं. अलिकडेच फक्त दुःखाचे पर्वत कोसळलेले पाहून कांहीं कांहीं इंग्रजी लोकांचें लक्ष या गोष्टीकडे जाऊ लागलें आहे. ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

निःपक्षपाताची सुयंत्रित अशी राज्यव्यवस्था असतांना अशा गोष्टी कां घडतात असा प्रश्न मनांत आल्यास कांहीं तरी भयंकर चुका राज्यव्यवस्थेंत होत असाव्यांत असें अनुमान काढणें चुकीचें होणार नाहीं. इतर बारक्या गोष्टीकडे तुर्त लक्ष न देतां मुख्य गोष्टीकडे लक्ष दिलें ह्मणजे समजेल कीं "अवाढव्य खर्च" ही एक मुख्य गोष्ट आहे. पूर्वेकडील भागांत वर्चस्व राखून रशियाशी प्रसंगीं दोन हात करण्यास ताकद असावी अशा करितां गरीब शेतकरी लोकांचे उपासमार काढून राहिलेले पैसे सरकार निरर्थक सरहद्दीवर खर्च करिते ही गोष्ट चांगली नाहीं.

सरजॉन स्टुअर्ट मिल यांचें असें ह्मणणें आहे कीं "By their own hands only can any positive and durable improvement of their circumstances in life be worked out" हिंदुस्थानच्या हिताकरित ह्मणून नेमलेल्या लोकांकडून विलायतेंतील पार्लमेंट सारख्या सभेंत यांच्या गरजा काय आहेत, त्यांनां कशाच्या जरूरी आहेत, त्यांचें ह्मणणें काय आहे इत्यादि गोष्टी बद्दल वादविवाद होण्या पेक्षां त्या लोकानाच स्वतः जर त्यांचें मत प्रसिद्धपणें प्रतिपादन करण्याचा अधिकार असता तर अधिक फायदेशीर होणार आहे. इत्यादि गोष्टीचें मनोवेधक चित्र वाचकाचें डोळ्यापुढें आणण्या करितां हा माझा प्रयत्न आहे. मनरो, एलफिन्सटन, रियन आदि करून श्रेष्ठ लोकांनीं कसकशा लढाया केल्या किंवा काय प्रकारची राज्यव्यवस्था ठेविली होती इत्यां-

पदवीदान समारंभाचे वेळीं हजर असणाऱ्या नूतन पदवीधरांस त्यांच्या त्यांच्या पदव्यांचे झगे समारंभा पुरते घालण्यास फुकट देण्याचा ठराव अलाहाबाद युनिव्हर्सिटीनें केला आहे.

लंडन येथें कँग्रेसची बैठक भरविण्या संबंधानें किंवा तें न साधल्यास विलायतेंत आपले प्रतिनिधी पाठवून राजकीय चळवळ चालूं ठेवण्या संबंधानें मद्रासच्या कॉंग्रेसनें कांहीं तरी तजवीज करावी अशी लखनौ ऍडव्होकेट पत्रानें सूचना केली आहे. या गोष्टीचा विचार करण्या करितां मद्रास स्वागत कमिटीनें ठळक ठळक पुढारी गृहस्थांस राष्ट्रीय सभेच्या बैठकीपूर्वीं कांहीं दिवस तेथें येण्याविषयीं निमंत्रणें पाठवावी अशी एक सूचना लाहोरच्या ट्रिब्यून पत्रानें केली आहे.

कलकत्यास पिनल कोडांतील ५०५ कलमाप्रमाणें एक खटला चालून त्यावर हायकोर्टाकडे अपील झालें आहे. नवीन सुधारलेल्या राजद्रोहाच्या कायद्यापैकीं हें एक कलम आहें. स.

क्रियेविण ज्ञान हें ओझें आहे आणि ज्ञानाविण क्रिया हा उपद्रव आहे.

पर्वत एका जागेवरून उठून दुसरीकडे जाऊन बसला असें कोणी सांगितलें तर तें क्षणभर खरें मान, पण अमक्या माणसाचा स्वभाव अगदी बदलला आहे असें कोणी सांगितलें, तर तें खरें मानूं नको.

दहा माणसें एका ठिकाणीं स्वस्थपणें जेवतील, पण दोन कुत्रीं एका ठिकाणीं नीटपणें खाणार नाहींत. व भांडतील.

चमत्कारिक पुस्तक—अलीकडे असें एक नवें अपूर्व पुस्तक निघालें आहे कीं, या पुस्तकाची एक दोरी खेंचतांच गाई, बैल, कोंबड्या, बदकें, बकरें, मेंढरें, गाढवें इत्यादि प्राण्यांचा आवाज निघतो इतकेंच नव्हे तर आई, बाबा. मामा, काका वगैरे प्रकारचे ही आवाज लहान मुलांच्या स्वरावर निघतात.

गुलाबाचीं पानें पाण्यांत भिजवून ठेवून त्या पाण्याचे गुळणे केल्यानें गळ्यास हितकारक, ह्मणजे सूज वगैरे झालेलीं दुःखें बरीं होतात. गुलाबाचीं सुकीं फुलें जुलाबास फार उपयोगी आहेत.

सनोवर नामक झाडांतून जो रस निघतो, त्या पासून टरपेन टाईन तेल करण्यांत येतें.

शिरोळ रोड क्वारंटाईन क्यांपमध्यें देखील टिळक सुटल्या बद्दल आनंदोत्सव केला. टिळक धन्य आहेत यांत शंका नाहीं. धा. वृ.

महाराणी आणि राजकरः— श्रीमंती महाराणी विक्टोरिया आणि राजपरिवार मंडळीस इन्कमटाक्स द्यावा लागतो.

सामाजिक विरोधः— असें समजतें कीं मिरत येथील धर्म सभा व आर्य समाज यांच्यांत धर्म संबंधी प्रकर्णी हात वाईवर येऊन कार्याांनीं मारामारी झाली. पुढें हा खटला कोर्टापुढें गेला होता. खुशाल लिहून व बोलून झगडत असतां काठ्या चालविण्याची कोणती जरूर होती! आतां असें कळतें कीं हें प्रकर्ण आपसांत मिटलें.

खुनाचा व आत्महत्येचा प्रयत्न— हावरा येथें एका मनुष्यानें एका गृहस्थाची बायको सरकारी परवान्या शिवाय ताडी विकते अशी सरकारांत खबर देऊन तिला पन्नास रुपये दंड करविला. ह्मणून तिचें नवऱ्यानें ह्या बातमीदाराची कोयीतीनें मान अर्धवट कापून टाकिली. आणखी लगेच आपली ही मान अर्धवट तोडून घेतली. ह्या दोघांना तेथें एकाच इस्पितळांत मरणोन्मुख स्थिती ठेविलें आहे. दी०

वेस्ट इंडीस बेटांत जो प्रळय झाला त्यांत सांपडलेल्या लोकांस सामोग्री पुरविण्याकरितां जमेका व हालीफाक्स बेटांतून गलबतें रवाना झालीं. विलायतेस वर्गणीनें पैसा जमविण्याचें कामही सुरू झालें. अगदीं ताज्या सरकारी बातमी वरून समजतें कीं, बारबाडो बेटांत ५०,००० माणसें घरदारांवाचून उघडीं पडलीं असून सेन्ट विन्सेन्ट बेटांत ३१,००० माणसें उघडीं पडलीं.

फिलिपाईन बेटाच्या संबंधाचे अमेरिकेचे विचार कांहीं वेगळेच दिसतात. असें सांगतात कीं, अमेरिका क्युबा बेटांत आपली ५०,००० फौज कायमची ठेवणार, फिलिपाईन बेटांत २०,७०० ठेवणार, व होनोलुलु येथें ४,००० ठेवणार. स्पेन किंवा जर्मनी यांच्याकडून कांहीं हरकत आल्यास ही व्यवस्था आहे असें ह्मणतात.

निझाम रेलवेच्या व्याजास निझाम हमीदार आहेत आणि आतां त्या कंपनीस वेझवाडा रेलवे विकत घेण्यास निझामानें मंजुरी दिली आहे.

राली ब्रदर कंपनीनें कराची म्युनिसिपालिटिजवळ घेतलेल्या जकातीची ९०,०४८ रुपयांची रकम परत मागितली आहे.

येणोर नवे गव्हरनरजनरल मि. कर्झन हे मुंबईस येतील तेव्हां त्यांस मानपत्र वगैरे देण्या करितां मुंबई म्युनिसिपालिटीनें १,००० रूपये पर्यंत खर्च करण्याचा ठराव केला.

पोलिस अक्टाच्या ६१ कलमाचे ल, म व न हे भाग देवगड तालुक्यांतील किंजवडे गांवास लागू केले आणि ज व म हे भाग जुन्नर तालुक्यांतील नारायण गांवास लागू केले.

१६ वर्षांहून कमी वयाच्या मुलांस फटके मारणें ते वेताच्या लहान छडीनें एका आंगास नेऊन मारावे असें सरकारोंन फर्माविलें आहे.

ठाणे जिल्ह्यांतील कित्येक सर्वे नंबर सरकारानें रिझर्व फारेष्ट करण्याचें ठरविलें आहे.

साष्टी तालुक्यांतील कोल्हे कल्याणचा वाकोसा पाडा येथें सरकार काळ्या पलटणी करितां एक इमारत बांधीत असून त्याकरितां लागणारी, लोकांची जागा कायद्याप्रमाणें खालसा करण्याचें ठरविलें आहे.

पोर्टुगीस सरकारानें दाभोळ येथें बसविलेलें क्वारंटाईन उठविलें.

पंजाबांत व कलकत्यास पुन्हा प्लेग केसी होऊं लागल्या आहेत.

बंगलोरास प्लेग सुरू झाला.

जास्त सोनें हें जास्त अडचणीस कारण आहे असें ट्रान्सवाल प्रकरणांत अनुभवास आलें असें आतां इंग्रज लोक ह्मणू लागले आहे.

फ्रेंच लोकांनीं बंदुकीच्या गोळ्या पितळेच्या करण्याचें चालविलें आहे. या पितळेच्या गोळ्या जास्त मजबूत राहून निशाण बरोबर मारतात असें सांगतात.

व्हेसुवियस पाहाडास भयंकर प्रकारचा ऊत येऊन त्यांतून निघत असलेला रस चहूंकडे वाहूं लागला आहे.

अर्जेंटिना व चिली या अमेरिकेंतल्या दोन्ही प्रजासत्ताक राज्यांत बेबनाव होऊन लढाईच्या तयाऱ्या सुरू झाल्या आहेत.

पारीस येथें होणाऱ्या प्रदर्शनाकरितां हिंदुस्थानच्या जंगलांत उत्पन्न होणारे पदार्थ जमा करून तिकडे पाठविण्यासाठीं सुमारें पंचवीस हजार रुपये खर्चण्याची मंजुरी झाली असें सांगतात. हे पदार्थ पारीस प्रदर्शनांत मांडल्याचा हिंदुस्थानास मोबदला काय?

औषध ह्मणून चुकून विष देण्यांत आल्यानें मेक्लीन साहेब याच्या बायकोस ती विधवा असे पर्यंत सालिना १,२०० रुपये व त्याच्या दोघां मुलांस २१ वर्षांचें वय होईपर्यंत प्रत्येकांस ५०० रुपये प्रमाणें पेन्शन देण्याचा व त्यांस विलायतेस जाण्याच्या खर्चाकरितां उक्ते १३०० रुपये देण्याचा, स्टेट सेक्रेटरीनीं ठराव केला.

हिंदुस्थानांतल्या फौजेस डोंगरांतील लढाई कशी करावी याबद्दल शिक्षण देण्याच्या बाबतींत कमांडर इनचीफ यांनीं कांहीं नवे नियम करून प्रसिद्ध केले आहेत.

लष्करी किंवा सिविल खात्यांतल्या सर्व सरकारी आफिसरांनीं ५५ वर्षें पुरीं होतांच पेन्शनर झालेंच पाहिजे, ह्मणजे ५५ व्या वर्षाचा शेवटचा दिवस पेन्शनांत गेला पाहिजे, असें हिंदुस्थानसरकारानें नुकतेच ठरविलें आहे.

दक्षण आफ्रीकेंतल्या कामा करितां ४० शीक शिपायी तिकडे नेण्याचा विचार आहे.

झोब खिंडींत इंग्रज सरकारच्या पाहारेकऱ्यांशीं शिराणी लोकांची एक झटपट झाली व त्यांत एक मेला व एक जखमी झाला आणि त्या डोंगरी लोकांस बिनहत्यारी करण्यांत आलें.

बादशहाचे सुधारणा करण्याच्या कामांतले सल्लागार मारले गेले व सगळ्या राज्याचा कारभार राणीनें आपल्या हातांत घेतला.

सरकारी ठराव प्रसिद्ध झाला व त्यांत बादशहानें राज्यकारभाराचा सर्व अधिकार राणीच्या स्वाधीन केला, असें प्रसिद्ध केलें आहे.

बादशहा मेला व पेकीन शहराचे दरवाजे बंद केले आहेत अशी शांघाई येथें बातमी आहे.

राजसत्ता नष्ट करणाऱ्यांचा चीनांतील बंडावा उत्तर प्रांतांत वाढत जाऊन हुनन पर्यंत येऊन पोंचला व त्याबद्दल चीन सरकारास फार काळजी लागली आहे.

कांडिया येथील मुसलमानांस बिनहत्यारी करून त्यांचीं हत्यारें आमच्या स्वाधीन करा अशी इंग्रज कामदारानें कांडियाच्या मुसलमान गव्हरनरास लेखी नोटीस दिली. ही नोटीस ह्मणजे शेवटची असल्ये. नोटिशीप्रमाणें न केल्यास लढाईस तयार व्हा असा त्याचा अर्थ असतो.

दंग्यांतले प्रमुख ह्मणून आणखी ११ लोक इंग्रजांच्या स्वाधीन केले.

इंग्रजकामदारानें दिलेल्या नोटिशीची भाषा अयोग्य असल्यामुळें त्याचा विचार करण्याकरितां एक मिश्र कमिशन नेमा असें टर्कीसरकारानें इतर बड्या राजांस कळविलें.

इंग्रज अधिकाऱ्याच्या नोटिशीप्रमाणें कांडिया येथील मुसलमानांस बिनहत्यारी करण्याचा सरकारानें हुकूम केला.

इटालीचे एक सरकिलर काढून पुढीलप्रमाणें करण्याची बड्या राजांस सूचना कली आहे:—बड्या सहा राजांनीं एकोपा करून टर्कीच्या सुलतानास कळवावें कीं, क्रीट बेटांतली तुह्मी आपली फौज व तुह्मी आपले कामदार नेमलेल्या मुदतींत काढून घ्यावे, त्याबरोबर सुलतानाचा जो बादशाहीपणा आहे तो कायम राखण्याची व त्या बेटांतल्या मुसलमानांचें संरक्षण करण्याची जबाबदारी आह्मी घेतों. इटालीच्या या सूचनेस जर्मनी व आस्त्रिया कबूल नाहींत. तरी आह्मी सुलतानास मदत करणार नाहीं असें त्यांनीं सांगितलें आहे.

निझामाच्या राज्यांतली माहिती :— राज्याचा विस्तार ८२,६९८ चौरस मैल आहे. लहान मोठी २०,०८८ गावें आहेत. घरें २२,८३७८७ आहेत एकंदर लोकवस्ती १,१५,३७,०४० आहे. त्यांत हिंदुचीच जास्त वस्ती आहे. एकंदर लोकवस्तींत १,०२,१५,२४९ हिंदु आहेत. मुसलमान ११.३८,६६६ खिस्ती. २०,४२९; शीक ४,६३७; जैन २७,८४५; पार्शी १,०५८; व जूं २६ असून इतर २९,१३० आहेत, वस्तीचें प्रमाण दर मैली १४० आहे. या एकंदर राज्यांत मराठी भाषा बोलणारे ३१, ४८,७४६ लोक आहेत.

प्लेग रोग कसा पसरतो याचा हुबळीस एक नुकताच मासला झाला. तेथील एक हिंदु स्त्री जोराचा प्लेग होऊन मेली, त्या वेळीं ती एक नवें लुगडें नेसलेली असून तें जाळून टाकण्याचा हुकूम झाला, व पोलिस शिपायानें आपल्या देखत तें जाळावें असें ठरलें. पोलिसानें तें लुगडें न जाळतां आपण घेतलें व बाजारांत नेऊन विकलें. तो पोलिसशिपायी प्लेग होऊन मेला, आणि तें लुगडें आपल्या बायकोकरतां विकत घेतलें तोही मेला. तें लुगडें नेसलेली त्याची बायकोही मेली आणि त्याच्या घरांतलीं दुसरीं ६ माणसेंही मेलीं ! !

इराणचा राजा दरिअस यास जिंकून त्याच्या मुलीशीं अलेकझांडरानें आपलें लग्न लावलें व त्याबरोबर आपल्या १०० सरदारांनीं एशियांतल्या १०० मुलींशीं लग्नें लावावीं आणि आपल्या १०००० ग्रीक शिपायांनीं एशियांतल्या १०००० मुलींशीं लग्ने लावावीं असा ठराव केला आणि ६० फूट उंचीचा एक मोठा मंडप घालून त्यांत एका घटकेस तीं सर्व लग्नें, हातांत हात घालणें व चुंबन घेणें या विधीनें, पुरीं झालीं; व नंतर ५ दिवस जेवणा खाणाचा फार थाट झाला असें आतां बाहेर आलें आहे. यावरून त्याणें एशियांतल्या लोकांस कशा रीतीनें वागविलें हें दिसतें. अ०

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत, नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल भरर „ „ १ ०८
किरकोळ अंकास ........................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........०१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....०१

Six monthly........ 3 ........
Single copy ................................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 10 OCTOBER 1898 NO 40

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख १० माहे आक्टोबर सन १८९८ इ० अंक ४०

## जाहिरात

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यं रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ — A. G. Watson ent.

---

## जाहिरात

### पाहिजे.

एक नऊ इयत्ता पास झालेला मनुष्य जिनिंग फ्याक्टरी मध्यें क्लार्कीचें काम करण्यास पाहिजे आहे. पगार दरमहा १० रुपये मिळेल. काम पसंत पडल्यास १२ महिन्या नंतर १२ रुपये पगार केला जाईल. चांगल्या वर्तणुकी बद्दल दाखला आणिला पाहिजे. कळावें.

मलकापूर. २४।९।९८ — विष्णुना बाळकृष्णसा साहू.

---

## जाहिरात

सर्वत्र व्यापारी लोकांस कळविण्यांत येत आहे कीं आह्मी कापूस ओटण्याची गिरणी हिंगोलि येथें आणली आहे. ती गणेशवाडी येथें जमसेद बाग आहे त्या बागेमध्यें तयार केली आहे. ही गिरणी दसरा किंवा दीपवाळी पासून सुरू होईल. याज करितां सर्व व्यापारी लोकांना सूचविण्यांत येत आहे कीं त्या बागेंत कापूस आणून जमा करून गंजी लावावी ह्मणजे आह्मी कापूस फार लवकर व फायदेशीर दरानें गिरणींतून ओटून तयार करून देऊं. पाहा किती उत्तम प्रकारची सोय आह्मी व्यापारी लोका करितां केली आहे. कापसाची देखरेख सर्व प्रकारे चांगली ठविली जाईल व्यापारी लोकांना कांहीं तकलीब आह्मी पडूं देणार नाहीं. फार उत्तम प्रकारे माल गिरणीतून तयार करून देत जाऊं. या गिरणीपासून किती फायदा व्यापारी लोकांना झाला आहे व माल एकदम गिरणीतून तयार होऊन व्यापारांत फायदा ही फार होईल. कापूस ओटण्याचें काम फार फायदेवार होऊन बिलकूल तकलीब होणार नाहीं. कळावें तारीख ७ माहे आक्टोबर सन १८९८ इ०

सही

दस्तुर पेस्तनजी ऍंड नवरोजीची कंपनी जिनिंग फ्याक्टरी हिंगोली.

---

## नोटीस

रा. रा. जनार्दन विष्णु माजी ओअर सीअर राहणार आकोला. यांसी

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मयत केशव नारायण नीमकर याचे तालुके आकोल्या पैकी मौजे सोमठाणें येथील सेत तुमच्याकडे देऊन मकत्यानें तोंडी करारानें दरसाल सरकारी सारा वारून ७५ पाउणशें रुपये द्यावे असा करार केला. त्या प्रमाणें नीमकर मयत झाल्यावर त्यांचें कुटुंब अज्ञान पालन करणार बाप रामचंद्र गणेश सितूत यानें रुपये मागितल्यावर तुह्मी दिले नाहींत करितां नोटीस देतों कीं, आजपासून आठ दिवसांत सदर्हू शेता बद्दल मकत्याचे रुपये शेत केल्या पासूनचे आज पर्यंतचे रा० रा० नारायण खंडेराव फडके यांस देऊन पावती घ्यावी. तसें तसें न कराल तर मुदत नोटीशीची भरतांच दावा करून वसूल केले जातील त्या दाव्यास व नोटीशीचे खर्चीस खर्चीस तुह्मी पात्र व्हाल. कळावें तारीख ६ माहे आक्टोबर सन १८९८ इसवी.

( सही )

केशव नागायण निमकर मयत वारस बायको अन्नपुर्णा अज्ञान पालन करणार बाप रामचंद्र गणेश सितुत तर्फे बाळकृष्ण यशवंतराव कारंजा.

---

## नोटीस.

रा० रा० लक्ष्मणराव बावनी भोई राहणार नखेगाव किंवा वसुटाकळी ता० आकोट यांस:--

विनंतीनें कळविण्यांत येते कीं, तुह्माशी माझा गंधर्व लागून दहा वर्षे होऊन गेली. तुह्मी मला वागवीत नाहीं आणि एके ठिकाणीं न राहतां गांवोगांव भटकता. त्यामुळें मी निरुपाय होऊन लोक लज्जेस्तव इतकीं वर्षे मोठ्या कष्टानें लोटलीं मी माहेर घरीं कसे तरी इतके दिवस काढले पण या पुढें माझ्यानें अशा प्रकारानें राहवत नाहीं. माझा संसार व्यर्थ चालला. आजपर्यंत मला तुमच्या नांवावर पोटगी साठीं कर्ज काढून निर्वाह करावा लागला कर्जाची रकम २०० रुपयावर गेली आणि त्यामुळें या पुढें कर्ज मिळत नाहीं. तर तुह्मापाशी माझी विनंती एवढीच कीं मला घेऊन जाऊन माझ्याशी जनरिवाजा प्रमाणें संसार करावा व सावकाराचें देणें देऊन टाकावे. नोटीस पोचल्या तारखे पासून १५ दिवसांत वरील व्यवस्था तुह्मी केली नाहीं तर माझ्याकडे कांहीं बोल राहणार नाहीं. मी दुसरा घरठाव करण्याच्या कामाला लागेल आणि त्या नंतर तुमचा माझेवर नवरेपणाचा हक्क चालणार नाहीं. त्या शिवाय मागील पोटगी बद्दल सरकारांत फिर्याद करून सर्व रक्कम खर्चासह भरून घेतली जाईल. मी दुसरा घरठाव करण्याचा विचार रद्द केला तर तुह्मावर फौजदारीत फिर्याद करून पोटगीची नेमणूक ठरवून घेईन. कळावें, तारीख ७ माहे सप्टेंबर सन १८९८ इसवी.

सही.

रेवणी मर्द लक्ष्मण भोई राहणार मल्हारी वल्लद चिमणा भोई यांचे घरीं, बाळापुर निशाणी बांगडी. ०

---

## ॥ श्रीजयतितराम ॥

### — मंत्र रामायण —

आर्यां बुधि पर तीरा। पावाया मी प्रवर्तलों नीट।
पोहाया न कळे परि अमृतांबुधि ह्मणुनि मज्जनीं धीट ॥

मोरोपंत.

भाग १ ला

पाश्चात्य विद्यामंदिरामध्यें आमच्या पहिल्या पिढींतील पदवीधर विद्वान गृहस्थांचा प्रवेश होण्याबरोबर एक विशेष गोष्ट दृष्टीस पडू लागली ती ही कीं त्यास आपल्या मायदेशामध्यें प्रशंसा करण्या सारखें कांहींच सांपडेना. शिवाजी महाराज, पहिले बाजीराव साहेब पेशवे, महादजी शिंदे, हरीपंत फडके परशुरामभाऊ पटवर्धन, बापु गोखले यांचे सारखे योध्दे; बाळाजी विश्वनाथ, रामचंद्र बाबा शेणवी, नानाफडणवीस या सारखे राज्यकार्य धुरंधर व मुत्सद्दी; शाहू महाराज थोरेल माधवराव पेशवे, अहल्याबाई होळकरीण या सारखीं थोर मनाचीं, उदार बुद्धिचीं, समदृष्टीचीं व पवित्र मनुष्य रत्नें; तानाजी मालसुरे, बाजी परभू, प्रल्हाद निराजी यांच्या सारखे निस्सीम स्वामिभक्त; रामशास्त्री प्रभुणे याच्या सारखे न्यायाधीश; नामदेव, तुकाराम, रामदास प्रभृति असंख्य साधु पुरुष; मोरोपंत. वामन पंडित, अमृतराय, मुक्तेश्वर यांच्या सारखे कविश्रेष्ठ; व्यंकट नरसी सारखे गायनविद्यापटु; बसंत रामा सारखे कारागीर; दयाराम सारखे सावकार; ही सर्व मंडळी कवडीमोल होऊन गेली. फार तर काय परंतु जगद्गुरु शंकराचार्य यांच्या अलौकिक कृतीमध्यें सुद्धां प्रशंसनीय व अनुकरणीय कांहींच दिसेना. वारन हेस्टिंग्स, लार्ड क्लाइव, एल फिनस्टन, सर चार्लस मेट काफ प्रभृति लोकांचे स्तुति पाठ गातां गातां डोक्यावर ठेऊं कीं खांद्यावर ठेऊं असें रा० रा० विनायक कोंडदेव यांस होऊन गेले. वर्डसवर्थ, बायरन्, स्काट, मिल्टन प्रभृती इंग्रजी कवीपुढें आमच्या गीर्वाण भाषेंतील कविवर्यही दिपून गेले तर तेथें आमच्या बिचाऱ्या महाराष्ट्र कवींचा कोठें पाड लागणार? जानस्टुअर्ट मिल्ल, लॉक, क्यांट, सर जॉर्ज ह्यामिल्टन, होबिस, ह्यॉंव, हक्स्ले प्रभृती मंडळीच्या तत्वज्ञानापुढें भारतीय लोकांचा गतकाल अध्यात्म विषयाचा गूढ विचार करण्यांत गेला या गोष्टीचीही त्यांस भुरळ पडली. प्रसिद्ध तत्ववेत्ता हरबर्ट स्पेन्सर याचे भक्त तर सर्वत्रच सांपडतील. असो ही गोष्ट दहावीस वर्षांच्या पूर्वींची झाली. परंतु अगदीं जवळचा काळ घेतला तरी– ह्मणजे जेव्हां महाराष्ट्र भाषेचा, हिंदु धर्माचा, हिंदु तत्व ज्ञानाचा, हिंदु कलाकौशल्याचा, उर्जित काळ यावयास प्रारंभ झाला आहे तेव्हां सुद्धां नुसता इंग्लड देशास पाय लागला असेल नसेल तोंच त्या पुण्यप्रदेश–प्रवासी जनांच्या आचारा विचारामध्यें, सामाजिक मतामध्यें, बुद्धिमध्यें, फार तर उष्णकालोचित पोषाख असतांना त्यांत सुद्धां कोण विलक्षण फरक पडतो हें आह्मास विदर्भवासी जनास तरी निदान परकीय लोकांनीं येऊन शिकवावयास नको. असो, आमच्या पूर्व पुण्याईनें व आघात प्रत्याघात न्यायानें हा काल फिरत चालला आहे यव्हढेंच नव्हे तर ऊर्जितकाळ अदूरवर्ती असण्याचीं शुभ लक्षणें दृष्टीस पडूं लागलीं आहेत ही महान् आनंदाची गोष्ट होय.

असो, आतां आपण प्रस्तुत निबंधाच्या विषयाकडे वळूं. मोरोपंतावरील स्वकीय व परकीय विद्वान गृहस्थांचे अभिप्राय घेऊन त्यांच्या सत्यासत्यतेचा विचार मोरोपंतांचें मंत्र रामायण सूक्ष्म दृष्टीनें पाहून करूं.

प्रथम परकीयानें प्रस्तुत कवीवर कोणत्या प्रकारचा अभिप्राय दिलेला आहे याचा विचार करावया. परंतु याचा मुळींच विचार

करावयास नको. डा० वुईल्सन प्रभृति मिशनरी मंडळींनें आमच्या मराठी कवीवर आपले अभिप्राय वेळोवेळ प्रकट केलेले आहेत. ते अनुकूळ असोत किंवा प्रतिकूळ असोत ते कोणत्या दृष्टीनें आमच्या कवि मंडळाकडे पाहतात ही गोष्ट आतां गुप्त नाहीं. पवित्र शास्त्राचा प्रसार करितां करितां हताश झालेल्या आमच्या हिंदुस्थानवासी पाद्री मंडळीस आमच्या मूर्तिपूजक कविविषयीं कांहीं ही वाटलें व त्यांनीं आपल्या निरर्गल प्रलापाचे कितीही तीक्ष्णतर वाग्बाण सोडिले तरी आमच्या कविकोटाचा बाह्य तट इतका भक्कम आहे कीं त्यांस कधींच भंग व्हावयाचा नाहीं, मराठी इंग्रजी कोशकार मोल्सवर्थ यांचा अभिप्राय त्यांच्या या भाषेवरच्या चिरंतन व्यवसायामुळें किंचित् विचार करण्या सारखा आहे. तथापि या संबंधानें दादोबा पांडुरंगानें आपल्या यशोदा पांडुरंगी नामक केकावलीच्या टिकेच्या प्रस्तावनेंत फारच मार्मिक उक्ति केलेली आहे ती खालीं देतो.

ज्या देशांत व ज्या लोकांत रसभरित ह्मणून काव्यें प्रसिद्ध असतात, त्याच्या गुणांचें यथायोग्य परीक्षण करण्यास, आणि त्यांची रुचि घेण्यास, त्याच देशाचे डोळे आणि जीभ असली पाहिजे. इतर लोकांच्यानें तसें यथान्याय परीक्षण होणें केवळ अशक्य असें माझें ह्मणणें नाहीं; कदाचित् ते विशाल बुद्धिचे परीक्षक असल्यास योग्य परीक्षा करूं शकतील; परंतु त्यांच्या रुचीनें जो तद्देशीय सुज्ञास आनंद होईल त्याच मानाचा आनंद अन्य देशीय विद्वानास होणार नाहीं. याचीं कारणें बहुत व सूक्ष्म आहेत. ज्या लोकांत वंशपरंपरेनें ज्यांचा सहवास असतो, त्यांचा पूर्वापर व्यवहार, रीति, भाति, विद्या, ज्ञान, आचार या सर्व गोष्टींच्या संघट्टनानें त्यांचीं मनें तशींच रंगलेलीं असतात; ह्मणून त्यांच्या काव्यानें जे हर्ष शोकादि विकार त्यांच्या मनावर होतील, तसे विकार अशा संघट्टनाच्या अभावामुळें ज्यांचीं मनें तशीं रंगशीं नसतात, त्यांजवर होणार नाहीं.

वरील अवतरणावरून हें स्पष्ट ध्यानांत आलें असेल कीं अमूर्तिपूजकास आमच्या मराठी काव्याचा आस्वाद कितपत घेता आला असेल याची वानवाच दिसते.

आतां आमच्या इकडील विद्वान गृहस्थांचा या कवीच्या काव्यावर काय अभिप्राय पडतो तो पहावयाचा. या कवीचा ग्रंथसमूह ह्मणजे एक मोठा सागरच आहे व तो तरून जाण्यास पुष्कळ काल व परिश्रम पाहिजेत व ते अद्यापपर्यंत कोणीच केले नाहींत असें दिसतें व ह्मणूनच कोणी कांहीं रामायणें, कोणी कांहीं स्तोत्रें व कोणी कांहीं आख्यानें व उपाख्यानें व कोणी नुसते नवनीतांतर्गत उतारे वाचून अभिप्राय दिलेले असतात. तरीहि ते ज्या ज्या विद्वान पूज्य गृहस्थानें दिलेले आहेत त्यांच्या विद्वत्तेकडे लक्ष दिलें असतां त्यांच्या हातून मोरोपंताचे समग्र ग्रंथवाचन झालें नाहीं या बद्दल विशेष वाईट वाटावयास नको. थोड्या बहुत प्रमाणानें ज्या ज्या विद्वानांनीं आपलीं मतें नमूद केलीं आहेत त्यापैकीं कांहीं खालीं देतों.

मोरोपंत जसा संस्कृत भाषेंत निपुण होता तसा देशभाषेंत ही होता....मोरोपंताची वाणी प्रौढ, शुद्ध, सरळ व स्थल विशेषीं फारच रसाळ आहे. त्याच्या कवितेंत प्रास यमकादिक शद्बालंकार आणि उपमा, रूपक उत्प्रेक्षा इत्यादिक अर्थालंकार फार आहेत.

नवनीत '८८९ पृष्ट २१० रावजी शास्त्री गोडबोले.

याची कविता फार प्रौढ आणि सुरस आहे. ही संस्कृत कवितेच्या बरोबरीची ह्मणण्यास चिंता नाहीं. ह्या कवीनें बहुतेक पुराणावर आर्याबद्ध कविता फार सुरस केली आहे ती लोकांत प्रसिद्ध आहे.

केकादर्श प्रस्तावना परशुरामपंत तात्या गोडबोले.

अनेक विद्यामूल तत्वामध्यें कृष्ण शास्त्री चिपळुणकर यांनीं मोरोपंताच्या कीचकोपाख्यानांतील आर्या श्लेषालंकार व्यक्त करण्यास घेऊन या प्रमाणें चर्चा केली आहे.

ह्या अलंकारापासून चमत्कार वाटण्यास वाक्याचा अर्थ समजावा लागत नाहीं. नुसत्या ऐकण्यानेंच आनंद होतो. ह्यास्तव अज्ञान लोकांत ह्यांची फारच चहा असते. विद्वान् व रसिकजन ह्यांत ह्यांचें तादृश महात्म्य नसतें. ते ह्यास गौण मानितात. तथापि अर्थ दुर्बोध न होतीं सरस राहून जर शद्बालंकार काव्यांत आले तर त्यांही करून त्यास विशेष रमणीयता येते ह्यांत संशय नाहीं.

अनेक विद्या मूलतत्व पृ० २१० कृष्ण शास्त्री चिपळुणकर.

"If the reign of Shivaji was honoured by the appearance of the greatest poet from the common orders of the people &c.

Moles worth's Dict. Notes on the elements. & application of marathi P. XXIII.

शेवटी अलिकडेस पेशवाईत बारामतीकर पांडुरंगराव यांच्या पदरीं मोरोपंत या नांवाचे कारकून होते. त्यांनीं तर आपल्या रसभरीत काव्यानें या भाषेस केवळ संस्कृत भाषेचीच प्रौढी आणली. वामन आणि मोरोपंत यास अनुक्रमें महाराष्ट्र भाषेचे व्यास व श्रीहर्षही ह्मटलें तरी चालेल.

दादोबा पांडुरंग मराठी व्याकरण प्रस्तावना पृष्ठ १८.

माझ्या मनांचा असा दृढ निश्चय आहे कीं मोरोपंताची वाणी मोठी प्रौढ व कारुण्यवीरादि रसांनीं परिप्लुत अशी आहे. त्यांत आणखी रसान्वित यमकें साधण्याची तर हतोटी या कवी प्रमाणें कोणत्याही इतर महाराष्ट्र कवीची आढळत नाहीं. अशीं रसान्वित यमकें साधून ही इतका विपुल ग्रंथ रचणारा महाराष्ट्र भाषेंत हा एकच कवी.

यशोदा पांडुरंगी प्रस्तावना पृष्ठ १७.

( पुढें चालेल. )

## इंग्लंड आणि इंडिआ

( सारासार विचारी कडून )

पत्र नंबर १

महाराणी सरकारांनीं इंग्लंडच्या राज्याचा उपयोग ६० वर्षेंपर्यंत अबाधितपणानें घेतला ही अत्यंत महत्वाची गोष्ट लक्षांत आली ह्मणजे आणि तत्प्रीत्यर्थ झालेल्या अलौकिक Diamond Jubblee नामक उत्सवामुळें झालेला अवर्णनीय आनंद लक्षांत आला ह्मणजे महाराणी सरकारच्या ताब्यांत असलेल्या या हतभागी हिंदुस्थान देशांत तितक्यां मुदतींत राजकीय सामाजिक, धार्मिक इत्यादि गोष्टींत किती व कशा रीतीनें सुधारणा झाली ही गोष्ट लक्षांत आल्या वाचून राहत नाहीं. एखाद्या इतिहासकारा प्रमाणें वरील गोष्टींचें बारीक रीतीनें परीक्षण करण्याचें काम अगोदर हातीं घेतलें आहे. इतिहासकाराप्रमाणें मोठमोठ्या लढायांचें वर्णन किंवा मोठ्या गोष्टींचें वर्णन देऊन उगीच विषय भाकड कथेसारखा न व्हावा, व कंटाळवाणा झाला ह्मणजे त्याजबद्दलची अभिरुची नष्ट न व्हावी हा उद्देश मनांत पूर्णपणें बाळगून सदरहू विषय लिहिण्यास सुरवात केली आह हिंदुस्थानचा इतिहास लिहिणारांनीं बारीक रीतीनें अज्ञय अशा ज्या ज्या गोष्टींचें वर्णन केलेलें नाहीं त्या त्या गोष्टींचें वर्णन इंग्लंडचा इतिहास लक्षांत आणावयास लागणाऱ्या कारणासह वाचकवृंदा पुढें मांडण्यांत आमच्या कडून यत्किंचितही कसूर होणार नाहीं.

इंग्लंडच्या प्रगतीचा इतिहास दिल्या शिवाय हिंदुस्थानचा देतां येणार नाहीं असें जें प्रस्तावनेंत सांगितलें आहे त्या संबंधानें पाहता आमचें मत असें आहे कीं पिटची इंग्लंडांतील कारकीर्द वर्णन केल्या शिवाय हिंदुस्थानांतील लार्ड वेलस्लीची कारकीर्द वर्णन करितां येणार नाहीं कॉबेट, ब्रोहॅम, कॅनिंग, ग्रे इत्यादि पुरुषांनीं इंग्लंडांत ज्या ज्या सुधारणा केल्या त्या सुधारणा तत्वावरच इंडिआंत मनरो, एल्फिन्सटन, बेरिंग इत्यादि पुरुषांनीं केलेल्या सुधारणा कांहीं अंशीं साम्यतेनें जुळून आल्या आहेत ह्मणूनच इंग्लंडांतील सुधारणा वर्णिल्या शिवाय इंडिआंतील वर्णन करणें वाजवी होणार नाहीं. कंपनी सरकारच्या आणि खुद्द मालिका माआझमा व्हिक्टोरिआ राणी सरकारच्या अमलांखालि हिंदुस्थान असतांना या देशांत ज्या ज्या सुधारणा झाल्या आहेत त्या सर्व इंग्लंडच्याच सुधारणा तत्वावर आहेत हें कोणीही विसरतां कामा नये; आणि ज्या ज्या गोष्टींनीं इंग्लंडच्या प्राचीन इतिहास सुबक वठविला आहे. त्याच व तशाच प्रकारच्या गोष्टींनीं इंडिआचा इतिहास ही वठविला आहे. आणि ह्मणूनच इंग्लंडचा इतिहास वर्णिल्या शिवाय इंडिआचा वर्णिता येणार नाहीं असें मागें सांगितला आहे.

इ० स० १७४५ पासून इंग्रजाची सत्ता हिंदुस्थानांत खरोखर रीतीनें वाढूं लागली इतिहासांतील नैपुण्य पूर्णपणें अवगत असणाऱ्या लार्ड मेकालेनें क्लाईव्ह व हेस्टिंगस यांच्या कारकीर्दींचें वर्णन होईल तितकें तिखट मीठ घालून रसभरीत केलें असल्यामुळें त्या गोष्टींचें पुन्हा वर्णन देऊन विषय त्रासदायक होईल व माहीत असणारा विषय पुन्हा कानांवर येणें चांगलें नाहीं सबब तेवढ्या ४० वर्षांचें वर्णन आह्मी तुर्तातुर्त तरी गाळून टाकितों. आणि त्याचें मुख्य कारण असें कीं "It is worthy of his matchless pencil."

[ पुढें चालूं ]

## वऱ्हाडसमाचार

मिती अत्रीक अश्विन वद्य १० शके १८२०

या प्रांताचे सेशन जज्ज मि. लूकस हे ता. १७ रोजीं रजेवर जाणार आहेत आणि ते रजा संपल्या नंतर परत मुंबई इलाख्यांत जाणार आहेत. त्यांचा हेतु या प्रांतांत परत येण्याचा नाहीं. त्यांच्या तीव्र मनोवृत्तीला या प्रांताचा कारभार पसंत पडत नाहीं असें ह्मणतात. या रितीनें वऱ्हाडांत सेशन जज्जाची जागा रिकामी होत आहे. ती जागा भरण्या साठीं कोणाची नेमणूक करावी अशा विषयीं प्रांतिक सरकारला मोठें गूढ पडलें आहे. अलिकडे असा ग्रह झाला आहे कीं सेशन जज्जाच्या जागेला सिव्हील सरव्हंट पाहिजे. हा ग्रह पक्का होत होत हल्लीं सरकारचा आग्रह पडतो कीं सिव्हील सरव्हंटच पाहिजे. वऱ्हाडांत असा कोणी गृहस्थ उपलब्ध नाहीं; ह्मणून आह्मी असें ऐकतों कीं प्रांतिक सरकारानें मुंबई व मद्रास सरकाराकडे मागणी केली होती. विचारपूस होतां होतां मद्रासचे एका साहेबानीं ही जागा पतकरली आहे असें कळतें. आमच्या मतानें सिव्हील सरव्हंटा विषयीं हा दुराग्रह दिसतो. सिव्हील सरव्हिसची परीक्षा ही मनुष्याची लायकी ओळखण्याची एक रीत आहे; परंतु त्या वरून असें सिद्ध होत नाहीं कीं सेशन जज्जाच्या कामाला लागणारी लायकी सिव्हील सरव्हंटा शिवाय इतरांच्या अंगीं नसतेच नसते. आमच्या प्रस्तुतच्या विद्यमान अधिकारी मंडळींत सेशन जज्जाचें काम फार नामी करितील असे कित्येकजण खात्रीनें दाखवितां येतील. हल्लींची मुसमुसलेले तरुण अधिकारी सेशनच्या कामाला लायक ठरणार नाहींत इतकेंच नाहीं तर कांहीं कांहीं गृहस्थ सध्यांच्या अधिकाराला पात्र आहेत असेंही आह्मांस वाटत नाहीं. नामनिर्देश करण्याचा हा प्रसंग नाहीं आणि तसें करण्यापासून फायदा न होतां तोटा होण्याचा संभव आहे, परंतु चांगली अनुभवशीर, कामाला कसलेली आणि प्रांताविषयीं वाकबगार अशी मंडळी सांगता येतील; ह्यांत युरोपियन आहेत व नेटिव ही आहेत. त्यांची सेशन जज्जाच्या जागीं कां नेमणूक होऊं नये हें आह्मास खरोखरच समजत नाहीं. अशा हट्टवादी गोष्टीला सरकारची मर्जी हाच एक आधार आहे.| पंडित

सुरज नारायण असि० कमिशनर हे किती नामी सेशन जज्ज होतील हें वऱ्हाडांतील लोकांस निदान सांगण्याचें प्रयोजन नाहीं तसेंच मि० प्रीडो साहेब या जागेला फार उपयोगी पडतील. त्यांची दांडगी व कष्टी मेहनत व फौजदारी कामांतली निपूणता आमच्या जिल्ह्यांत सर्वांस ठाऊक आहे. तसेंच मि. रुस्तुमजी डिपुटी कमिशनर यांचाही लौकिक या कामाच्या योग्यते विषयीं चांगली खात्री देतो असे अधिकारी वगळून मद्रासेकडे उड्डाण मारण्यांत आमच्या स्थानिक सरकाराला काय भूषण वाटलें असेल तें त्यांसच ठाऊक!

खर्च कमी करण्यासाठीं सरकार टाहो फोडीत आहे आणि विद्याखात्यावर सरकारनें आपली काटकसर व छाटाछाटी अनिष्ट प्रकारानें चालविली आहे अशा वेळीं सेशन जज्जाची जागा भरतांना सरकारनें योग्य विचार केला पाहिजे होता. सरकारचें तारूं जिकडे कलेल तिकडे कलेल; त्याला डोलकाठीची मजबुती कमी मिळाल्या मुळें वारा जसा वाहील तसें तें चालतें. सिव्हील सरव्हंटाचें वेड सोडून देऊन सरकारनें आपली दृष्टी वकीलवर्गाकडे फेकली तरी देखील त्यांस चांगले चांगले चार पांच गृहस्थ सेशन जज्ज होण्याला योग्य असे आढळतील आणि वकील-मंडळींतून निवड केली तर लोकांचा फायदा होऊन सरकारला देखील गुणग्रहणाचें श्रेय लागेल व खर्चाच्या दृष्टीनेंही बरीच काटकसर होईल. ही कल्पना सुद्धां आमच्या प्रांतांत खपणार नाहीं आणि मग कृतीचा अभाव तर साहजिकच कायम राहील.

विद्वान कायदे-पंडिताचा अभिप्राय असा आहे कीं न्यायाधीश वकिलीच्या कामांत चांगला वापरलेला व लौकिकाला चढलेला असावा. न्यायाच्या कामाला असाच अधिकारी पाहिजे असा पक्का समज असल्यामुळें मुंबई हाय कोर्टाची चीफ जस्टिसची जागा देतांना या तत्वाची अमलबजी करीत असतात हा नियम कोठें लिहिलेला नाहीं पण तो तसा आहे असें सर्वत्र मानतात. नामदार पारसन सारख्या अप्रतिम न्यायाधीशांस चीफ जस्टिस नेमतांना हाच नियम आडवा येत आहे. असा वास्तविक प्रकार असतांना वऱ्हाड सरकारला मुंबईच्या किंवा मद्रासच्या नवशिक्या सिव्हील सरव्हंटाची मोठी हौस वाटावी हें आमचें दुर्भाग्य होय.

आमच्या प्रांतांतील न्यायाधीश नेमण्याची रीत अगदीं वाईट आहे. प्रथम एखाद्याची नेमणूक करितात आणि नंतर तो कायदा शिकायाला सुरुवात करितो कायद्याच्या ज्ञानांत युरोपियन व नेटिव अधिकारी सारखेच कच्चे असतात; किंबहुना साहेब लोक तर आपल्या ऐटीवर कायदा चालवितात असा अनुभव आहे. अशा वर्णनाच्या अधिकारीं वर्गावर देखरेख कडक ठेवण्या सारखा एखादा चांगला प्रसिद्ध कायदे-पंडित बाहेरून आणावा किंवा तो मान प्रांतस्थ विद्वानास द्यावा असें आमचें मत आहे वऱ्हाडांत नांवाजलेले वकील रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी, प्रल्हाद नारायण जोग, गणेश श्रीकृष्ण खापर्डे, रंगनाथ नरसिंह मुधोळकर, किंवा दत्तात्रय विष्णु भागवत हे सर्वोत्कृष्ट सेशन जज्ज होतील असें आह्मी सरकारास निश्चयपूर्वक कळवितों. स्वकीय मत सांगण्याचा अधिकार आमचा आहे तथापि तें न ऐकण्याचा सरकारचा आहे हेंही आह्मी पक्कें जाणून आहों.

The Berar Samachar

MONDAY, OCTOBER 10 1898

Mr. J. M. Tata is a well—known millionaire of Bombay. His recent donation is monumental to his phi—lanthropy. He becomes a *national* benefactor when he invests a munificent fuud of Rs. 30,00,000 in trust for the cause of education. He proposes to open a new leaf in the history of education. His post-graduate school will take up education where the university curriculum leaves it. The new institution will further the prospects of original research and development of sciences and arts. It is an indisputed fact that the Indian intellect is on a par with the excellent intellect of the western nations. The great and noble work of education which Mr. Tata will initiate is certainly a task of royal potronage The British government is not so liberal as it ought to have been. On the other hand, the Government proves to be the worst type of a miser. Epucation is becoming stagnant and useless when its progress is arrested and checked for want of funds. On frontier wars, the annexation of the Burmah provinces and similar works of building an Asiatic empire the government is a spend—thrift. Money is wasted like any thing in other directions whereas education is nipped in the bud for want of money. At such a critical time when there is a real clamour for technical and industrial education and when the demand for original researches and higher technical education is most pressing private philanthropy accomplishes a higher programme of education and calls upon the gouernment to do its duty towards the people. It is a matter of extremes pleasure and the whole nation is filled with joy. It is worth our while to remember that words of wisdom are never lost for nothing. They leave an impression and the people will associate with pride the name of Lord Reay with the new post—graduate-school because it was he who inspired this high ideal of a teaching university at his memorable convocation address at Bombay. The post—graduate school will be a complement to the Bombay—University and will ensure the progressive development of the Indian intellect. We wish a full measure of success to the excellent proposal of Mr. J. M. Tata.

The Times of India has published the 2nd. article in the series of 'An Indian view' on the currency problem of the day. The writer is Mr. G. S. Iyer of Madras. The vigorous style and the sound and convincing logic of the articles are the most welcome attractions even for a casual reader. Mr. Iyer says that the mints should be open to free coinage and the additional deficit of 12 crores will be reconfied in other ways different from those of the Government. The reduction of the home—charges, the revision of high salaries, the due apportionment of the charges of empire—building in Asia between England and India and the employment of the Native agency over and above the minimum of the European element nessary to maintain the British rule are in fact the remedies which he propounds with a great force of arguments and justice. We quote below his learned and eloquent observation in which he tries to show that India should at least be cared for as the quint—essence of the British empire. He writes thus in a plain style:—

" Well, then, if the possession of India is so important for the commerce of the United Kingdom, for the livelihood of hundreds and thousands of her people, for her prestige and influence in the world, and, I may add, for her very existence as a great Power, is she not bound to pay a portion at least of the cost of that possession? The possession is secured not by the Army only, but by the costly European agency employed to control and direct the civil administration. The cost of this whole European agency—the military as well as the civil European agency—is now entirely borne by the Indian tax-payers. This alien agency is kept in India avowedly with the view of maintaining British supremacy. In reply to the representations of the Indian people that their claim for employment in the higher branches of the services is persistently ignored, British statesmen have repeatedly said that a certain minimum would be indispensable in order to maintain British rule in India. I would therefore say, as I said in my evidence before the Welby Commission, that England should pay for all that portion of the military charges which are incurred, not for the purpose of main—taining peace and order within the boundaries of India, but for the purpose of upholding her supremacy in Asia and indirectly in the world. She should also pay a moiety of the charges in—curred for the salaries of European em—ployes in the Military and Civil services. All charges incurred, since the time of and including the second Afghan War, on the North—West Frontier, should be equally divided between the two countries. The entire cost of the conquest and subsequent administration of Upper Burmah should be refunded to India. Whenever any Indian troops are sent outside of Indian frontiers at the instance of the British Government, the whole cost should be borne by the British Exchequer. The frontiers of India should be defined by statute and they should not be extended at the expense of her tax—payers. Whenever any difference may arise between the Government of India and Her Majesty's Government regarding the apportionment of charges, the decision should be vested in the Judicial Committee of the Privy Council, which is a tribunal already in existence, and which would obviate the necessity of finding arbitrators in whom both thl parties would have confidence. The Judicial Committee of the Privy Counci is well-known in India, and commands universal confidence as an impartial and unbiassed tribunal. "

## वऱ्हाड

हवामान—- उन्हाचा ताप फार वाटतो. वर्षाकाल संपून ऋतुमान बदललें आहे. थंडी पडूं लागली यंदा पाण्याची मोठी तूट पडेल. किरकोळ पडसें, खोंकला, वगैरे दुखणीं बळावलीं आहेत.

मे० प्रीडो साहेब डेपुटी कमिशनर यांची बदली या जिल्ह्यांतून वणी जिल्ह्याला होत असून अकोल्यास मे० रुस्तुमजी फर्दूनजी डेपुटी कमिशनर यांस बदलल्या प्रमाणें ते दीड महिन्या नंतर येथें येऊन दाखल होतील.

मे० राबर्ट ग्याल्लोवे हे आजारपणांतून साधारणपणें बरे झाल्या, बरोबर तीन महिन्यांच्या रजेवर विलायतेस गेले.

रा० रा० सखाराम आत्माराम अधिकारी ट्रांसलेटर, रेसिडेन्सी, यांच्या एक महिन्याच्या रजेंत रा. रा. बळवंत राजाराम कावळे क्लार्क आफ कोर्ट निसबत जुडिशियल कमिशनर यांस हैदराबादेस बदलीवर पाठविलें; आणि त्यांच्या जागीं सेशन कोर्टाचे डेपुटी क्लार्क रा० रा० बळवंत यादव खोलकुटे बी. ए. यांस नेमण्यांत आलें.

मे० इलियट, जुडिशियल कमिशनर, यांची स्वारी येथील कचेऱ्यांच्या वार्षिक तपासणीसाठीं आज अकोल्यास आली आहे.

रा० रा० त्रिम्बक गणेश परांजपे ए० असि० कमिशनर वाशिम यांस ५०० रुपया पर्यंतचे स्माल काज कोर्टाचे अधिकार देण्यांत आले.

यंदाच्या वकिलीच्या परीक्षेंत खालील गृहस्थ पसार झाले:—

रा० रा०

बाळकृष्ण गोविंद बोबनकर

सुंदरलाल गुलाबचंद अगरवाले

सुंदर नीळकंठ पांडे, हेडमास्तर, बाळापूर

केशव सिताराम भडंग

मि० इ० मार्शेल ए० असि० कमिशनर, खामगांव यांस दोन वर्षांची फर्लो रजा चालू महिन्यापासून मिळाली आणि त्यांच्या जागीं मि० एफ. एल. क्राफर्ड असि० कमिशनर यांस वाशिमाहून बदललें.

मि० हैदर अल्ली जुडिशिअल सुपरिन्टेंडेंट औरंगाबाद यांस स्थानिक सरकारानें माजि० वर्ग १ चे संपूर्ण अधिकार दिले असून अपील कोर्टाचे अधिकार मात्र दिले नाहींत.

मि० डब्ल्यू. जी. जे. पीक ए० असि०, कान्सरव्हेटर यांची मराठींतली परीक्षा चांगली उतरली.

अफूच्या कायद्या अन्वयें केलेले १८७९ सालचे प्रांतिक नियम रद्द करून नवीन नियम अंमलांत आणिले आहेत.

मे० लूकस साहेब सिव्हील आणि सेशन जज्ज हे पुढील सोमवारीं आपले कामाचा चार्ज देऊन दुसरे दिवशीं मुंबईकडे रवाना होतील.

आणि सेशन जज्जचें काम तूर्त ६ आठवडे पर्यंत मि० रुस्तुमजी फर्दूनजी हे पाहतील.

## वर्तमानसार

राष्ट्रीय सभेच्या मंडपास दरसाल ४।५ हजार रुपये खर्च येतो, तो कायमचा वाचावा ह्मणून कापडाचा एक कायम तंबूच करण्याचा विचार यंदा मद्रासच्या लोकांनीं चालविला असून ५००० लोकांचा समावेश होण्यासारखा बडा तंबू करून देण्यास काय किंमत ध्याल ह्मणून कानपूरच्या प्रसिद्ध एल्जिन मिलच्या व्यवस्थापकांस विचारलें आहे व त्यांनीं पहिल्या प्रतीच्या तंबूस सात हजार व दुसऱ्या प्रतीच्यास साडेतीन हजार रुपये पडतील ह्मणून कळविलें आहे. योजना उत्तम आहे यांत संशय नाहीं. क. त.

इंग्रजांची लढाऊ गलबतें चीनाकडे जाऊं लागलीं आहेत.

चीनचा राज्याधिकार आपल्या हातांत घेणारी राणी व रशिया यांच्या दरम्यान तिची राज्यसत्ता कायम राखण्याच्या बाबतीत कांहीं गुप्त करार मदार झाला असावा असें अनुमान आहे.

फाशोडावर इंग्रज व इजिप्त यांचा बावटा लावला. पारीसचा हुकूम आल्यावाचून तेथून हालण्याचें तेथील फ्रेंच कामदारानें नाकारलें. फाशोडा प्रकरणाचा निकाल करण्याकरितां इंग्रज व फ्रेंच यांच्यांत बोलणें चाललें आहे.

टर्कीच्या सुलतानाची फौज क्रीट बेटांतून निघून गेली ह्मणजे तेथील ख्रिस्ती लोकांनीं बिनहत्यारी होण्याचें कबूल केलें.

१९ अक्टोबरच्या आंत तुह्मी आपली फोज क्रीट बेटांतून बाहेर काढा अशी इंग्लंड, फ्रान्स, रशिया व इटली या चौघांनीं टर्कीच्या सुलतानास लेखी नोटिस दिली. सुलतान तसें करणार नाहीं तर ते राजे आपली फौज त्या बेटांत वेगळाल्या ठिकाणीं नेणार आहेत.

क्रीट बेटाच्या व्यवस्थेबद्दलचे आमचें ह्मणणें कबूल करा नाहीं तर जास्त तजवीज केली जाईल अशी बडे चार राजे सुलतानास येत्या आठवड्यांत नोटीस देणार आहेत.

आफ्रिकेंत कोंगो येथें हत्यारी पोलिस हवे असून त्याकरितां हिंदुस्थानांत लोक जमविण्याचा उद्योग चालू झाला आहे.

ठा० अं०

धारवाडची कांहीं आह्लाद घडगत दिसत नाहीं ! मृत्यूचें मान चढत्याप्रमाणावर आहे. सारा गांव तापानें व्यापला आहे. प्रत्येक गल्लींत, प्रत्येक आळींत आणि प्रत्येक पेठेंत ताप आहे. तापाची मजल ट्रेनिंगकालेजापर्यंतही जाऊन पोंचली. उंदीर तर जागजागीं मरत आहेत. घरांत मेलेले आढळतात, मार्केट, मामलेदारकचेरी आणि मिलटरी लाईनमध्यें देखील उंदीर मेलेले मिळाले. तेव्हां आतां धारवाडचा अमुक एक भाग दूषित झाल्याखेरीज राहिला असें कसें ह्मणावें. हुबळीस ताप असा पसरला नव्हता. एकामागून एक भाग तडाक्यांत सांपडत गेला तशी गोष्ट धारवाडची झाली नाहीं. थोड्या वेळांत सारा गांव व्यापून रेलवे क्वार्टरमध्यें देखील तापाचा प्रवेश झाला. लोक पूर्वीच गांव सोडून गेले ते खेड्या पाड्यांत जाऊन राहिले. आतां तिकडेही बंदी झाल्यामुळें वाट फुटेल तिकडे लोक जात असून छप्पर मिळालें तर छप्परांत, न मिळालें तर झाडाखालीं लोक पडून राहिले आहेत. परंतु ते तरी तापापासून सुटले आहेत असें नाहीं. जेथल्या तेथें ताप येऊन मरत आहेत. खाणें ना पिणें औषध ना पाणी ! जागजागीं मुडदे पडून गिधाडांची चैन उडाली आहे. गांवांतील बऱ्याच घरांना कुलूपें लागलीं असून मधून मधून एकादें घर उघडलेलें दृष्टीस पडतें. त्या घरांत तरी काय! एखादे दुसरा मनुष्य रखवालीला ह्मणा, अगर नोकरी निमित्त ह्मणा नाइलाजानें राहिलेला आहे. बाजारांतील बहुतेक दुकानें बंद पडलीं आहेत. न्हावी गेले, परीट गेले, मोलमजुरदार गेले, दिवे लावणीला तर बहुतेक रस्ते बंद असतात, ज्या मोठमोठ्या रस्त्यांतून हरहमेशा गर्दी असावयाची, ते रस्ते देखील मनुष्यें फिरकत नसल्यामुळें रात्रीचे वेळीं भयाण दिसूं लागले आहेत.

सुधा रक

हिंदुस्थानसरकारनें २६००० रुपये खर्चून हिंदुस्थानच्या जंगलांतील उत्पन्नाचे नमुने पॅरिस येथें १९०० सालीं भरणाऱ्या जंगी प्रदर्शनाला पाठविण्याचें ठरविलें आहे.

इटलीच्या व्हेसुव्हिअस ज्वालामुखी पर्वताचा भयंकर रीतीनें स्फोट झालेला असून त्याच्या मुखामधून निखाऱ्यासारख्या तापलेल्या लाल चिखलाचे फवारे सर्व बाजूंनीं लांबवर उडत आहेत.

चाळिसगांवापासून धुळ्यापर्यंत छत्तीस लक्ष रुपये खर्च करून रेलवे बाधण्याची जी. आय. पी. रेलवे कंपनीस स्टेट सेक्रेटरी साहेबांकडून परवानगी मिळाली आहे.

इजिप्तच्या खेदिवानीं टर्कीचे सुलतानला त्याचे भेटीस येण्यासंबंधानें परवानगी मिळावी ह्मणून अत्यंत नम्रतेचें पत्र लिहिल्यावरून सुलतान साहेब फार खुष झाले असून त्यांनीं त्या आपले मांडलिकाला आनंदानें लवकर भेटावयास बोलाविलें आहे.

सरकारी जाहिरनाम्या मार्फत असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे कीं, दिवाळीच्या सणानिमित्य म्याट्रिक्युलेशनची परिक्षा वार्षिक नियमाप्रमाणें येत्या तारीख १४ नवंबर रोजीं न घेतां खालील पांच दिवशीं घेण्यांत येईल:—गुरुवार ता० १० नवंबर व शुक्रवार ता० ११ नवंबर, तसेंच बुधवार, गुरुवार व शुक्रवार, अनुक्रमें ता० १६, १७ आणि १८ नवंबर या प्रमाणें दिवस ठरले आहेत. प्लेगमुळें उमरावतीस ही परीक्षा घेतली जाईल.

मि० यॅंग्बर्ननें ह्मटल्याप्रमाणें खरोखरीच पंजाबमध्यें भारी जनावरें व मनुष्यें मागचे सालाच्या वायव्य सरहद्दीवरचे लढाईच्या कामावर पाठविली होतीं कीं काय, त्या संबंधाचा रिपोर्ट हिंदुस्थान सरकारनें मागविला आहे.

चीनकडील ब्रिटिश व्यापाराच्या स्थितीची चौकशी करण्याला जे लार्ड चार्लस बेरेस्फर्ड तिकडे चालले आहेत ते सिलोनहून पलीकडे गेले असून त्यांच्या बरोबर १२० ब्रिटिश सेलर्सहि वे–है–वे येथें जात आहेत. ब्रिटिश व्यापाराची स्थिति पाहून येण्याशिवाय दुसऱ्याही कित्येक महत्वाचे राजकीय प्रश्नाची चौकशी करून येण्याचें काम त्यांना ब्रिटिश सरकारनें सांगितल्याचेंही बाहेर आलें आहे.

शु० सू०

मुलें शहाणीं व नीतिसंपन्न करण्याची युक्ती मनुष्यास जेव्हां गाढ झोंप लागते तेव्हां त्यास जर एखादी सूचना केली तर ती ग्रहण करण्याची त्याच्या अंगीं विशेष प्रकारची शक्ती असते. मुलें झोंपीं गेलीं असतां तुह्मी आपली वर्तणूक सुधारली पाहिजे असा त्यांस बोध करून आळशी व दांडगी मुलें ह्यांच्या आयांनीं उद्योगी व आज्ञाधारक केलीं आहेत, जसें डा० सिडन फ्लाउर यांचें म्हणणें आहे. मूलें निजण्याच्या पूर्वी आई त्यांस असें कळवून ठेविते कीं, आज मी तुह्मास कांहीं सांगणार आहे. पुढें मूलें झोंपीं गेल्यावर ती त्याच्या अंथरुणावर बसून ती त्याच्या कपाळावर टिचक्या मारते व मग मुलास सौम्यपणें असें सांगतें कीं, तूं जागें होऊं नकोस, मी काय सांगतें तें एक व उत्तर दे. जर मुलानें हालचाल केली किंवा डोळे उघडिले तर ती त्याला पुनः थोपटून निजविते. नाहीं तर ती असें त्यांस सांगूं लागते कीं, मुला तूं आळशी, लबाड, अथवा दुष्ट होण्याची इच्छा धरूं नकोस, अशा प्रकारचा बोध करून मी तुझ्या ह्मणण्याप्रमाणें करीन असें वचन त्याजकडून ती काढून घेते. दुसरे डा० असें सांगतात कीं, रोग किंवा वाईट संवयी घालवावयास ही गोष्ट फार उपयोगी पडते. मनुष्याला झोंप लागली असतां त्याच्या बुद्धिशक्तीस उपदेश करून जो करार करून घ्यावयाचा तो चांगला सिद्धीस जाण्यास ठीं सज्ञानाची जागृतावस्थेंतील मनःस्थिरतेची अवश्यकता असते. जी गोष्ट जागृतावस्थेंत हरकत घेण्याजोगी असते तिजसंबंधानें निद्रितावस्थेंत ही अग्रहणीयता राहते. ज्या मद्यप्याची इच्छा मद्यपान निषेधाकडे आहे त्यास या मार्गानें ताळ्यावर आणतां येते.

डा अ.

अमेरिकन सरकाराकडून क्युबा बेटांत पन्नास हजार, फिलिपाइन्स बेटांत वीस हजार, पोर्टोरिकोंत चवदा हजार, आणि हानोलुलुंत चार हजार याप्रमाणें सैन्य ठेवण्यात येणार आहे. स्पेन किंवा जर्मनी यांस मनिला येथें कोणत्याही प्रकारची कारस्थानें करितां येऊं नयेत ह्मणून अमेरिका आतां पासूनच फार सावधगिरीनें वागत आहे. अमेरिकेस हीं जीं नवीन ठिकाणें मिळालीं त्यांच्या योगानें अमेरिकन्सची भूतृष्णा वाढत जाऊन तो देश आतां हळहळ प्राच्यांचा नायनाठ करण्याच्या कामांत युरोपियन राष्ट्रांचें अनुकरण करावयास लागल्याशिवाय रहावयाचा नाहीं.

ना०

हैद्राबादचे दिवाणः—हल्लींचे दिवाण लौकरच राजीनामा देणार व त्यांचे जागीं दुसरे कोणी नेमले जातील अशी दाट वदंता आहे. पिढीजात दिवाण सालरजंग यांच्या अल्पवयस्क नातवास दिवाणीचीं वस्त्रें देऊन राज्यकारभार पाहण्यासाठीं एक कौन्सिल नेमणार व त्याचे अध्यक्ष स्वतः निजाम साहेब होणार अशी भुमका पसरली आहे. हल्लींचे दिवाण आपल्या यजमानाचे हितशत्रु असा आरोप उघड उघड व वर्तमानपत्रांतून होत आहे. कोणा हिंदुगृहस्थाची दिवाणाच्या जागीं नेमणूक होईल असेंही एक वर्तमान उठलें आहे.

याचा अर्थ काय? निजाम सरकारांनीं नवीन "कानूचा" ठराव काढून दिवाणाच्या अधिकारांची मर्यादा ठरविली. पण या ठरावाविषयीं दोन मतें आहेत. दिवाणपक्षी मंडळी ह्मणते दिवाणाचे अधिकार वाढविण्यांत आले. इतर मंडळीची समजूत अधिकार कमी व आकुंचित केले. खरें कोणास कळावें ?

वाशिंब स्टेशनावर नुकतीच एक चमत्कारिक गोष्ट घडल्याचें कळतें. ती अशीः–

तेथील स्टेशनमास्तराची बायको दुपारीं ४ वाजण्याचे सुमारास रानांत शौचास गेली असतां बराच वेळ झाला तरी परत आली नाहीं, ह्मणून मंडळी शोध करूं लागली. तों दूरच्या एका पडक्या विहिरींतून मनुष्याच्या कण्हण्याचा आवाज ऐकूं आला. पण ती विहीर काटेरी झुडपांनीं आच्छादेत असल्यामुळें आंत कांहींच दिसेना. अखेर आंत कांहीं मनुष्यें महत्प्रयासानें उतरवून कांहीं झुडपें तोडलीं तेव्हां ती बाई विहिरीच्या मध्यावर एका काटेरी झुडपाला गच्च धरून लोंबकळत असलेली दिसली. तिच्या अंगभर कांटे बोचलेले होते; परंतु बाहेर काढून पाहिलें तों अंगाला कांहींच इजा नाहीं ! तेव्हांपासून ती बाई वेडी झाली आहे. बाई पोक्त असून ३।४ मुलें झालेली आहे.

१८९३ सालापासून टांकसाळांतून सोनें घेतल्यावाचून रुपये पाडून द्यावयाचे नाहींत असें ठरविण्यांत आलें असून त्याप्रमाणें गेल्या वर्षी मुंबईच्या टांकसाळेंत ७॥ लाखांचे व कलकत्त्याच्या टांकसाळेंत १९॥ लाखांचें सोनें आलें.

२७० शिपायी, २ हस्पिटल असिस्टण व १६ फालोवर्स इतके लष्करी लोक आफ्रिकेंतल्या कामाकरितां मुंबईहून जाणार आहेत.

निजामाच्या राज्यांतले मझलुमी डेकन नांवाचें जें पत्र त्या सरकारानें बंद केलें तें आतां फ्रेंच हद्दींत पांदेचरी येथें प्रसिद्ध होऊं लागलें असून तेथून निझामाचे रेसिडेन्ट व दिवाण यांच्यावर हल्ला करीत आहे. त्यास बंद करा अशी फ्रेंच सरकारास विनंती करण्यांत आली आहे.

नुकतेच मरण पावलेले सरदार दयाळसिंह यांणीं आपल्या मृत्युपत्रांत लाहोर येथें एक कालेज स्थापन करण्याकरतां आठ लाख रुपये काढून ठेवले आहेत. त्या कालेजांत शिख व गुर्खा या जातींच्या विद्यार्थ्यांस फुकट शिकवावें आणि हिंदु व मुसलमान यांच्यापासून पाहिजे तर फी घ्यावी असें ठरविलें आहे.

हिंदुस्थानांतले १०,००० बिगारी उगंडा रेलवेच्या कामावर मजुरी करीत आहेत ! सोन्यासारख्या हिंदुस्थानांत त्यांस पोटास मिळत नाहींसें झालें ना ! !

हिंदुस्थानचा काश्मीराबरोबरचा व्यापार वाढत असून काश्मीरसरकारची जकात जरी फार भारी आहे तरी काश्मीरचा माल बाहेर जाण्याचें प्रमाणही वाढतच आहे.

प्लेग व्यवस्थेच्या संबंधाने केलेल्या नियमांत सरकारानें आतां कांहीं बदल केले आहेत. या संबंधानें खानगी दवाखाने वैद्य व हकीम यांच्या देखरेखीखालीं ठेवण्यास हरकत नाहीं असें ठरलें आहे. प्लेग झालेल्या मनुष्यास इंग्रजी डाक्टरानेंच औषधोपचार केला पाहिजे किंवा इंग्रजी औषधच दिलें पाहिजे असें नाहीं असें ठरलें. मेलेला माणूस कशानें मेला याची खात्री करून घेण्या करितां प्रेताची तपासणी करण्यास जर हरकत झाली तर त्याबद्दल सक्ती न करतां तो मृत्यु प्लेगच्या यादींत घालावा असें ठरलें. टोंचलेल्या माणसांस सेग्रेगेड करूं नये व प्रवासांत त्याचे कपडे धुण्यापलीकडे त्यांस कांहीं करूं नये असें ठरलें.

---

☛ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTER N

किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस......... ८१ ०६

दुसरे खेपेस .... .... ....८१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Single copy ..............................4 as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......4 as

Repetition Per line...3 as

VOL XXXII | AKOLA MONDAY 17 OCTOBER 1898 | NO 41

वर्ष ३२ | आकोला सोमवार तारीख १७ माहे आकटोबर सन १८९८ इ० | अंक ४१

## जाहिरात

मुंबई बँकची ठव ठेवण्याची

बक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षात ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यं रुपये ठेविले जातील

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षात एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १५ जुले
१८९८

A. G. Watson
ent.

## जाहिरात

नादारी मुकदमा नंबर ४

१८९८

नमुना ( जी )

विद्यमान त्रिंबक गणेश परांजपे नादारी कोर्टाचे ज्यडज्य जिल्हे वासीम.

सर्व लोकांस नोटीस देण्यांत येते कीं सदासुक सरदारमल मारवाडी राहणार चिचांबेपेन प्रगणें रीसोड तालुके वासीम हा नादारी आहे असा आज तारीख २६ माहे सपटेंबर सन सन १८९८ इसवी रोजीं ठराव झाला आहे आणि तारीख ५ माहे नवेंबर सन १८९८ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फेचा आसाईनीं नेमून देण्याकरितां व नादारानें आपले सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीसींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्याजबद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमुद करावीं ही नोटीस जमण्याकरीतां नेमलेल्या तारीखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यात नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांणीं आठ आण्याच्या स्टांपकागदांवर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतीज्ञालेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांणीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एकाद्या जुडिसियल अफीसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपला कडुन कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजीष्टरी दाखल होतील. तारीख ६ माहे अक्टोबर सन १८९८ इसवी.

T. G. Paranjape
नादारी कोर्टाचे ज्ज्ज.

## ॥ श्रीजयतितराम ॥

### — मंत्र रामायण नं. २

मोरोपंताच्या काव्यावर जीं अनुकूल व प्रतिकूल मतें प्रतिपादन केलेलीं आहेत त्यांचा समावेश झाला. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचा या कवींवर प्रतिकूल कटाक्ष होता परंतु तो कोणत्या मुद्यावर होता हें जाणण्यास मार्ग नाहीं. एकंदर सर्व मराठी कवींवर व विशेषतः मोरोपंतावर थोडक्या प्रमाणानें परंतु विशेष ठासून असें मत दिलेलें मात्र मुंबई एज्युक्याशनल रेकार्डमध्यें आढळतें. इ० स० १८६६ या वर्षी परमपूज्य न्यायपूर्ती राव बहादूर महादेव गोविंद रानडे यांनीं मराठी रिपोर्टर या नात्यानें परशुरामपंत तात्या गोडबोले यांच्या केकादर्शावर दिलेला अभिप्राय जितका विचार करण्यासारखा आहे त्यापेक्षांही किंबहुना जास्त निव्वळ शब्दजालानें मनुष्यास मोह उत्पन्न करणारा आहे. डा० वुइलसन प्रभृती मिशनरी मंडळीचे, मोलस्वर्थ क्यांडी प्रभृती कोशकारांचे, विविधज्ञानविस्तार प्रभृती मासिक पुस्तकांचे व नामदार न्यायमूर्ति साहेबांचे अभिप्राय कितपत सत्यास धरून आहेत याचें यथातथ्य व विस्तृत विवेचन कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं आपल्या निबंधमालेंत फारच चांगलें केलें आहे. मोरोपंताच्या गुण दोष विषयीं साधारणतः त्यांनीं केलेलें विवेचनच ग्राह्य होईल असें वाटतें. स्वतः न्यायमूर्तींसही आपण त्यावेळेस दिलेलें मत बरेंच चुकीचें आहे असें वाटावयास लागलें असावें असें सुद्धां अनुमान करण्यास पुष्कळ सबळ पुरावा आहे. या वर्षाच्या आरंभीं आरंभीं रामदास स्वामीच्या पुण्य तिथीच्या दिवशीं शेणव्याचे ठाकुर द्वारीं रामदास स्वामीस ‘ समर्थ ’ कां ह्मणतात या वरचे रावबहादुर यांचें व्याख्यान व एकनाथानें नवीनच धर्मपंथ सुरू केला अशा अर्थाचें एकनाथाच्या पुण्यतिथीच्या दिवशीं त्यांनींच दिलेलें दुसरें व्याख्यान हीं दोन व्याख्यानें त्यांच्या मतांतराचीं द्योतक होत. राव बहादुरासारख्या सूक्ष्मपर्यालोचनपटु विद्वानानें सुमारें २८ वर्षांपूर्वीं मोरोपंतावर असला वाणेरडा अभिप्राय प्रकट करावा याचें थोडें आश्चर्य वाटतें असो.

मोरोपंत कवि या संज्ञेस पात्र होता किंवा नाहीं; याच्या काव्यांत सहृदयांतःकरणाच्या मनुष्यास ग्राह्य असें कवित्व वसतें आहे किंवा नाहीं; यमकें व प्रासानुप्रास इत्यादि चित्र काव्याच्या आश्रयानें त्याच्या काव्यास खरोखरच हीनपणा आलेला आहे कीं काय; भिन्न भाव व्याप्त अंतरंगाचा चित्रपट ह्मास कितपत रेखिता आला; व्याकरण शुद्धीनें व नूतन संस्कृत शद्बाची भेसळ केल्यानें नवीन विचारास व नवीन कल्पनातरंगास, व नवीन चित्त संस्कारास लोकांच्या मनावर हुबेहुब वठण्यास किती अवकाश सापडला व त्यामुळें मराठी भाषेस किती जोम आला इत्यादि गोष्टींचा विचार निबंधमालाकारांनीं आपल्या जोरदार भाषेनें इतका सुरेख केला आहे कीं प्रत्येक मराठी वाचणारांनीं तो अवश्यमेव एकदा तरी निदान वाचावा.

पुराणांचा थोडा फार आधार घेऊन अध्यात्मक विषयावर वाहवत जाणाऱ्या उच्छृंखल मराठी कवितेस दरबारी थाटमाटाचें व संस्कृत शद्बांचें उत्कृष्ठ मिश्रण करून मराठी भाषेस जें प्रौढपणाचें रूप आलें तें मोरोपंतानींच आणलें असें ह्मणावयास कांहीच हरकत नाहीं. एकच मनोभाव घेऊन त्याच्या कला विकलांच्या सूक्ष्म निरीक्षणानें आनंदजनक वर्णनाकडे आमच्या नवीन मंडळीचा बराच झोंक दिसतो. कविवर्य टेनिसन अथवा स्विनबर्न व क्वचित् ठिकाणीं वर्डसवर्थ व शेले यांनीं अध्यात्मिक व व्यवहारिक विषयाची जी विलक्षण सांगड घातली आहे तशी आमच्या मराठी कवितेंत दिसत नाहीं; व ह्मणूनच कांहीं लावण्या व पोवाडे गाळून टाकिले तर बाकी राहिलेल्या मराठी कवितेंत रसभरीत भावविशिष्ट Lyrics कविताच नाहींत असें ह्मणण्याचा प्रघात पडला आहे. विशिष्ट भावांचें अगदीं स्वतंत्र रीतीनें वर्णन केलेलें आमच्या मराठी कवितें मध्यें अगदीं थोडे आहे ही गोष्ट खरी आहे; लावणी छंदांतून शृंगाराचें मात्र पुष्कळ अमर्यादित वर्णन केलेलें आढळतें. स्वतंत्र वर्णन केलेलें नाहीं ह्मणून विशिष्ट भावांच्या वर्णनाचा अगदींच मराठींत अभाव असें मात्र ह्मणतां येणार नाहीं. मुक्तेश्वराचें एकंदर सर्वच काव्य फार रसाळ आहे त्यांत असले प्रसंग पुष्कळ आढळतात. सुंदोपसुंद राक्षसांचें युद्ध किंवा भीम व जरासंध यांच्या मधील वीरश्रीचें भाषण व युद्ध हे दोन प्रसंग रमणीय आहेत. वामन पंडितानें रचिलेल्या सुधा, अमृत रायाचे कटाव, रामजोशी याची शृंगार व वैराग्य या वरील लावणी, मोरोपंताच्या महाभारतांतील द्रौपदी सत्यभामा संवाद किंवा दुर्योधन राजानें मरतेवेळीं कृष्णास मारिलेले वाग्बाण असें एक ना दोन परंतु शेकडो प्रसंग तत्ताद्विशिष्ट भावपूरित आहेत असें दाखविता येईल. असले कांहीं प्रसंग मोरोपंताचें एखादें मोठेसें काव्य घेऊन लक्षपूर्वक वाचिलें असतां सुद्धां ध्यानांत येतील. आपणही असलाच कांहीं उद्योग करून पहावा या हेतुनें मी मोरोपंताचें मंत्ररामायण घेऊन त्यांतील कांहीं प्रसंग येथें देण्याचें योजिलें आहे. मोरोपंताची खरी योग्यता काय याचा विचार ते पाहून सूज्ञ करतील.

मोरोपंताचें मंत्ररामायण हें मोरोपंतानें अष्टोत्तरशत रामायण ह्मणून जी एक अपूर्व चित्रकाव्य मालिका रचिली आहे त्यापैकीं एक आहे हें सांगावयास नको. या रामायणाची ग्रंथ संख्या सरासरी २००० आर्येच्या जवळ जवळ येईल व ह्मणूनच इतर परंतु दाम निरोष्ठ मंत्र मय रामायणा पेक्षां यामध्यें कवीस वर्णन करण्यास विशेष सवड सांपडली. या काव्यांत कृत्रिमपणाचा प्रकार ह्मटला ह्मणजे प्रत्येक आर्येचें एक विवक्षित अक्षर अमुकच असावयाचें एवढाच काय तो दृष्टीस पडतो. पहिल्या कांडांत प्रत्येक आर्येच्या पहिल्या चरणाचें पहिलें अक्षर घेऊन वाचलें असतां ‘ श्री राम जयराम जयजयराम ’ असा मंत्र तयार होतो. या प्रमाणेंच दुसऱ्या कांडांत दुसरें, तिसऱ्या कांडांत तिसरें, या रीतीनें सातही कांडांत एक विवक्षित अक्षर घेऊन वाचिलें असतां हाच मंत्र तयार होतो. शेवटल्या कांडांत मात्र हा मंत्र साधून आणखी रामरक्षादि प्रसिद्ध स्तोत्रांतले कांहीं श्लोकही साधले आहेत. या कांडांत चित्रकाव्याचें आणखी कांहीं चमत्कार विशेष असावेत असे या रामायणास जो उपोद्घांत जोडिला आहे त्यावरून दिसतें परंतु ते चमत्कार अझून कोणाच्या ध्यानांत आले नाहींत. शेवटले सातवें कांड गाळिलें असतां असतां सर्व मंत्ररामायणांत कृत्रिम रचना काय ती एका विवक्षित ठिकाणीं अमुक एक अक्षर आणावयाचें येवढीच दिसतें. बाकी सर्व काव्य भागीरथीच्या प्रवाहा प्रमाणें संथ व गंभीर आहे असें वाटतें. प्रासानुप्रासाचें क्षुद्र काव्य चमत्कार कांहीं ठिकाणीं सहज साधिले आहेत. एके ठिकाणीं एका आर्येंत सर्व मंत्र आणिला आहे. मोरोपंता सारख्या भाषाभिज्ञ विद्वानास हे चमत्कार ह्मणजे

कांहींच नाहींत व ह्मणूनच एकंदर सर्व काव्यांत कृत्रिम रचना नाहींच असें ह्मटलें तरी चालेल. मोरोपंतानें हें काव्य उतार वयांत लिहिलें असावें असें अनुमान करण्यासही बराच अंतस्थ पुरावा आहे. या काव्याचें एकंदर सूक्ष्म पर्यालोचन केलें असतां मोरोपंतानें हें काव्य विशेष श्रम घेऊन रचिलें असावें असें दिसतें. आतां आपण प्रथम उपोद्घाताकडे वळून नंतर याचें मुख्य काव्य हातीं घेऊं.

( पुढें चालेल. )

---

## वऱ्हाडसमाचार

मिती अश्विन शुद्ध २ शके १८२०

---

'पास्टर इनास्टिट्यूट' ह्मणून इंडियांत एक संस्था स्थापावी असा सरकारचा अप्रत्यक्ष हेतु आहे आणि गतानुगतिकत्वा मुळें आमचे राजेरजवाडे अशा संस्थेला मोठा आश्रय देतील व त्यांच्याच द्रव्याश्रयावर ती संस्था चालविण्यांत येईल असा रंग दिसतो. या संस्थेचा उद्देश असा कीं शास्त्रीय शोध लावण्या साठीं जीवंत प्राण्याला ठार मारून त्याच्या शरीराची यांत्रिक रचना रोग उत्पन्न होणारीं स्थळें, निरनिराळ्या भेदक द्रव्यापासून होणारे परिणाम इत्यादि गोष्टी शोधून काढाव्या आणि त्या रितीनें प्राणिशास्त्रामध्यें नवीन नवीन विद्यांची भर घालावी. व मनुष्याची जीवन यात्रा अधीक सुखकर करावी शास्त्रीय शोधाच्या दृष्टीनें सजीव प्राणी मारणें चांगलें असलें तरी भूतदयेच्या दृष्टीनें व नीतीच्या विचारानें प्राणहननाची क्रिया अत्यंत निंद्य व वर्ज्य होय. वरील वर्णनाची संस्था इंडियांत सरकारच्या किंवा संस्थानिकांच्या राजाश्रया खालीं स्थापिली जाऊं नये व भूतदयेला व नीतीला रांडमुंड होऊं नये ह्मणून थोडे दिवसा पूर्वीं मुंबईस एक जाहिरसभा भरली होती. तिचें अध्यक्षस्थान रावबहादूर न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्याकडे होतें. ते ह्मणाले कीं मी सजीव प्राण्यावर शस्त्रक्रिया शास्त्रीय नवीन शोधासाठीं करूं नये असें माझें मत आहे. शास्त्रीय व वैद्यकविषयाचे शोध प्राणिहननानें विशेष फलद्रूप होतात असें प्रतिपादन करणाऱ्या लोकां विरुद्ध बहुतेक सर्व इंडियनांचा अभिप्राय आहे. मनुष्याला जितका आपला प्राण प्रिय आहे तितकाच इतर प्राणिमात्राला त्याचा त्याचा प्राण प्रिय आहे. सजीव प्राण्याला मारण्यांत जो शास्त्रीय हेतु आहे तो हेतु कधीं मनुष्याचा प्राण घेण्यापर्यंत जात नाहीं; फार तर काय जो मरायला टेकला आहे किंवा जो फांसावर चढावयाचा आहे त्याचा देखील जीव लोक घेऊं इच्छित नाहींत. मग इतर प्राणिमात्रावरच शास्त्रीय शोधांची गदा बसावी हें माणुसकीला देखील शोभत नाहीं. नीतिशास्त्राचा कायदा सुद्धां मनुष्याच्या सुखासाठीं दुसऱ्या प्राण्याचा जीव घेण्याला सांगत नाहीं इंडियांत भूतदया अत्युत्तम कोटींतली आहे. तिचा उच्छेद करणें ही सरकारची चूक होय. सजीव जनावरांची किंवा अन्य प्राण्यांची चिरफाड करण्याची शाळा इंडियांत सरकारानें घालूंच नये मूक्या प्राण्यांचा वाली कोणी नाहीं पण इंडियन लोकांच्या मानतिक प्रवृत्ती प्राणघाताला फार विरुद्ध आहेत. पास्टर इस्टिस्ट्यूट स्थापल्यानें प्रजाजनांच्या मनाला धक्का बसेल. पाश्चात्य राष्ट्रांतल्या संस्था उसन्या आपल्या देशांत आणण्या पूर्वीं आपण त्यांचा बरेवाईटपणा शोधून पाहिला पाहिजे. शास्त्रीय शोध देखील खात्रीनें पुष्कळसे होऊन ते मनुष्याची जीवनयात्रा सुखावहच करण्यात कारणीभूत होतील असा देखील भरवंसा नाहीं. शास्त्रीय शोधाच्या पक्षाला जितका सबळ पुरावा पाहिजे तितका अद्याप मिळालेला नाहीं. इंडियांतील प्रजेचा पैसा प्राणहननाच्या क्रियेकडे लागावा ही गोष्ट अर्थशास्त्राच्या दृष्टीनें चुकीची आहे. नामदार रानडे यांच्या भाषणा नंतर डाक्टर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांनीं पास्टर इनास्टिट्युटची गरज वैद्यकशास्त्राला मोठीशी आवश्यक नाहीं असें स्वकीय अनुभवावरून कळविलें. ही संस्थाच नको ह्मणून निषेध करितांना मिसेस गास्टलींग बाई ह्मणाल्या कीं त्या उदार विद्याभिलाषी राष्ट्रभक्त टाटाच्या नवीन शास्त्रीय शोधाच्या शाळेला राजेरजवाडे व इंडिया सरकार योग्य मदत करतील तर सर्वांच्या पैशाचा सदुपयोग होऊन प्रजेचा अवर्णनीय लाभ होईल. या बाबतींत अखेरीला वरील आशयाचा अर्ज स्टेट सेक्रेटरी, पार्लमेंटाला, व महाराणी साहेबांला करावा असा संकेत ठरला.

सजीव जनावरांच्या चिरफाडी विरुद्ध वर जो बुद्धिवाद नामदार रानडे यांनीं सांगितला आहे तो मांसाहारी मनुष्यमात्रांनीं विचार करण्या सारखा आहे. शास्त्रीय शोधा साठीं कोणाचा प्राण घेऊं नये असा सिद्धान्त ठरत आहे तर इंडिया सारख्या शाकादि व धान्यादि सामुग्रीनें विपुल अशा देशांतील माणसांनीं इतर प्राण्याचें मांस खावें किंवा तसलेच त्याज्य पदार्थ भक्षणार्थ घशांत टाकावे ही निर्दयता यमपुरींत सुद्धां आढळणार नाहीं. नित्यांतली क्रूरपणाची गोष्ट सहवासानें अगदीं निरुपद्रवी वाटते पण विचारशील माणसास विचार करण्याला व नीतिमान होण्याला सृष्टीचा खनिना फार उपयोगी पडेल.

---

हरिण गानलुब्ध आहे. तशीच सर्पाची देखील आख्या आहे कीं तो नादाला लुब्ध होऊन डोलूं लागतो. मनुष्याची लुब्धता तर वर्णनीय कोटींतली आहे आणि अलिकडे शास्त्रीय शोध असें सांगतात कीं सर्वच प्राणी गायनाला लोलुप होतात. ही नादलुब्धता मनुष्याला प्रसंग विशेषीं वेडें देखील करून सोडील; पण ती मनोभावना तृप्त करणारें गायन वादन मात्र तसेंच उत्कृष्ट असावें लागतें. ललित शास्त्राची विद्या ही मनुष्या पाशीं अजब किमया आहे किंवा एक यक्षिणीची कांडीच आहे. नादब्रह्माचा आनंद अप्रतिम व अवर्णनीय आहे. संसारातील दुःखें मनुष्य या आनंदांत विसरतो. या आनंदाच्या लाटा मनुष्याला आंदोला प्रमाणें सुखसागरांत झोंका देतात आणि असा कांहीं विलक्षण लय लागला ह्मणजे तात्कालिक मनोराज्य सर्व वृत्ती तल्लीन व निमग्न करून सोडतें. असें उत्तम सुखसाधन कालगतीनें कवडीमोल होत चाललें आहे ह्मणून वारंवार खेद वाटतो. मनोवृत्तीच्या तृप्ततला ललितशास्त्राचा उपयोगच होत नाहीं. लोकांची अभिरुची इतकी भ्रष्ट आहे कीं गायनादि प्रकाराला कोठेंच असावी तितकी किंमत नाहीं. नादलुब्धतेचा मनोविकार उच्च कोटींतला आहे आणि तो गंज चढून चढून अस्तंगत झाल्यासारखा आहे. मनुष्याची दृष्टी व्यवहारिक होत होत नीच मनोविकारांच्या शांतवना प्रीत्यर्थच सर्व धडामोडी होऊं लागल्या आहेत. आता ही गोष्ट खरी कीं दरिद्रावस्थेनें सर्व राष्ट्र भरलें असल्यामुळें पोटाच्या उद्योगा खालींच सर्व मनुष्यें मरून चूर असतात. आणि इंडिया संबंधानें हा प्रकार अत्यंत शोचनीय आहे. अलिकडे गायन, वादन, नर्तन इत्यादिकांचे संस्कार मनावर होऊं नयेत ह्मणून मनाला तुरुंगांत ठेवण्याचा प्रयत्न बहुत करून फार होत असतो. गायनादि प्रकाराची थट्टा करण्यांतच त्यास पंडितता वाटते. ही अधोगती चांगली नाहीं हें कोणाही कबूल करील. वाईट संवयी लागतात ह्मणून करमणुकीचे निरुपद्रवी प्रकार टाळावे ह्यांत काहीं धन्यता नाहीं. वाईट संवयी लावण्याचीं द्वारें कडेकोट बंद करावींत असें मात्र आह्मी आग्रहपूर्वक सूचवितों. गायनादि कलांचा उपहास करितां करितां शेवटीं या कलांचें आश्रयस्थान पण्यांगना, किंवा कुमार्गी रत लोक यांच्या मध्यें कायम झालें आहे. ही निम्न गती आमच्या देशांतील ललितकलांच्या भांडारावर अग्नि टाकीत आहे आणि याच्या प्रतापानें पुढील स्थिती कोणती होईल हें शद्बानीं व्यक्त करण्या इतकें अवघड नाहीं.

अलिकडे संगीत नाटकाला ऊत आला आहे तो त्या त्या नाटकांतील चांगुलपणा नसून मनुष्याची नादलुब्धता आहे. आमच्या लिहिण्याचा उद्देश इतकाच कीं सांप्रतची गायनादिक कलांविषयीची अनास्था किंबहुना द्वेष यांचा लय व्हावा, लोकांनीं नादलुब्धतेचा गुण विकासास न्यावा आणि आनंद मिळविण्याचें नैसर्गिक साधन प्रचलित करावें.

ललितविद्येचा द्वेष जर चांगुलपणामध्यें जाणवतो तर त्या कला शिकविण्याच्या शाला नसाव्यात किंवा त्या कलांस शालांतून आश्रय मिळत नसावा हें साहजिक आहे. पुरुषांला काय किंवा स्त्रियांना काय या कला अवगत असल्या तर त्यांचा व त्यांच्या संसर्गातील इतर माणसांचा काल किती रमणीय होतो हें अनुभव घेतल्या शिवाय कळत नाहीं. आणि कंठमाधुर्य आपल्याच घरांतील पुरुषामध्यें व विशेषें करून स्त्रीवर्गामध्यें असलें तर करमणुकीचा वेळ खरोखरच करमणुकींत व आनंदांत जातो अशी साक्ष पुष्कळ सुखवस्तु गृहस्थांचा अनुभव देईल. आपल्या समाजांत ज्या सुधारणा गृहांतून होतात त्यांचे सुपरिणाम अनुपमेय होतात. आपल्या स्त्री वर्गामध्यें गायनादि कलांस उत्तेजन मिळेल असे उपाय आरंभ योजिले पाहिजेत. वैद्यशास्त्राच्या दृष्टीनें गायनादिकाचे व्यायाम शरीराला मोठे पोषक असून मनाला आल्हादकारक वाटतात. त्रावणकोर येथील मुलींच्या कालेजाचा बक्षीस समारंभ थोडे दिवसापूर्वीं झाला त्यावेळीं तेथील रेसिडेंट मि. निकालसन यांनीं गायनवादनकला मुलींच्या शाळांतून शिकविण्या विषयीं उपदेश केला. तो उपदेश यथावकाश प्रांतोप्रांतीं अंमलांत येईल तर त्या पासून मोठा लाभ होण्याचा संभव आहे, आणि मूळांतच आपण सुमार्ग व सदुपाय स्वीकारला असें शेवटी निदर्शनाला येईल.

---

सन १८९७ चा दिवाणी न्यायखात्याचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांत मुख्य ठळक गोष्ट ह्मणजे दाव्यांची संख्या फार कमी झाली आहे ही होय गेल्या पांच वर्षांची सरासरी घेतली असतां २८००६ दावे दरसालाला पडतात पण १८९७ सालीं फक्त २३८४० दावे दाखल झाले. ही संख्या शेंकडा १४.८ प्रमाणानें उतरली आहे. या कमी संख्येला मुख्य कारण गेला दुष्काळ होय, या दुष्काळाचा परिणाम पुष्कळ वर्षे भोगावा लागेल असें वाटलें होतें परंतु दुःखांत समाधान इतकेंच कीं १८९७ च्या पीकाच्या आबादानीनें सर्व गोष्टी पूर्व स्थितीला लवकरच येऊन पोचत चालल्या आहेत. हा प्रकार सरकारी कोर्टा पुरतांच खरा आहे परंतु गेल्या दुष्काळानें जीं घराणीं रसातळास पोंचलीं तीं पूर्वस्थितीला येण्याला काल मोठा लागेल इतकेंच नाहीं तर कांहीं कांहीं जनसमुदाया संबंधानें पूर्वकालीन स्थिती प्राप्त होईल अशी देखील आह्माला आशा नाहीं. रा० रा० गोविंदराज अय्या ए० असि० कमिशनर हे पेनशन घेऊन गेले तरी त्यांच्या कामाविषयीं जुडिशिअल कमिशनर साहेबांनीं फार फार स्तुती केली आहे ही गोष्ट आनंदकारक आहे. दुष्काळचा परिणाम दाव्याच्या स्वरूपात देखील दिसून आला. ज्या कर्जाला आधारभूत गहाण जमिनी वगैरे इस्टेट होती त्या कर्जा संबंधानें फारशा फिर्यादी झालेल्या नाहींत. बिन— गहाणाच्या कर्जाबद्दल फिर्यादींची संख्या बरीच वाढली आहे आणि तशांतही लहान सहान रकमांच्या फिर्यादी विशेष झाल्या. १८९७ सालच्या दाव्यांची किंमत रुपये ३७,७७,९१३ असून १८९६ त एकंदर दाव्यांची किंमत ४९,९७,००१ रुपये होती. कमीपणाचें प्रमाण शेंकडा १७.८ आहे. सव्या विषयीं फिर्यादी फार च कमी झाल्या. मि. आवर्ड साहेब यांचें मत आहे कीं १८९७ चें दिवाणी काम एकंदरीनें समाधानकारक झालें तल्हारा, मलकापूर व मोर्शी येथील कोर्टावर कामाचा बोजा अधीक बसला होता. फौजदारी काम मुळें व दुष्काळाच्या कामामुळें दिवाणी काम बरेंच मागसलें होतें तथापि सर्व अधिकाऱ्यांनीं मोठ्या दक्षतेनें व दांडग्या मेहनतीनें सर्व दिवाणी काम आटोक्यांतच राहिलें. रा. रा. बाळकृष्ण बळवंत सुळे यांच्या

कामा संबंधानें डिपुटी कमिशनरानीं प्रतिकूळ अभिप्राय दर्शविला होता परंतु मि. आबर्ड यांनीं त्यांचें काम पाहून त्यांस चांगलेंच ह्मटलें आहे हें वाचून आनंद वाटला. तेल्हारे कोर्टाला काम फार कमी पडतें ह्मणून मि० आबर्ड यांची सूचना अशी आहे कीं तेल्हारे कोर्टाची स्थलसीमा कमी करून आकोल्या जवळील भाग आकोल्याच्या स्मालकाज कोर्टाच्या अधिकाराखाली आणवा. ही सूचना अलिजान रेसिडेंट यांस ही पसंत आहे असें वाटतें नकाशांत तेल्हाऱ्या जवळ आकोट व जळगाव तालुक्यांतील कांहीं भाग आहेत परंतु खरोखर दळणवळणाच्या व इतर सोयी आकोल्यास येण्याला अधीक सुखकर आहेत. त्या भागांतील दावे आकोल्याच्या कोर्टाकडे दाखल होतील तर लोकांस सुख होऊन सरकारला सुद्धा ही व्यवस्था हितावह वाटेल.

हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्या संबंधानें मि० आबर्ड साहेब यांनीं एक नामी सुधारणा आरंभली आहे त्यांचा हेतु असा कीं अंमलबजावणीचें काम पोस्ट आफिसाच्या कामा प्रमाणें चालावें पोस्ट आफिसाच्या खिडकी जवळ जसा एकेक मनुष्य आपापलें काम पुरें करून चालता होतो त्याप्रमाणें दर खास्तीची व्यवस्था व्हावा. दरखास्त आल्या बरोबर तिची तपासणी करून घ्यावी, लागलीच तिच्या विषयींचें इतर काम पुरें करून नंतर अर्जदारास बजावणी साठीं अमुक तारखला अमुक ठिकाणीं हजर रहावें असा समज एकदम देण्यांत यावा. ही व्यवस्था अद्याप ह्मणण्या सारखी अंमलांत आली नाहीं आणि आलेल्या अनुभवावरून ही योजना पक्षकारास चांगली सुखावह होईल व सरकारचें काम जलदीनें आटपेल अशी खात्री वाटत आहे. साहेब जिल्ह्यांतील अभिप्राय अनुकूळ असे आहेत मि. आबर्ड साहेबांची ही पद्धती चालू साली बरीच अंमलांत आली आहे. आकोल्याचें स्मालकाज कोर्टाचे जज्ज मे. संजाना भाई साहेब यांनीं दरखास्तीच्या अंमलबजावणी साठीं विशेष दक्षता घेतली आहे मि. आबर्ड साहेबांची रीत चालूं केली आहे आणि ती रीत अलिकडे उत्तम प्रकारें अमलांत आली आहे हें विशेष समाधानकारक होय.

## The Berar Samachar

MONDAY, OCTOBER 17 1898

The report on Criminal justice in Berar for 1897 has been received in the last week. This like the report on Civil Justice, is also from the pen of Mr. Obbard The distinctive feature of both the reports is the total absence of an appreciative note in favour of the Judicial Commissioner. This is perhaps the first time that the resolutions of the Resident on the two annual reports make no mention about the goodness or otherwise of the administration of the judicial machinery in Berar. We note this omission with great regret when we remember that Mr. Obbard was such a capital and excellent officer at the head of the department. Courtesy and decency should have taught the Resident to record with good grace the efficient and masterly work of a popular officer who has been elevated to the Judicial Commissionership of the Central Provinces. A good man needs no monument to himself; his good deeds always make him an object of dignifying awe and reverence. We are aware that Berar has not the like of Mr. Obbard for years together.

The strength of the magistracy remains unaffected. The year has effected a further separation of the criminal from the civil work. We have seen that there is a growing tendency to allot criminal work to Assistant Commissioners and to secure Extra Assistant Commissioners for the civil work alone. There are standing orders to this effect. But we doubt very much the utility of such a distribution of work. If we have rightly understood the current judicial work we beg to record a note of dissent with due deference to the opinion of the Judicial Commissioner. A false idea has gained ground in the minds of these officers that the civil work is rather a hard work of a quill-driver and is intended for those who occupy the lower grades in service. Such a notion of distinction and dignity is of course detrimental to the noble and divine work of administering justice. It is however to be conceded that the magisterial work makes a great impression upon the minds of the people. The exercise of criminal powers involves the greatest risks to a man's purse, person and good name. A man will lose all that is dear to him in life before he can be made to undergo a criminal trial and the consequences thereof A magistrate is no doubt more feared than a civil The latter can decree a person to judge deal with property in a certain manner. If this sort of greatness is to be the privilege of Assistant Commissioners because they are superior officers we doubt whether one will rightly envy a big name due to the dread of a criminal court. We request the Resident to set aside this ill—conceived distribution of work. In the ranks of the Assistant Commissioners there are not as many natives as there are in those of the Extra Assistant Commissioners. This is perhaps the probable reason of the present arrangements. A magistrerial work is supposed to be an easy and playful job and lends dignity, high influence and a commanding voice to the magistrates and Sessions Judges. We do not understand the goodness of a principle which will take away from the civil judges the big avenues to power, greatness and a towering strength. The present distribution is ill advised. It is a law of nature that superior hands should have superior work to perform and it is an undeniable truth that the civil work is more taxing to the brain, intelligence and judicial acumen of judges than the criminal work. The Assistant Commissioners ought to have been left in the exclusive charge of the civil work. Let one argue it from whatever stand-points he chooses, the injustice and the side-wise reflection of partiality are palpably manifest to a looker-on. We hope that this inquitous mode of distributing work will soon be a matter of the past. The sooner it is done the better. It is always useful to distibute the civil and crimihal work in a manner to make the same persons civil judges and magistrates within certain definite areas.

## वऱ्हाड

मि० लुकस सिव्हिल आणि सेशन जज्ज यांची रजा इंडिया सरकारांतून मंजूर होऊन न आल्यामुळें त्यांस नवे सिव्हीलियन साहेब सेशन जज्जाच्या जागीं दाखल होई पर्यंत वऱ्हाडांत राहावें लागेल.

मे० प्रीडो साहब डिपुटी कमिशनर, हे या जिल्ह्याचा चार्ज मे० रुस्तुमजी फर्दुनजी डिपुटी कमिशनर यांस या आठवड्यांत देऊन तारीख २२ च्या सुमाराला आकोल्याहून यवतमाळास रवाना होतील.

येत्या गुरुवारीं आकोल्यास सेशन कोर्ट भरणार असून त्यांत तानी नांवाच्या ब्राह्मण जातीच्या बालविधवेवरील बालहत्येचा खटला चालणार आहे. पूनर्विवाह प्रसूद नसल्या मुळें हें भयंकर व हृदयभेदक खटलें उपस्थित झालें आणि एक सुखसंपन्न गृह सामाजिक दुःखसागरांत भ्रष्ट पावलें.

मिरज संस्थानांतील हरिपूर गांवच्या वैदिक पाठ शाळेचे संस्थापक वे. शा. रा. रा. बाळशास्त्री तेलंग हे हल्लीं आकोल्यास आले असून त्यांचा हेतु पाठशाळेसाठीं वर्गणी जमविण्याचा आहे. काल रात्रीं येथील लायब्ररींत ह्यांचें व्याख्यान 'गीता रहस्य' या विषयावर झालें.

श्री व्यंकटेश संस्थान पेठ देऊळगांवराजा तालुका चिखली येथील राजे बाजीराव अज्ञान पालन कारभार आजी राणी अहल्याबाई यानकडून सर्वत्र लोकांस कळविण्यांत येत आहे कीं मामुली प्रमाणें यंदाच्या उत्सवाला प्रारंभ विजया दशमीला प्रारंभ होऊन ललित अश्विन वद्य ३ या तिथीला होईल यंदा हवापाणी चांगलें असून आबादानी आहे व रोगराई नाहीं तेव्हां यात्रेकरूंनीं मनांत अंदेशा धरूं नये.

अकोला तालुका बोर्डाचे जागल्या सेस मेंबर पैकीं ३ सभासद २४।१।९८ रोजीं निवडले जाणार आहेत. उमेदवारांचे अर्ज चालूं महिन्याच्या अखेर पाठविण्यात आले पाहिजेत.

मि. म्याकफर्लेन आफि. पोलिस सुपरिन्टेंडंट हे ब्रह्मदेशास परत गेल्यामूळें मि. फेअरवेदर असि. पोलीस सुपरिन्टेंडंट, उमरावती यांस आकोल्यास नेमल्या अन्वयें ते सुपरिन्टेंडंटचें काम करूं लागले.

### नोटीस

नोटीस बेशमी विठू वल्लद भिवाजि ताठे राहणार मौजे निंभोरा तालुके अकोले यास.

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझा भाऊ माधो वा कर्णाजी भुंबेरे याज पासून शेत सरवे नंबर १७ व १८ पैकीं मौजे निंभोरा यांतील ½ हिस्सा खरेदी घेतला असें ऐकतो तर तें खरेदीखत खोटें आहे असें समजावें. कारण आह्मा दोघां भावास विभक्त राहण्यास निदान आज २०।२२ वर्षें झाले असतील तेव्हां पासून सदरहू हिस्सा माझे ताब्यांत आहे. तुह्मी माझे मावस बंधु असून तो हिस्सा माझाच आहे असें तुह्मास व तुमच्या बापास माहीत आहे. असें असतां तुह्मी नोंदणार अमलदारा समक्ष नुसते नांवा दाखल त्यास कांहीं रुपये देऊन खरेदी घेतलें व रुपये कचेरीच्या बाहेर परत ही घेतले असें ऐकितों या वरून खरेदीखत पोकळ आहे तुह्मी त्यास कदाचित खरेच रुपये दिले असल्यास दिवाणींत दावा करून त्याजपासून आपले रुपये घ्यावेत शेतावर कोणत्याच प्रकारचा हक्क सांगू नये. आह्मी आमचा ताबा सोडणार नाहीं. तुह्मी जर खरेच घेते. तर खातेदाराची व माझी साक्ष कां न घेते.

तुह्मास असें कळवलें जातें कीं तुमच्या मन मानेल त्या मार्गानें सदरील गैरशिस्त धंदा तुह्मी केला याजबद्दल आह्मास काम धंद्याची व कोर्ट खर्चाची व या नोटीशीच्या खर्चाची अखेर निकाल होईतो पर्यंत जी नुकसान होईल ती सर्व तुमचे जवळून भरून घेतली जाईल. कळावें तारीख १४।१०।९८ इसवी

सही

गणपत वल्लद कर्णाजी भुंबेरे
राहणार केळीवेळी तालुके
आकोट निशाणी वखर.

### NOTICE

Notice under section 44 (2) of the Berar Municipal Law.

Notice is hereby given that at a special meeting of the Ellichpur Civil station Municipality held on 12th October 1898. the Municipal Committee of Ellichpur Civil station have passed a resolution to propose the imposition of a tax on all vehicles, animals used for riding, driving, draught or burden and dogs kept within the Limits of the Municipality under section 41 (I) A (c) of the Berar Municipal Law.

1. Provided that the tax shall be assessable on persons who are exempted from the assessments of the tax on professions and trades, at the following half yearly rates, on all vehicles, animals used for riding, driving, draught or burden and dogs kept within the limits of the Ellichpur Civil station Municipality:—

| | | Rs. | A | P |
|---|---|---|---|---|
| 1 | On every four wheeled Carriage. | 2 | ,, | ,, |
| 2 | On every two wheeled Carriage | 1 | ,, | ,, |
| 3 | On every Elephant | 4 | ,, | ,, |
| 4 | On every Camel | ,, | 8 | ,, |
| 5 | On every horse, pony, bullock or buffalo | ,, | 8 | ,, |
| 6 | On every donkey or dog | ,, | 4 | ,, |

11. That it shall be incumbent on the owners of the taxable vehicles, animals to declare them and pay the tax due thereon in advance as prescribed in rule I

111. That the assessments shall be made by a sub committee of the Municipality, subject to the sanction of the general Municipal Committee.

Persons, wishing to put in their objections to the above proposals, should submit them in writting, to the Ellichpur Civil station Municipal Committee within 30 days from this date. These objections will be considered by the Committee at its special meeting which will be held after that period.

12th. October 1898.

Azizuddin
Chairman of the Meeting.

## वर्तमानसार

अमेरिकेंतील एका कुशल नावाड्यानें समुद्रावरून चालण्याची एक युक्ति मागें काढलेली सिद्धीला जाऊन, तो शेकडो मैल समुद्रावरून प्रवास करूं लागला आहे!

जो स्वतःचा क्रोध शांत करूं शकतो तो बलाढ्यापेक्षां बलाढ्य होय, जो परक्याचा क्रोध शमवूं शकतो तो चतुरांत चतुर जाणावा. आणि जो हीं दोन्ही कार्यें करूं शकतो तो महा वंद्य जाणावा.

विलायतेहून हिंदुस्थानापर्यंत नळ्या घालून वाऱ्याच्या जोरानें डाक आणण्याचा विचार चालला आहे. असें होईल तर एका दिवसांत विलायतची डाक हिंदुस्थानांत येणार आहे. उद्यां मनुष्यानां सुद्धां तसें ओढून घेतील.

पब्लिक सर्व्हीस परीक्षेतील एका उमेदवारानें रात्रीच्या वेळीं हायस्कूलांत ( रत्नागिरी ) शिरून गणीताच्या प्रश्नाचा सोडविलेला कागद इतर कागदांत मागाहून घालून ठेविल्याचें उमगल्यावरून त्याची लगेच परीक्षेंतून बोळवण झाल्याचें समजतें ! छाती विलक्षण.

इंदूरच्या होळकर सरकारानीं खानदेशांत नामदार धोंडो शामराव गरुड यांस आपल्या दिवाणगिरीचे जागीं येण्यासाठीं पाचारिलें आहे.

सजीव घोंडा—अमेरिकेंतील एका मनुष्याजवळ एक घोंडा आहे. तो घोंडा त्याला मिळाला तेव्हां त्याचें वजन दहा पौंड होतें. गेल्या दहा वर्षांत त्याचें वजन ९५ पौंड वाढलें आहे ! हा काय चमत्कार असेल बरें !

रशियांत प्रत्येक माणसास बाहेर फिरण्यास परवाना लागतो.

पश्चात्ताप होणें हा तरी सग्दुणच ह्मणावयाचा कारण अनुतापानें पुष्कळ लोक सन्मार्गाला लागलेले आढळून येतात.

खऱ्या घरंदाज बायकोचें लक्ष पुढच्या दिवाणखान्यापेक्षां स्वयंपाक घराकडे जास्त असतें

निंदा तोंडावर व स्तुति पाठीमागे करणारा जो मनुष्य तोच खरा सत्यवक्ता.

घा० वृ०

समशेराच्या जोरावर लग्न:—हैद्राबादच्या दोन प्रख्यात सरदार घराण्यांत नुकाच अगदीं हातघाईचा प्रसंग आला होता. त्यांतील एक वराणें सध्याच्या मुख्य दिवाणाचें! एका घराण्यांतील वधू दुसऱ्या घराण्यांतील वराशीं नेमस्त केली होती पण हा विवाहाचा वाग्निश्चय झाल्यानंतर दुर्दैवानें वधूची दोन तीन आप्त माणसें मेलीं. तेव्हां आपणांस नेमस्त केलेला वर चांगल्या पायगुणाचा नाहीं अशी वधूची समजूत झाली व त्याप्रमाणें तिनें ठरलेल्या वराविषयीं नापसंती दाखविली. त्यामुळें वराच्या घराण्यास राग आला व त्यांनीं लगेच आपल्या पदरचें सैन्य जमा करून वधूस आणावयाचें आणि निकाविधी—लग्न—ही उरकावयाचें असें ठरविलें. इकडे वधूच्या घरीही त्यांच्या पदरचें सैन्य जमा झालें आणि हातघाईवर प्रसंग येतो असें वाटून सर्वत्र एकच घांदल उडाली. इतक्यांत खुद्द निजाम साहेबांस हें वर्तमान कळलें तेव्हां त्यांनीं मध्यस्ती करून उभय सरदारांचीं सैन्यें परतविलीं आणि वधूच्या इच्छेप्रमाणें विवाह व्हावा असें ठरविलें तेव्हां हा अनर्थ टळला! हैद्राबादी सरदारांच्या जुनेपणाची केवढी ही शोचनीय स्थिति! या पेक्षा सध्यां जास्त उग्दार काढणें आह्मास प्रशस्त वाटत नाहीं. मुख्य दिवाणाची सामाजिक अ[illegible]णीपणाची ही रीत आहे हेंही पण विसरतां कामा नये.

हिंदु गोसावी मुसलमान झाला! जरीदाई रोजगार नामक पत्रांत प्रसिद्ध झालें आहे कीं, नारायण स्वामी बैरागी नांवाच्या गोसाव्यानें मक्का मशीदींत हैद्राबाद येथें मुसलमानी धर्माची दीक्षा घेतली! या गोसाव्याचे हैद्राबाद प्रांतीं बहुत शिष्य आहेत. जहिरुद्दीन हें नवें नांव या बैराग्यानें घेतलें. या गोष्टीवरून अनेक तर्क सुचतात, पण त्यांचा तूर्त उल्लेख करण्यांत अर्थ नाहीं.

किताबत्तींची खिरापत:—जन्मोत्सव प्रसंगीं निजाम सरकारानें आपला एक दरबार भरविला व पुष्कळांना किताबती—बेगडी-इंग्रजांसारख्या दिल्या. ह्या किताबती शेकडा ९५ प्रमाणानें मुसलमानांस व ५ या प्रमाणानें हिंदूंस मिळाल्या. प्रजेच्या संख्येचें प्रमाण याच्या उलट आहे. हा प्रकार, ही गोष्ट एक; आणि हिंदुलोकांच्या वाट्यांस पदव्या आल्या त्यांत दोन जमीनदार किंवा जाहगीरदार. व बाकीच्या निजाम सरकारास कर्जाऊ रक्कम देणाऱ्या सावकारांसही वस्तुस्थिती पाहिली ह्मणजे या किताबतींच्या खैरातीसंबंधानें कौतुकच वाटत नाहीं. तीस लाख मराठी प्रजा असून त्यांत पोंकळ व बेगडी किताब देण्याच्या लायखीचा कोणीच नाहीं काय हा आमचा त्या सरकारास प्रश्न आहे.

सोलापूर येथील स्टेशनावर संशयावरून उतरून घेतलेला एक भाटेजातीचा इसम पोलिसांनीं कांहीं वेळ अटक करून सोडला, तो तिसरे दिवशीं त्याच ठिकाणानजीकच्या विहिरींत मेलेला सांपडला. पोलिसांनीं त्यांस अटक करण्याचें कारण असें कीं, त्याचे जवळ सुमारें ६० तोळे सोनें व कांहीं रुपये असून ते त्याचे नसावेत असा वहीम आला तें सोनें व रुपये मात्र पुढें गडप झालें. ते कसे आणि कोठें गडप झाले व हा इसम या विहिरींत कसा आला देव जाणे.

मिलिटरी खात्यांत ब्राह्मण शिपायी भरीत नसत, ते पुनः हल्लीं भरूं लागले आहेत.

पुण्याच्या म्युनिसिपालटीनें एका गृहस्थाला त्याचे घरच्या शौचकूपाला सफेती देण्याबद्दल म्युनिसिपालिटीच्या कायद्याच्या ( १८७३ चा ६ वा ) १७ व्या कलमाप्रमाणें नोटीस दिली. ही नोटीस मलकावर न बजावतां त्याच्या पुतण्यावर बजावली. पुतण्यानें नोटीशीवर सही केली, परंतु त्या नोटिशी प्रमाणें शौचकूपाला सफेती दिली नाहीं. तेव्हां त्यांवर खटला केला आणि त्याला १९ रुपये दंड झाला. हा दंड हायकोर्टानें गैर कायदा ह्मणून फिरविला. हायकोर्ट ह्मणतें कीं, पुतण्या हा मालक नव्हे, तेव्हां त्याला शिक्षा झालेली गैर आहे. त्यानें नोटीसीवर सही केली ह्मणून काय झालें? जबाबदारी मालकावरच राहते.

युरोपांतील अनार्किजम् कोणत्या रीतीनें बंद करिता येईल याचा विचार करण्याकरितां सर्व युरोपियन राष्ट्रांच्या मुखत्यारांची एक कांग्रेस भरणार आहे. कांग्रेस भरवून आहे. अनार्किजम् नाहींशी होईल काय?

क० त०

जुनराजवळ उदापूर येथें ता० १ रोजीं मोठा दरोडा पडला. दरोडेखोर पोलिसाच्या पोषाखाचे व हत्यारबंद होते. ११ लोकांचीं नाकें कापलीं. कागदपत्र काढून जाळले.

आकोला जिल्ह्यांत एक लबाड मनुष्य त्याची साथीदार रांड वगैरेंनीं पोलिसी थाट खेडेगांवीं माजवून चैनीची सरबराई करून घेतली.

ओराई व झाशी यांच्या दरम्यान मेल ट्रेन जात असतां आंतल्या एका फर्स्ट क्लास डब्यांत तीन हपीसर बसले असतां डब्याच्या खिडकींतून बंदुकीची एक गोळी आली व आंतल्या एका हपीसराच्या डोक्यांस लागली व समूरच्या खिडकीचें ग्लास फोडून निघून गेली.

चिनी लोकांनीं पेकिन येथें जास्त गडबड चालविल्यामुळें रशियानें आपली कोसाक फौज पोर्ट आर्थर येथून बलावली आहे आणि इंग्रजांनींही वेईवाई येथून कांहीं लष्करी लोक बलावले आहेत

चिनी लोक परकीय लोकांवर हल्ला करूं लागल्यामुळें अमेरिकेनें एक गलबत रवाना केलें. येथें अजून कांहीं भयंकरपणा झालेला नाहीं, पण पुढें होण्याचें भय आहे असें अमेरिकन वकिलांचें ह्मणणें आहे.

जर्मन वकिलांनेंही आपली कांहीं फौज मागविली आहे.

तुह्मी आपली फौज पेकीन येथे आणूं नका. कारण परकीय फौज आल्यानें चिनी प्रजा चवताळण्याचा संभव आहे, असें चिनी कारभाऱ्यांनीं युरोपियन वकिलांस बजावलें.

असें आहे तरी आमच्या फौजांस पेकीन येथें येऊन राहण्याची स्पेशल तजवीज करा असें युरोपियन लोकांचें ह्मणणें आहे.

क्रीट बेटांतली तुह्मी आपली फौज बाहेर काढण्याचें काम १५ दिवसांत सुरूं करा आणि एक महिन्याच्या आंत सगळी फौज बाहेर काढा अशी ख्रिस्ती राजांनी टर्कीच्या सुलतानास ता० ५ रोजीं शेवटची नोटीस दिली.

सिमल्याची तार सांगते कीं, इंग्रज सरकारची ९ माणसें डाक वगैरे घेऊन सरवाके येथून जांडोला येथें जात असतां ता० २९ रोजीं जांडोलाच्या शेजारीं त्यांच्यावर १५ मसूद जातीच्या लोकांनीं हल्ला केला व एकास ठार मारून दोघांस घायाळ केलें आणि एक बंदुक चोरून नेली. इतक्यांत सरकारचे कांहीं स्वार पलीकडून जात होते ते त्या जागीं हजर झाले, पण चोरट्यांनीं त्यांच्यावरही गोळ्या सुरू केल्यानें त्यांचें कांहीं चालेनासें झालें. मग त्यांणी जांडोला येथील मुख्य कामदारास वर्दी दिल्यावरून त्यांणें कांहीं स्वार बरोबर घेऊन चोरट्यांस गांठण्याचा यत्न केला, पण ते त्यांस सांपडलेच नाहींत.

अरे धरा हा कोण—सातारा येथें आलीकडे पांच चार दिवस एक चमत्कार युरोपियन लोकांमध्यें चालला आहे- तो असा कीं, साहेब खान्यास बसले ह्मणजे त्यांच्या दृष्टीस एक मनुष्य. तो खान्याच्या टेबलावरील चहाचा कप किंवा साबण किंवा रुमाल किंवा कांहीं तरी क्षुल्लक वस्तु उचलतो. साहेब आपल्या नोकरास ह्मणतात अरे, त्याला धर, नोकरास तो दिसत नाहीं. साहेब रागावतात. मदतीला शिपाई बोलावले त्यांसही दिसत नाहीं. वस्तु नाहींशा होतात. तेव्हां हें काय आहे याचें गूढ त्या लोकांत पडलें आहे. साहेबांनीं दरडावलें तर क्षणभरानें तेच अगदीं गप्प बसतात; तेव्हां त्यास तो भिवविती कीं काय कोण जाणें !

अ०

सोलापूर येथें 'श्री शिवाजी मेटल वर्क्स' या नांवाचा पाणी तापविण्याचे हौद व पाणी गाळण्याचीं फिल्टरें वगैरे मांडीं करण्याचा कारखाना डॉ. किर्लोस्करांनीं आज दोन वर्षे चालविला असून त्यांत मांडीं फार सुबक निघत. आहेत आणखी त्या कारखान्याची सारखी भरभराट होत आहे.

जपानमध्यें एक नवीन यंत्र तयार करण्यांत आलें आहे व त्यावर एक मनुष्य व एक मुलगा अशीं २४ तासांत १६६६ पौंड चहा ताज्या तोडलेल्या पानांचा करूं शकतात, ह्मणजे चहा वाळून त्याचे तुकडे करून डब्यांत घालण्यास योग्य असा करतात शु सू.

मयत हैग्रीवाचार्यांच्या बायकोनें मे० कलेक्टर साहेबानां नोटीस दिली आहे. ( एकच नव्हे, दुसरी एक दुरुस्त नोटीस दिली आहे. बाई फार हुशार आहे. ) तिचें ह्मणणें असें आहे कीं, घर बाटविल्यामुळें आपल्या नवऱ्याला फार वाईट वाटून त्याणें विहिरीत जीव दिला आणि त्यामुळें आपलें नुकसान झालें, तें भरून द्यावें. न दिल्यास कोर्टांत आपणावर दावा लावूं घर बिटाळलें तर त्याबद्दल नुकसान भरून मागावयाचें होतें, तो मार्ग सोडून प्राण कां दिला? असो, ही कायद्याची बाब आहे, तेव्हां दाव्याचा निकाल होईपर्यंत स्वस्थ बसणें अवश्य आहे. मात्र या बाईला आतां दाव्या करितां पैसे खर्चावे लागणार आहेत. आह्मी हैग्रीवाचार्य भिकारी होता असें ह्मटलें होतें. परंतु ते आमच्या बंधुवर्गाला खपलें नाहीं. तो भीक मागत होता तरी तो ओला भिकारी होता असें त्यांणीं ठासून ह्मटलें आहे, तेव्हा अर्थात आतां नादारींत दावा करितां येत नाहींच. असो. कसा काय प्रकार होतो तो पाहूं. नुस्ते बुजगावणें सेल तर त्यांत कांहीं हाशील नाहीं हें सांगणें नकोच.

पा. वृ.

## पाहिजे.

एक नऊ इयत्ता पास झालेला मनुष्य जिनिंग फ्याक्टरी मध्यें क्लार्कीचें काम करण्यास पाहिजे आहे. पगार दरमहा १० रुपये मिळेल. काम पसंत पडल्यास १२ महिन्या नंतर १२ रुपये पगार केला जाईल. चांगल्या वर्तणुकी बद्दल दाखला आणिला पाहिजे. कळावें.

मलकापूर. २४।९।९८ { विष्णुसा बाळकृष्णसा साहू.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

ER No. N. 4

साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... ......८१

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ...................................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

VOL XXXII AKOLA MONDAY 24 OCTOBER 1898 NO 42
वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख २४ माहे आक्टोंबर सन १८९८ इ० अंक ४२

## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटींवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson ent.

---

नोटीस.

चि० रा० आमृता वल्लद गणाजी लेवेकर राहणार पुसद जिल्हा वाशीम. यांस.

खाली सही करणार यांजकडून या नोटिशीच्या द्वारें कळविण्यांत येतें कीं आपला बाप मयत झाला त्यावेळेस आपले जवळ वडिलोपार्जित कांहीं जिनगी नव्हती. सावकारांचें कर्ज मात्र होते. बैल सुद्धां खांदानें होतें पुढें १०।१२ वर्षें तुह्मी पळून गेला व परत येथें येईपर्यंत कर्ज वगैरे मीच फेडिलें व हल्लीं असलेली सर्व जिनगी मी स्वतः संपादन केली. तुमचा कोणतेही प्रकारें त्या जिनगीवर हक्क नाहीं असे असतां तुह्मी आतां जुलमानें वांटणी मागतां तर तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं मी स्वतः मिळविलेल्या जिनगीवर तुमचा मुळींच हक्क नसून त्या संबंधी कोणताही व्यवहार तुह्मी करूं नये. तुह्मास आपला हक्क आहे असें वाटत असल्यास तो रितीप्रमाणें दिवाणी कोर्टांत शाबीत करावा. कळावें तारीख १४।१०।९८ इसवी.

( सही. )

संभाजी वल्लद गणाजी लेवेकर राहणार तालुके पुसद याची निशाणी

---

नोटीस.

राधु मर्द नरसाजी ब्रायसने कुणबी रा० गोर्धे तालुके अकोट. इस.

नोटीस देणार नरसाजी कुणबी ब्रायसनें राहणार आनकवाडी तालुके व जिल्हे अकोलें. नोटीसीनें असें कळवितों कीं तूं माझी गंधर्वाची बायको आहेस, तुजबरोबर गंधर्व होऊन अजमासें ७ वर्षे झालें आहेत. गंधर्वाचे वेळीं तुझ्या आंगावर आजमासें रुपये ७०० इयाचे सोन्याचांदीचे डागीने घातले व गंधर्व झाल्यावर ३।३॥ तीन साडेतीन वर्षे तूं जवळ होतीस बाळ तपणामुळें तुझी तबीयत बिघडली याजकरितां औषध देऊन नीट करावें ह्मणून तुझा बाप येऊन तुजला सदहू वरील डागिन्यासुद्धां तुजला घेऊन गेला त्यास अजमासें आज ३ तीन वर्षे होत आली या अवकाशांत २।४ दोन चार वेळीं तुजला घेण्या करितां आलों परंतु तूं माझे बरोबर न येतो आपल्या बापाच्या मार्फतीनें असें कळविलेस कीं मी येत नाहीं. व डागडागीनाही देत नाहीं. मी दुसरा गंधर्व करीन अशा बऱ्याच गोष्टी मजला कळविल्या व सज्जनसुधापान वर्तमानपत्रांतून मजला नोटीस दिली नोटीसींतील सर्व मजकूर खोटा आहे तुला अखेरचे असें कळवितों कीं मजपासून तूं आपले बापाचे येथें औषध घेण्याकारितां गेलीं त्यास अजमास ३ तीन वर्षे झालीं या तीन वर्षाच्या चालीप्रमाणें मी पोटगी देण्यास तयार आहे मात्र ही नोटीस पावल्या पासून ८ आठ दिवसाचे आंत तू व तुजबरोबर दिलेले सोन्याचांदीचे डागीनें रुपये ७०० सातइयाचे हे घेऊन मजपाशीं हजर व्हावे तुला वागविण्यास व बाळगण्यास सर्व प्रकारानें मी तयार आहे. सदहू मुदतींत तूं डागीन्या सुद्धां न आल्यास तुजला ताब्यांत घेण्याबद्दल सरकारांत काम चालवून ताब्यांत घेतली जाईल. व सोन्या चांदीच्या डागीन्या बद्दल तुझ्या बापावर व तुजवर दगलबाजी केल्या बद्दल काम चालविलें जाईल व ह्या नोटीसीच्या खर्चा सुद्धां अखेर निकाल होई तो पावेतों जो खर्च लागेल तो सर्व भरून घेतला जाईल. ह्मणून दिली नोटीस सही कळावें तारीख २०।१०।९८ इसवी.

सही

नरसाजी वा॥ गंभीरजी ब्रायसने कुणबी राहणार मौजे अनकवाडी निशाणी वखर दस्तूर नामदेव वल्लद विठोबा पाटील दस्तूर खुद्द.

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस व जातभाई यांस नरसाजी वल्लद गंभिरजी कुणबी आडनांव ब्रैसने राहणार आनकवाडी तालुके व जिल्हे आकोलें हे ह्या जाहिरातींनें असें कळवितात कीं माझी गंधर्वाची बायको नामे राधू मर्द नरसाजी ही परशराम आडनांव परमाळे राहणार गोर्धे ता. आकोट याची मुलगी आहे हिज बरोबर मी गंधर्व लाविला त्या वेळेस सोने व चांदीचे मिळून डागडागीने हिजवर अजमासें रुपये ७००इयाचे घातले आहेत. हिचा बाप गंधर्व झाल्यावर अजमासें ३॥ साडे तीन वर्षांनीं हिची तबेत बाळंतीण होऊन बिघडल्यामुळें औषध देण्याकरितां तिजला सदरील सोन्याचांदीच्या दागिन्यासुद्धां मजपासून घेऊन गेला गंधर्व होऊन अजमासें ७ सात वर्षे झालीं आतां तिच्या व तिच्या बापाच्या मनांत कपट उत्पन्न होऊन सदरहू सोन्याचांदीचे डागीने नाहींसे करून दुसरा गंधर्व करण्याचा विचार ठरला आहे याज करितां सर्व जातभाई व इतर लोक यांस असें कळविलें जाते कीं माझ्या संमतीशिवाय इज बरोबर जर कोणी गंधर्व वगैरे करील तर त्याजबद्दलचे सर्व प्रकारचा जबाबदार गंधर्व लावणाऱ्यास जबाबदार धरला जाईल व त्याजपासून ह्या जाहिरातीच्या खर्चासुद्धां सर्व नुकसान भरून घेतलें जाईल. हें सर्वांस कळावें. ता० २० अक्टोबर सन १८९८ इ०

( सही )

नरसाजी वल्लद गंभीरजी ब्रायस्नें कुणबी रहाणार मौजे आनकवाडी निशाणी वखर दस्तुर नामदेव वल्लद विठोबा दस्तुर खुद्द.

---

## जाहीर खबर

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येत आहे कीं आह्मी आमच्या टप्याचे टांग्यांत जाणारे व येणारे हींगोलीचे नेटीव प्यासेंजराचे दर ता. २० आक्टोबर सन १८९८ पासून कमी करून दर एक प्यासेंजरास रुपये तीन ३ केले आहेत. टांग्या शिवाय भरती झाल्यास दुसरा फालतू टांगा रोज सोडीत जाऊ. कळावें तारीख २० आक्टोबर सन १८९८ इसवी.

पेस्तनजी आणि सन

---

## जाहिरात.

दिवाणी क्लास नंबर १५—९⁄९८

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्याबद्दल सरटीफिकीट देण्याचा कायदा आक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वयें नोटीस.

विद्यमान सिव्हिल ज्यडज्य साहेब बहादूर आकोलें यांचे कोडतांत.

अर्जदार भगवान वल्लद मारूती माळी इंगळे राहणार मौजे चांदूर तालुके अकोलें.

सर्वत्र लोकांस या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं, वरील अर्जदार यानें मयत झिमि मर्द तुकाराम माळी राहणार चांदूर तालुके आकोलें याचें कर्ज वसूल करण्याकारितां सरटीफिकीट मिळावें ह्मणून तारीख १७ माहे अक्टोबर सन १८९८ इसवी रोजीं अर्ज केला आहे व ह्या अर्जाचे चौकशीची तारीख ५ माहे नवेंबर सन १८९८ इसवी रोजीं मुकर केली आहे तर सदहू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्ताऐवज वगैरे सुद्धां आमचे कोर्टांत अर्जदार याजला कां सरटीफिकीट देऊं नये यांचें कारण दाखविण्याकारितां हजर व्हावे माझे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस देण्यांत आली आहे.

आज तारीख २० माहे अक्टोबर सन १८९८ इ०

Sk. Ismail
सिव्हिल ज्यड्ज्य.

---

नोटीस

रा. रा. जमनादास नारायणराव कंपनी, दर्यापूर, जिल्हा इलिचपूर यांस.

खालीं सही करणार याजकडून या लेखानें कळविण्यांत येते कीं तुह्माकडे आमच्या दुकानची खाते बाकी रुपये ९३०१ येणें आहे. ही रक्कम तुह्मी आह्माला सोलापूरच्या पत्यावर न धाडतां आमच्या आकोल्याच्या पत्यावर ही नोटीस पोंचताच पाठवून द्यावी. ही रक्कम नोटीस पोचल्या तारखे पासून ८ दिवसांत न पोचल्यास तुह्मावर दिवाणींत फिर्याद करून सर्व रक्कम व्याजा सुद्धा खर्चासह भरून घेतली जाईल कळावें. २० आक्टोबर १८९८ इसवी.

सही

मल्लिकार्जून निकते कायमची वस्ती सोलापूर, हल्लीं वस्ती आकोला. ठिकाणा सुकदेव चुन्निलाल यांचे दुकान आकोला.

---

## ॥ श्रीजयतितराम ॥

— मंत्र रामायण नं. १

-उपोद्घात-

मंत्र रामायणास उपोद्घात रूपीं प्रथमच २० आर्या आहेत. सकलविघ्नशांत्यर्थ गणपतिस्तवन झाल्या बरोबर ज्या सहृदय अंतःकरण जना वर आपली कीर्ति अवलंबून राहणार त्या जनास कवीनें नमस्कार केला आहे. हा नमस्काराचा प्रकार इतका समयोचित विनयपूर्वक व 'असूयोज्झित' आहे कीं विरोध रूपानें संस्कृतज्ञ वाचकांस पुष्कळ संस्कृत कवींची आठवण होईल. विशेषतः जगन्नाथ पंडित व जयदेव प्रभृती कवींच्या गर्वोक्तीची आठवण झाल्यावांचून खास राहणार नाहीं. आपल्या महाराष्ट्र कवींस अहंकार नव्हता एवढेंच नव्हे तर आपला स्वतःचा नामनिर्देशही 'कविराज राम'

'कविश्रेष्ठ चिंतामणी' इत्यादि लांब लांब शद्बांनीं न करितां केवळ मयूर मयूरेश अशा साध्या शद्बानें केलेला आढळतो व ह्मणूनच त्याचा.

ज्यांच्या हृत्कासारीं होय गुणस्नेह-
बिंदुही फार ।
सारज्ञ, असूयोज्झित, त्यांला माझा
असो नमस्कार ॥२॥

हा नमस्कार कोणास आवडणार नाहीं ! केवळ 'गतानुगतिको लोको' या न्यायानें विविधज्ञान विस्तारांतील लेखकाच्या हातास हात लावून ज्यांनीं निर्वाह करून घेतला नसेल ते ह्मणजे अर्थात् ज्यांच्या 'हत्कासारांत गुणस्नेहबिंदु फार' असल्यामुळें आपल्या निर्मळ मनाची समता ठेविता आली, असे 'असूयोज्झित व सारज्ञ' वाचक मोठ्या भक्तीनें मयूर पंडिताच्या अभिनंदनाचा स्वीकार करतील यांत संशय नाहीं. इतक्या मार्मिक रीतीनें आपल्या वाचकांचा परामर्ष केलेला दुसऱ्या ठिकाणीं क्वचित्च आढळेल.

मंत्र प्रयुक्त रचिलें चरित्र भावेंचि
रामरायाचें ।

ह्मणून या रामायणाचें नांव मंत्र रामायण ठेविलें व कोणतें अक्षर वाचलें असतां हा मंत्र बनतो तें सांगून कवीची स्वारी उत्तर कांडाकडे वळली. उत्तरकांड हें मोरोपंतानें ह्मटल्या प्रमाणेंच 'श्री रघुपति मंत्र रत्न मंजूषा' असें आहे, ह्मणजे यांत अर्थ चमत्कार विशेष नसून मागें सांगितल्याप्रमाणें मंत्र साधिला असून शिवाय रामरक्षादि स्तोत्रांतील कांहीं ठळक श्लोकही ग्रंथित केलेले आहेत. यांत आलेले कांहीं श्लोक व रघुवीरांचीं नांवें हीं काव्यसंग्रह नामक अत्यंत उपयुक्त मासिक पुस्तकांत दिलेलीं आहेत. परंतु पहिल्या ५० श्लोकांचे पुढील श्लोक किंवा नांवें अजून कळलीं नाहींत. ते शोधून काढण्याचें काम फार कठीण व बहुश्रुत वाचका खेरीज व्हावयाचें नाहीं. तें कोणी भाविक वाचक करून ठेवील तर उत्तरकांडास पंतानें 'श्री रघुपति मंत्ररत्न मंजूषा' ह्मटलें आहे तें नांव सार्थ होईल.

देहीं आत्मा तैसा आर्यांतीं मंत्रवर्ण सांग
वसे ।

मोरोपंत हा वेदांतांत कधींच शिरत नाहीं परंतु या ठिकाणीं देह व आत्मा याचा दृष्टांत व पुढच्या आर्येंत 'सर्वत्र एक आत्मा' - या उक्तीनें शेवटीं शेवटीं तो देह व आत्मा या कूट प्रश्नाकडे वळला असावा, असें एक अनुमान काढितां येतें. हिंदु धर्मांचीच घटना अशी कांहीं चमत्कारिक आहे कीं विशेष सुबुद्ध व अलौकिक मन असल्या खेरीज मूर्तिपूजा व कर्मकांडाचा अवाढव्य विस्तार सोडतां येत नाहीं. हें कर्मकांड मनास स्थिरता आणण्यास एक उत्कृष्ट साधन होय. व ह्मणूनच हें प्रत्येक मनुष्याच्या निरनिराळ्या अवस्थेवर, शक्तीवर व समाज पदवीवर अवलंबून आहे. दूरदर्शी भगवान श्रीकृष्णानें अर्जुनास हेंच रहस्य सांगितलें आहे:–

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहं ।

यांतील मर्म किती सर्वव्यापी आहे हें विचारशील मनुष्याच्या ध्यानांत आल्या वाचून राहावयाचें नाहीं. इतिहासदृष्ट्या या गोष्टीचा विचार केला असतां श्रीमत् शंकराचार्य किंवा ज्ञानेश्वर प्रभृती कित्येक संत मंडळीस हा संस्कार जन्मतःच असल्यामुळें यास कर्मकांडांत शिरावें लागलें नाहीं. रामदास स्वामीस आपल्या पायांत कुटुंबरूपी बेडी पडणार असें सावध केल्यावर पळून जाण्याची बुद्धि सुचली; व नंतर कर्ममार्गानें मनास स्थिरता आणून ते साधु झाले. तुकारामांस नुसत्याच ईश्वरनामोच्चरणानें व विचार करण्यानें मनास स्थैर्य येऊन ज्ञानप्राप्ती झाली. रामगीतेंत यथार्थ ह्मटलें आहे कीं

आदौ स्ववर्णाश्रमवर्णिताः क्रियाः कृत्वा
समासादित शुद्ध मानसः
समाप्य तत्पूर्व मुपात्तसाधनः समाश्रयेत्
सद्गुरुमात्मलब्धये ॥१॥

(पुढें चालूं)

---

# वऱ्हाडसमाचार

भित्ती अश्विन शुद्ध १० शके १८२०

---

अलिकडे स्वच्छता राखण्या विषयीं सर्वत्र खटपटी चालूं आहेत हें सुचिन्ह होय. प्लेगाच्या उद्भवामुळें स्वच्छते साठीं मोठा कडक बंदोबस्त ठेवण्यांत येतो. हा भाग अस्वच्छ आहे, येथें गर्दी अतिशय आहे, तेथें गलिच्छ वस्तु ठेविल्या जातात इत्यादि ब्रह्मज्ञान सांगणें सोपें आहे, परंतु मुख्य शहाणपण असा आरोग्य शास्त्राचा धडा वाचण्यांत नसतें. आरोग्य सर्वांस आवडतें परंतु वस्तुस्थिति लक्ष्यांत घेऊन नंतर तिच्यांत सुधारणा सूचविणें फार कठीण आहे. पायोनिअर पत्रकर्त्यांनीं कलकत्याचे गृहस्थ मि० एन० एन० घोस यांच्यावर कोरडा ओढला कीं बाबू घोस यांच्या मतानें कलकत्यास वाडवडिलापासून अस्वच्छ, घाणरड्या व अमंगळ जागेंत गर्दीनें राहून देखील आमचे पूर्वज दीर्घायुषी होते त्यावर मि० घोस यांनीं मोठा मुद्देसुत जबाब दिला आहे ते ह्मणतात कीं स्वच्छतेचे नियम सर्वत्र सारखेच व्यापक व तात्विक सिद्धांता प्रमाणें सर्वमान्य नसतात; ते नियम वस्तुमानाच्या धोरणानें बदलतात, त्यांची उपयुक्तता अवान्तर कारणांनीं कमजास्त होते, आणि लोकांच्या संवयी व चालीरिती, त्यांच्या गरजा आणि त्यांची ऐपत या गोष्टींच्या अनुसंधानानें स्वच्छता पाहावी लागते. तेव्हां स्वच्छता ह्मणून तिच्या नांवाखालीं भलत्याच गोष्टी सुरूं करूं नयेत अशा विषयीं मुख्य धोरण ठेविलें पाहिजे. कित्येकांचे धंदेच घाणेरडे असतात त्यांस सामाजिक व्यवस्थे साठीं तसेंच राहूं देणें इष्ट असतें. कित्येकांजवळ स्वच्छ राहण्याला पुरेशीं साधनेंच नसतात. ह्यांच्यावर स्वच्छतेचे नियम कमी सक्तीनें चालविले पाहिजेत. साधारणपणें लोकांस स्वच्छ अधिकाधीक राहण्यां विषयीं मोठी गुळचीनें लावावें यांत सरकारचा थोरपणा आहे आणि सरकारचा हेतु पाहून लोकांनीं स्वच्छता ठेवण्यास आपल्या व इतरांच्या जीवासाठीं शिकावें यांत लोकांस ही मोठें भूषण आहे.

---

मद्रासच्या राष्ट्रीय सभे विषयीं तिकडे प्लेगाच्या त्रासामुळें थोडासा मतभेद पडल्या सारखा झाला होता. या मतभेदाचा अनुभव आह्मालाही गेल्या वर्षीं आला. प्लेगाच्या भितीनें राष्ट्रीय सभा भरवूं नये असा वाद चालला होता परंतु त्या गोष्टीला मद्रासच्या हिंदुपत्रकर्त्यांनीं फार खरमरीत उत्तर दिलें आहे आणि राष्ट्रीय सभा भरवावयाचीच असा कायमचा संकल्प मद्रास वाल्यांचा आहे असें निश्चयपूर्वक कळविलें आहे. प्लेगाची भिती नाहीं असें ठिकाणच नाहीं. तेव्हां त्याला भिऊन आपली राष्ट्रकार्यें तहकूब ठेवणें चुकीचें होईल. मद्रासवाल्यांनीं आपला संकल्प शेवटाला नेण्यासाठीं कंबर बांधल्या आहेत हें पाहून आह्मी यांच्या दृढनिश्चयाची मोठी तारीफ करितों.

---

लार्ड रिपन सारखे उदार व्हाइसराय इंडियाला क्वचित्च मिळतील. त्यांचे या राष्ट्रावर मोठे उपकार आहेत आणि त्यांच्या उपकृती पैकीं स्थानिक स्वराज्याची संस्था ही अत्यंत श्रेष्ठ होय. स्थानिक स्वराज्याचे अधिकार इंडियन लोकांस देण्यांत त्यांचा हेतु फार वर्णनीय होता. राज्य कारभाराच्या गोष्टी सूक्ष्म मानानें नेटिवांच्या हाती द्याव्या ह्मणजे ते क्रमशः सरकारी कारभार चालविण्याला पात्र होतील. नेटिवांस अधिकार संपन्न व धुरंधर करण्याला त्यांनीं ही पहिली शाळाच स्थापली होती आणि मोठ्या आनंदाची गोष्ट कीं या शाळेचा अभ्यासक्रम पुरा करून नेटिव राज्यकारभाराच्या बहुविध व महत्वाच्या कार्यमालेंत पडण्याला लायक झाले आहेत परंतु सध्याच्या काळाला आह्मावर राजदृष्टि मोठी वक्रतेची आहे आणि या इतराजीला व गैरमर्जीला कांहींच कारण नाहीं ही मोठी खेदाची गोष्ट होय. सांप्रतचें प्रधान मंडळ या राष्ट्राला मोठें अनिष्टकारक आहे आणि हामिल्टनशाहींत कोणता प्रसंग ओढवणार नाहीं याची कल्पनाच नाहीं. स्थानिक स्वराज्यावर देखील प्रस्तुत दरबारची गदा बसली आहे हळूं हळूं हे स्थानिक स्वराज्याचे अधिकार संकोचित करण्यांत येत आहेत. सरकारचा बादशाहीपणा या संस्थेवर फार चालूं लागला आहे. निरनिराळीं कायद्याचीं बिलें काढून स्थानिक स्वराज्याचे हक्क काढून घेण्याचा विचार चालूं आहे. कलकत्ता, मुंबई, पुणे वगैरे सारख्या नामांकित मुनसिपालट्याला हुकूम सक्तीचे सुटले आहेत. या सर्व विघ्नाला मूळ कारण सरकाची क्षुद्र दृष्टी होय.

अशा दुःखद प्रकारामध्यें एखादा सुखाचा शब्द ह्मणजे मोठा आल्हादकारक वाटतो. सर हंटर साहेब यांनीं स्थानिक स्वराज्यावर एक नामी लेख लिहिला असून तो सर्वांस पसंत पडण्या सारखा आहे मुनसिपालिट्या व लोकल बोर्ड अशा दोन शाखा स्थानिक स्वराज्याच्या आहेत मुनसिपालिटींतून लोकप्रतिनिधींचें प्रमाण अधिक असतें आणि लोकमताला विशेष जोर असतो, हल्लींचें प्रधानमंडळ इंडियाला प्रतिकूळ आहे तथापि सरकार देखील कबूल करिते कीं गेल्या दहा वर्षांत स्थानिक स्वराज्याची अभिवृद्धी समाधानकारक आहे. लोकांची तत्परता सार्वजनिक कार्यासंबंधीं विशेष दृष्टीस पडते आणि शहर सफाईच्या स्वच्छपाण्याच्या पुरवठ्याच्या, गटाराच्या वगैरे सोयी पुष्कळशा झाल्या आहेत. सर हंटर ह्मणतात कीं कांहीं कांहीं गोष्टींत मुनसिपालिट्यांनीं इंग्लंडांतील कित्येक शहरावर चांगली सरशी केली आहे. एवढ्या स्तुतीवरच आमची तृप्तता नाहीं. आह्मी ह्मणतो कीं आमचे अधिकार अगदीं थोडे आहेत ते वाढविले पाहिजेत, लोकल बोर्डांत निवडणुकीचें तत्व अधीक घातलें पाहिजे, आणि नेटिवांवर विश्वास ठेऊन त्यांच्या हातून पुष्कळ कामगिरी बजाऊन घेतली पाहिजे इतक्या वर्षांचा अनुभव असा आहे कीं सरकारची कृपादृष्टी असती तर सध्यांपेक्षां बहुगुणित सुधारणा स्थानिक स्वराज्यांत झाल्या असत्या.

वऱ्हाड प्रांतांत सरकारचा शह मुनसिपालिट्यांवर व लोकल बोर्डांवर मोठा जबर आहे सरकारी धोरणानेंच सर्व गोष्टी चालतात तरी देखील आमच्या म्युनिसिपालिट्यांतील लोकनियुक्त सभासदांची संख्या कमी करण्याविषयीं खलबतें चालूं आहेत. मुख्य तत्वच अनुदार व क्षुद्र विचारांचें असून नेटिवांची पायमल्ली करण्याचें आहे. तें बदलून उदार बुद्धि सरकारनें पतकरल्या शिवाय कोणतीच चांगली गोष्ट संभवनीय नाहीं.

---

मद्रासच्या 'हिंदु' पत्रकर्त्यानें इटालीच्या सांप्रत स्थितीशी इंडियाच्या स्थितीची तुलना मोठ्या दूरदर्शिपणानें केली आहे. इटलींत ज्या अनिष्ट गोष्टी प्रस्तुत आहेत ह्यांचा पहिला प्रादुर्भाव या देशांतही होऊं लागला आहे. इटली मध्यें राजकीय जुलूमा मुळें प्रजा अगदीं गांजलेली व निराश आहे. निराशेनें इटालिअन लोक भयंकर अपराध बेधडक करितात, आस्ट्रिआच्या राणीला जिनीव्हा येथें मारणारा इटालिनच होता- अराजक मताचे लोक इटलींत फार झाले असून त्यांस खून ह्मणजे यःकश्चित् प्रकार वाटतो. इटलीची अशी अनवस्था होण्याला कारण युरोपिअन राष्ट्रांचीं राजकारणेंच होत. सुधारणेचा ध्वज फिरविणारीं राष्ट्रें राज्यतृष्णेनें लढाया करितात आणि लक्षावधि लोकांचे प्राण घेतात. पाश्चात्य भूतदया राक्षसी आहे हें दाखवितांना आमचे एक मित्र सहजी ह्मणाले कीं दसऱ्याला नेटिव लोक हेल्याचा बळी पाडतात ह्मणून इंग्लिश सरकार मोठी निर्भर्त्सना करितात परंतु तेंच सरहद्दीवरील लढायांत निरपराधी व स्वतंत्रताप्रिय लोकांचें प्राण घेत असतांना ख्रिश्चियन धर्म काडीमात्र आडवा येत नाहीं. अशाच राज्यतृष्णेखालीं इटलीचा चुरडा होऊन गेला आहे. तेथील लोक सरकारी करा खालीं चिरडले असून त्यांची विचारस्वतंत्रता देखील नष्ट केलेली आहे. लष्करी खर्च दांडगा असून इटालियन लोकांच्या शक्तीबाहेर आहे इतकेंच नाहीं तर राजद्रोहाचा कायदा असा केला आहे कीं स्पेन्सर सारखे तत्ववेत्ते, देखील राजद्रोहाच्या तडाख्यांत

सोंपवतील. इटलींतील लोकांचें मतस्वातंत्र्य नष्ट झाल्यामुळें ते खुषमस्करे किंवा भित्रे होऊन श्ववृत्तीचे बनत आहेत. इटलीच्या अधोगतीचें मूळ कारण तिच्या सरकारची राज्यतृष्णा होय. इटली व इंडिया यामध्यें पुरेंसें साम्य नाहीं. उभय देशची समाज रचना, राज्यकारभार व कायदेकानू हीं अगदीं भिन्न भिन्न आहेत तथापि इटली सरकारा प्रमाणें इंडिया सरकार आपली राज्यनौका लष्करी जोरावर सर्वत्र चालवीत आहे. हा लष्करी जोर मोठ्या प्रचंड खर्चाची बाब होय, आणि या खर्चाखालीं इंडिया देश अगदीं चिरडून गेला आहे. सांप्रत सरकारी करांचा अमर्याद बोजा, लोकांची निराशा, मुद्रण स्वातंत्र्यावरील गदा, लोकांच्या व सरकारच्या मनांची फाटाफूट, चलनी नाण्या संबंधा चे अपायकारक फेरफार इत्यादि गोष्टी इटलींतील भयंकर गोष्टीच्या पूर्वभागाप्रमाणें दिसतात. निदान वरील गोष्टी इंडियाला फार अभद्रकारक दिसतात. लार्ड एलजिन सिमल्यास अखेरचें भाषण करितांना बोलले कीं इंडियाचें राज्य तलवारीच्या जोरावर राखलें पाहिजे. परचक्र टाळण्याला किंवा राज्यवृद्धी करण्याला तलवारीचेंच बळ पाहिजे हें खरें परंतु इंडियाच्या अंतस्थ राज्यकारभार प्रजेची सावधानी, आबादानी, व राजनिष्ठा यांच्याच बळावर चालला पाहिजे लार्ड एलजिनची समशेरी कारकीर्द इंडियास अनर्थकारक झाली आणि याच समशेरीची गर्दी उडाली तर इंडिया इटलीच्या दशेला कां पोंचू नये हें आह्मास कळत नाहीं.

---

The Berar Samachar

MONDAY, OCTOBER 24 1898

The financial position of Berar is otherwise than satisfactory. With the large increases in the revenue according to the new assessments, the local Government should have been able to present a budget of prosperity. But the wonder is that the Government do not see their way to provide for the old expenditure towards education and other works of public utility. The Government of India have assumed the role of a solvent Government whereas their real bankruptcy-accounts have a parallel in the accounts of this province also. Economy is preached in all branches of administration whereas it is put into practice in regard to the services of school—masters, petty karkuns and peons. This is false economy. There is a big proposal of curtailing expenditure towards education. The Government do not patronize the cause of education according to the needs and requirements of the province. This province is backward in the progress of education. Ignorance prevails to an alarming extent. People are most illiterate and hundreds and thousands can be found who have not gone through the primary course of training. Such a state requires a liberal donation to the Educational department. But this is not to happen. The military expenditure must increase by leaps and bounds and so does the expenditure in maintaing a highly paid machinery of administration. The Pioneer of Alhabad has done us a great service when the learned editor of that organ of Government exposed to the public view the ruinous expenditure of the province. The imperial claim cannot be minimized and settled to a fixed sum. The Resident has probably certain orders to carry out when he quietly cuts down large items of the Local Funds or converts them to some other headings of expenditure. We are at a loss to understand how the Berar Government should be left to the pure mercy of the Viceroy in Council.

If any province in India requires an immediate adjustment between receipts and expenditure it is this province wherein we see that great agragrian problems are at stake for want of adequate founds On an agricultural province like ours it is very desirable to have a school of agriculture as well as a first—class technical school. Even the primary education is not allowed a free scope because there is the general cry for funds to maintain a sufficient number of primary schools for the province. This is indeed a sad tale. It needs no mention that public works also share a similar fate. We must however bear in mind that taxation in Berar is as high as in any other province. New taxes are being proposed and introduced from year to year in different and diverse ways. The municipal taxes are almost prohibitive to an unbearable degree. Within non-municipal limits, there is less of taxation but that does not take away the crushing nature of the general taxation in the form of the land tax, the in-come-tax, the school and Jagha cess &c. We request the local Government to see the necessity of reducing the heavy burden of taxation. There are two ways of reducing taxation. The first is the method of curtailing expenditure to the desired minimum standard. The second is to utilize the increasing balances towards educating the people and improving their moral and material condition. Both methods are the results of a solid economy. The second is but the corollary of the first. The principle at the bottom is just what the National Congress has been telling the Government of India. The demand of the imperial Government should be a fixed definite sum. The provincial Government should be free to follow their own policy. The administrative machinery in Berar is very expensive and more efficient than necessary. This province is a Bombay Presidency in the miniature. The province needs no more than three Collectorates at the most. If this reform of dividing the province into 2 or 3 districts instead of 6 districts be carried out we think that a large saving will be effected in expenditure without any detriment to the efficiency of the administration. Such a programme has often beed talked about for the last 5 years but no body approaches the subject with a high sense of duty and a real heart to solve it. This question will be the crucial test of the intentions of the Government and if people learn that the Resident has this noble mission before him in right earnestness they shall be very grateful and confiding in the righteousness of the British rule.

"Jowari is the staple food-grain of the province, and was largely cultivated this year; the area shows an increase of 440,175 acres; and the harvest being a particularly good one, the yield was 6,304,654 maunds in excess of the crop of the previous year. The wheat harvest also gave more favourable results; whilst the area under cultivation remained almost the same, the outturn increased by 446,952 maunds. The yield of gram was double that of the previous year, and the estimated outturn per acre of rice was 2 maunds 15 seers against 1 maund 3 seers in 1896—97. In fact the whole harvest of food-grain was satisfactory, and tended largely to place the province once more in a normal condition as regards stocks.

With an excessive area under food—grains the cultivation of cotton fell off by 156,107 acres, but the estimated yield per acre being placed at 2 maunds and 5 seers against 1 maund 18 seers in the previous year, the outturn increased by 1,260,412 maunds. Compared with the cotton crop of 1895—96, which was reported as an exceptionally good one, the total outturn of the present year only falls short by 115,492 maunds, so that in this respect also the cultivators were fortunate. The light rainfall in October was favourable to the gathering of the cotton crop.

The area under oilseeds was larger by 30,030 acres, and the produce shews an increase of 635,855 maunds, the yield being more than three times that of previous year. Generally speaking, then the harvest of the year 1897—98 may be described as much above the average, and coming, as it did, after a year of scarcity, went a long way towards ameliorating the condition of the cultivators."

Trade Report.

---

## वऱ्हाड

हवामान— थंडी चांगली पडूं लागली आहे. पण हवेमध्यें एका दिवसामध्यें फार फेरफार होतो. उष्णतेचें मान ७० अंशा पर्यंत उतरतें तें दिवसा ९० अंशाच्या पुढें जातें. यामुळें लोकांस थंडी पेक्षां उष्णतेचा ताप कडक भासतो. किरकोळ दुखणीं जोरावर आहेत. रोगराई बिलकूल नाहीं.

मि० गाडविन आस्टीन डिपुटी कमिशनर हे रजेवरून परत येऊन बुलढाण्यास गेल्या सोमवारी रुजूं झाले आणि मि० रुस्तुमजी फर्दूनजी साहेब हे अकोल्यात येऊन दाखल झाले.

मि० रुस्तुमजी फर्दूनजी साहेब डेपुटी कमिशनर हे बुधवारीं या जिल्ह्याचा चार्ज घेतील आणि मि० प्रीडो साहेब हे वाशिम जिल्ह्याचे डेपुटी कमिशनर होतील.

पंडित सुरज नारायण असि० कमिशनर, बुलढाणा हे प्रकृती बिघडली असल्यामुळें तीन महिन्यांच्या रजेवर लवकरच जाणार आहेत. आणि त्या रजेंत रा० रा० गणेश बापुजी ए० असि० कमिशनर यांची बदली मलकापुराहून बुलढाण्याच्या कोर्टावर होणार असून बुलढाण्याहून मि० अनवर अल्ली ए० असि० कमिशनर हे मलकापुरास येतील असा संभव आहे.

वाशिम जिल्ह्यांतील पोफळी गांवीं सुलतान वल्लद शेखचांद नांवाच्या इसमाला तारीख १० एप्रील १८९८ रोजीं महादु वल्लद संभाजी यानें ठार मारल्या बद्दल गेल्या आगष्टच्या सेशनांत चौकशी होऊन त्यास खुनाबद्दल शिक्षा झाली होती परंतु हाय कोर्टानें त्यास निर्दोषी ठरवून सोडून दिलें. खुनाचें कारण असें होतें कीं महादूच्या बायकोशी सुलतान लागूं होता. या खुनाच्या चौकशीला प्रारंभ चमत्कारिक तऱ्हेनें झाला. सुलतान नाहींसा झाल्या नंतर तीन महिन्यांनीं तो आपली आई दुलंत्री इच्या स्वप्नांत गेला आणि त्यानें वधाची गोष्ट कळविली. लागलीच दुसरे दिवशीं चौकशी होऊन आरोपीला माजि० समोरें उभे केलें.

मि० लूकस सेशन जज्ज हे उमरावतील परत गेले असून त्यांच्या रजेंत तूर्त मि० सिम्पसन, डेपुटी कमिशनर वाशिम हे सेशन जज्ज होतील.

मलकापूरास एका मुसलमानानें आत्महत्या तारीख २० रोजी केली आणि तो काल रोजीं एका विहिरींत आढळला. आत्महत्येला कारण त्याच्या बायकोचें गैरवर्तन असावें असें सांगतात.

बालविधवा तानी इजवरील बालहत्येच्या अपराधाची चौकशी गेल्या गुरुवारीं होऊन शुक्रवारीं तिला काळें पाण्याची शिक्षा सांगण्यांत आली.

मि. प्रीडो साहेब यांच्या सन्मानार्थ खानगी रितीच्या पानसुपाऱ्या, मेजवान्या वगैरे प्रेमदर्शक गोष्टी आकोल्यास चालूं आहेत. साहेब बहादूर चांगले लोकप्रिय असून त्यांच्या दयाशील कारभारा बद्दल लोक यांस फार चहातात.

मि. एफ. एल. क्राफर्ड असि० कमिशनर यांस असिस्टंट कमिशनर वर्ग १ चे सर्व मुलकी अधिकार व दिवाणी अधिकार, देण्यांत येऊन खामगांवच्या स्मालकाज कोर्टाचेही संपूर्ण अधिकार देण्यांत आले.

मि. हशमतअल्ली आफि० एक्स्ट्रा असि० कमि० यांस औरंगाबादेहून यवतमाळास बदललें असून मि. हैदरअल्ली एक्स्ट्रा असि. कमि. यांस औरंगाबादेस जुडिशिअल सुपरिन्टेंडेंट नेमण्यांत आलें.

इलिचपूर सिटी मुनसिपालिटीच्या हद्दींतील गाड्या घोड्यावर व इतर जनावरावर सहा माही कर गेल्या ३ तारखे पासून बसविल्या विषयीं अलिशान रेसिडेंट साहेबांचा हुकूम झाला आहे.

---

## वर्तमानसार

फलोधी, जिल्हा जोधपूर येथून एक गृहस्थ कळवितात कीं गेल्या १९ वे तारखेला सकाळीं ८। वाजण्याच्या सुमाराला पृथ्वी दोन तीन मिनिटें पर्यंत थरथर कांपत होती पण कांहीं नुकसान झालें नाहीं.

हिंदुस्थान व चीन यांच्या दरम्यान व्यापार वृद्धी होण्याच्या उद्देशानें कलकत्याच्या व्यापाऱ्यांनीं आपले कांहीं मुखत्यार चीनास पाठविण्याचें ठरविलें व त्यांस सरकारानेंही मंजुरी दिली. अ०

अपर ब्रह्मदेशामध्यें लागवड करण्यास योग्य अशी पुष्कळ जमीन ओसाड पडली आहे आणि ती लागवड करून तेथें स्थाईक होण्याकरितां हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतून लोकांस आमंत्रणही करण्यांत येत आहे. के० त०

लिडन येथें जगाचे सर्व भागांच्या मुसलमान लोकांचे मुख्यारांची सभा भरून त्यांच्या धर्माचे मुख्य जे सुलतान त्यांचें आयुष्य, सुख व भरभराट वाढावी ह्मणून ईश्वरप्रार्थना झाली. आणखी सर्व जगाचे मुसलमान लोकांची एकी सुलतानचे पुढारीपणाखालीं पक्की राखणें फार इष्ट आहे अशा प्रकारची भाषणेंही झालीं.

औदुंबर येथील श्री पूर्णानंदस्वामी संस्थान मठ औदुंबर हे समाधिस्त झाल्याचें कळतें यांचें वय १०२ वर्षांचें होतें. हे स्वभावानें फार आनंदी असून विद्येनें चांगले सुजाण असून निरिच्छ होते.

शु० सू०

गांवच्या लोकांनीं बाहेर जाण्याचा प्रसंग आल्यास आपला विषय कोठें ठेवावा, कोण संभाळतो? ह्मणून मे० कलेक्टर साहेबानां विचारलें होतें. त्यावरून त्यांनीं मुंबईच्या मोठमोठ्या ब्यांकेला कळविलें. त्यांपैकीं फक्त मुंबई ब्यांकेनें पुढील अटींवर विषय ठेवून घेण्याचे कबूल केले आहेः—विषय ठेविलेली मोहरबंद पेटी २ फूट लांब, २ फूट रुंद आणि अर्धा फूट उंच—यापेक्षां जास्त नसावी. पेटी ठेवतांना १० रुपये, परत नेताना १० रुपये आणि सालीना १० रुपये दिले पाहिजेत. अवश्यकांनीं वरचे ब्यांकेच्या सेक्रेटरीला अर्ज करावा.

उटकमंडहून एक लष्करी नेटिव्ह सुभेदार त्रिचनापल्लीस चालला होता. बरोबर बायको होती. बायकोला तिसऱ्या क्लासच्या डब्यांत बसवून हे दुसऱ्या क्लासच्या डब्यांत बसले होते. जातां जातांना वाटेंत एका स्टेशनांत या सुभेदाराच्या बायकोला आजारानें पछाडलें तेव्हां तिला उतरून घेऊन प्लेग आसिपटलमध्यें नेऊन ठेविलें. ही खबर सुभेदाराला कळलीच नाहीं. सुभेदार त्रिचनापल्लीस उतरून पाहातात तों बायको गाडींत नाहीं. ते केव्हां शोध करतांना फलाण्या स्टेशनांत तिला उतरविलें असें समजलें. ह्मणून ते त्वरेनें परत गाडीनें तेथें गेले आणि आसिपटलांत जाऊन बायकोला भेटले. बायकोनें झालेला प्रकार नवऱ्यास सांगितला. त्याबरोबर त्यांनीं समशेर काढून त्या दवाखान्यावरील एका आफीसराचे तुकडे केले आणि दुसऱ्याला जखमी केले व स्वारी निसटून गेली. अद्याप यांचा पत्ता नाहीं. लष्करी लोकां बरोबर वागणें फार कठीण आहे.

समुद्राची लाट जशी सर्वदिशी निघून जाते, तशी मानवी स्थिति आहे. जो क्षण हातीं लागेल तो प्रत्येकानें आपल्या कामीं लावावा यांतच शहाणपणा आहे.

सन १८९१ पासून १८९६ पर्यंत पांच वर्षांत हिंदुस्थानांत अजमासे २ कोटी १३ लक्ष कज्यांचा निकाल करण्यांत आला. त्यांपैकीं १ कोटी ३६ लक्ष दिवाणी, ६० लक्ष फौजदारी व बाकीचे मुलकी कज्जे होते.

हिंदुस्थानांतील सरकारी एकंदर २,८४,८०० एतद्देशीय नोकर आहेत. पण हे सर्व हलक्या प्रतीच्या नोकऱ्या करणार आहेत.

इंग्लंडांत (!) एथें जे लोक डाक्टरी धंदा करितात ते असे प्रामाणिक आहेत कीं सांगितलेल्या मुदतींत रोगी बरा न झाला तर औषधाचे आणि भेटीचे देखील पैसे परत करितात! आमचे इकडील कैक डाक्टर जळवांसारखे पैसे काढून घेतात. हें केवढें अंतर आहे पहा!

दीडशें भाषांचा छापखाना!—आक्सफर्ड एथें जो विश्वविद्यालयींन छापखाना (युनिव्हर्सिटी प्रेस) आहे, त्यांत जगांतील १५० भाषांमध्यें ग्रंथ छापतां येतील इतक्या प्रकारचे व तऱ्हेचे टाईप वगैरेची मुद्रण व्यवस्थेची सिद्धता ठेविली आहे. एवढ्या तयारीचा छापखाना जगावर इतर कोठें ही असल्याची माहिती नाहीं. धा. वृ

सर्पमंदिर—डाहोमी राज्यांतील वडी नांवाच्या एका लहानशा शहरांत एक सर्पमंदिर आहे. त्या मंदिरांत सर्व जातींचे व आकारांचे सर्प राखण्यांत आले असून त्यांची पूजा करण्यांत येते. त्या सर्पांना तेथील लोकांकडून अनेक प्रकारचे पक्षी व बेडूक यांचे नैवेद्य येतात. आणि ते सर्व त्यांस खाऊं घालण्यात येतात. आणि ह्या प्रमाणें तें सर्पमंदिर तिकडे फार प्रसिद्ध आहे.

एक फार भव्य पुरुष!—ओरडवेली येथील एका जूररास कचेरींत येण्याची माफी तेथील जज्जानें दिली. ह्या जूररांचें वजन ३१० पौंड ह्मणजे सुमारें ३ मण असून तो एक फारच मोठा व भव्य पुरुष असल्यामुळें जूरर लोकांसाठीं तयार केलेल्या पिंजऱ्यांत व तेथें ठेवलेल्या खुर्चीत तो मावत नाहीं आणि ह्यासाठीं वर लिहिल्याप्रमाणें त्यास जूरीचे कामास हजर राहण्याची जज्जाकडून माफी देण्यांत आली.

विद्यार्थ्यांचें कृत्य—आजपर्यंत कधीं कोठें कोणी ऐकिलें नाहीं, असें एक कृत्य यू. स्टे. अमेरिकेंतल्या विद्यार्थ्यांनीं केलें आहे. त्या विद्यार्थ्यांनीं आपल्यांत वर्गणी करून एक लढाऊ गलबत [आगबोट] बांधण्याची सिद्धता केली असून त्या आगबोटीस "अमेरिकन मुलगा" असें नांव देण्याचें ठरविलें आहे. ही आगबोट नाश पावलेल्या मेन नांवाच्या अमेरिकन बोटीच्या स्मरणार्थ तयार करण्यांत येत आहे.

प्रवेश न झालेला प्रदेश—जगावर अजून मनुष्यांचा प्रवेश झाला नाहीं असा २ कोटी चौरस मैल प्रदेश राहिला आहे. त्यांत आफ्रिकेंत ६९ लाख चौरस मैल प्रदेश बिन पाहिलेला कोराच राहिला आहे. उत्तरध्रुवाकडे ३६ लाख चौरस मैल प्रदेश अजून अगम्य असा आहे. दक्षिणध्रुवाकडे ५३ लाख चौरस मैल, आस्ट्रेलियांत २० लाख चौरस मैल आणि इतर द्वीपें वगैरेंतील ९ लाख चौरस मैल प्रदेश मनुष्यप्रवेशावांचून व कोणत्याही प्रकारच्या शोधावांचून राहिला आहे.

प्यारिसमध्यें सुतार वगैरे मंडळीचा संप—प्यारिसमध्यें घरें बांधणाऱ्या सुतार वगैरे सुमारें ६०,००० लोकांनीं संप करून आपले उद्योगधंदे बंद पाडले आहेत. ह्या संपानीं इतर लोकांस उत्तेजन येऊन कांहीं दंगे वगैरे माजतील ह्मणून फ्रेंच सरकारानें २०,००० स्वार, शहरांत शांतता राखण्यासाठीं ठिकठिकाणीं ठेविले आहेत. प्यारिसमध्यें १९०० सालीं भावयाच्या प्रचंड प्रदर्शनाच्या इमारतीचें काम वरील संपानें बंद पडलें आहे. हा संप होण्याचें कारण काय तें अजून नक्की समजलें नाहीं. तरी पण अशी बोलवा आहे कीं, कोणी तरी कांहीं राजकारस्थानाचें निमित्त त्या लोकांचे मनांत भरवून त्यांस संप करण्याबद्दल चेतवून दिलें आहे. ज्ञा. च.

हिंदुस्थानच्या कोर्टांत फी अल्पांत लवकर च फेरफार होणार आहे. कोर्टांत जाऊन भांडणाऱ्या रयतेच्या हिताचा कीं सरकारच्या हिताचा?

फ्रान्सच्या हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत झुगारून देऊन नवी राज्यव्यवस्था सुरू करण्याच्या हेतूनें लष्करी खात्यांत कांहीं फितुरी झाल्याचें बाहेर आलें आहे.

रशिया, इंग्लंड व जर्मनी यांचे थोडथोडे लष्करी लोक पेकीन येथें येऊन शहरांत शिरले.

जपान आपली २ लढाऊ गलबतें चीनास पाठवीत आहे.

रशियाची कोसाक फौज कायम पणानें पेकीन येथें राहणार असें ह्मणतात.

यांत रशियाचे शिपाई जास्त आले हें बरोबर नाहीं असें चिनी प्रधानाचें ह्मणणें आहे.

जपानची आणखी कांहीं फौज पेकीन येथें जात असून फ्रान्स व इटाली यांचीही जाणार.

न्युचंग रेलवे वाढविण्या करितां हांगकांग शांघाई या ब्यांकेपासून २,५०,००,००० रुपये कर्ज घेण्याचा चीन सरकारानें दस्तैवज केला.

इटालीनें आपले ३३ शिपाई पेकीन येथें पाठविले.

तुमच्या चिनी बंडखोरांनीं आमच्या एका फ्रेंच माणसास पकडून ठेवलें आहे त्यास लवकर सोडून द्या, नाहीं तर फ्रेंच फौज तुमच्या मागें लागेल अशी फ्रान्सनें चीनास एक धमकी दिली आहे.

हिंदुस्थान व अमेरिका यांच्या दरम्यान चालणारा व्यापार वाढावा ह्मणून अमेरिका व हिंदुस्थान यांच्या दरम्यान गेल्या वर्षापासून एक नवा आगबोटीचा रस्ता सुरू झाला आहे.

घरपट्टी बद्दल हायकोर्टाचा ठराव—वाई येथील रा. कृष्णाजी गंगाधर रास्ते व दुसरे दोघ घरवाले यांनीं, तेथील म्युनिसिपालिटीनें केलेली घरपट्टीची आकारणी, घरांचे सालीना भाड्याचे मगदरापेक्षां जास्त आहे अशा तक्रारीमुळें दिली नाहीं. ह्मणून त्यांनवर सेक्रेटरीनें माजिस्त्रेटपुढें खटले केले. त्यात माजिस्त्रेटांनीं भाड्याचे मगदुराबद्दल पुरावा घेऊन ५० रुपयांच्या ऐवजीं १२ रुपयेच सालीना भाड्याचा मगदूर ठरवून त्याबर केलेली २॥ रुपये आकारणी ठरविली. ह्या कामांत अपील झाल्यावर हायकोर्टानें तारीख ९ सप्टेंबर १८९८ रोजीं ठरविलें कीं, म्यानेजिंग कमेटीनें ठरविलेला भाड्याच्या मगदुराचा अजमास फिरविण्याचा माजिस्त्रेटला मुळींच अधिकार नाहीं. तो अधिकार म्यानेजिंग कमेटीचा असून ह्या कामांत आरोपींनी घरपट्टीची पूर्ण रकम द्यावी, असें ठरविलें.

पृथ्वींतल्या सगळ्या गिरण्यांतल्या चात्यांची संख्या.—पृथ्वींत वेगळाल्या देशांत ज्या अनेक गिरण्या आहेत त्या सर्वांत मिळून सूत काढण्याच्या चात्या वाफेच्या योगानें कोणत्या सालीं किती चालू होत्या त्याचा तपशील पुढील प्रमाणें आहेः—

| देश | १८९७ | १८९६ | १८९५ | १८९४ |
|---|---|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन .... .... | ४,४९,००,००० | ४,४९,००,००० | ४,५४,००,००० | ४,५१,९०,००० |
| इतर राष्ट्रें .... .... | ३,०३,२०,००० | २,९३,५०,००० | २,८१,५०,००० | २,७३,५०,००० |
| एकंदर युरोपांत .... | ७,५२,२०,००० | ७,४२,५०,००० | ७,८६,५०,००० | ७,२५,४०,००० |
| एकंदर अमेरिका .... | १,७३,९६,९३७ | १,६८,११,१९४ | १,६१,३३,२४८ | १,५८,४१,०६४ |
| ईस्ट इंडिज .... .... | ४०,६५,६१८ | ३९,८२,९४५ | ३८,०९,०२९ | ३६,४१,००० |
| जपान.... .... .... | ७,७३,७३८ | ७,५७,२९६ | ५,८९,९४५ | ५,३१,०७४ |
| चीन .... .... .... | ४,८०,००० | २,७५,००० | १,१३,२०० | ६९,२०० |
| हिंदुस्थान वगैरेच्या एकूण | ५२,६७,३५६ | ४९,४५,४४१ | ४५,०६,०७४ | ४२,३७,२७४ |
| पृथ्वींत एकंदर .... .... | ९,७८,५५,८९३ | ९,६०,२८,३३३ | ९,४२,८०,८९२ | ९,२६,४८,३२८ |

आयुष्य सुखानें जाण्यास मनुष्याच्या अंगीं काम करण्याची खुबी असली पाहिजे. खुबी शिवाय स्वावलंबन, आत्मसंयमन इत्यादि गुणांना विशेष तेज येत नाहीं. अंगीं मोठी विद्वत्ता व शहाणपण असून केवळ खुबी नसल्यामुळें जय मिळविण्याच्या आलेल्या अनेक उत्तम संधी फुकट घालविणारीं पुष्कळ माणसें आमच्या पहाण्यांत आहेत. खुबी ठाऊक नसल्यामुळें भिक्षाचा रोग लागलेली व आश्रयदात्यांच्या आश्रयास मुकलेलीं पुष्कळ मनुष्यें आह्मी पाहिलीं आहेत व खुबी नसल्यामुळेंच मोठ्या दमाच्या, दृढनिश्चयी व दीर्घोद्योगी लोकांचें पुष्कळ आयुष्य व्यर्थ गेलेलें आह्मांस ठाऊक आहे. खुबी ही बुद्धीला देखील मार्गे सारिते. एका बड्या निबंधकारानें बुद्धि व खुबी यांची एके ठिकाणीं अशी तुलना केली आहेः— "बुद्धि ही शक्ति आहे; खुबी हें कसब आहे. बुद्धि हें वचन आहे; खुबी हा टेंकू आहे. बुद्धीला काय करावें हें समजतें; खुबीला तें कसें करावें हें समजतें. बुद्धीच्या योगानें मनुष्य मानाई होतो; खुबीच्या योगानें त्याला प्रत्यक्ष मान मिळतो. बुद्धि ही संपत्ति आहे; खुबी हा पैका आहे. बुद्धीला शत्रु उत्पन्न होतात; खुबीला मित्र येऊन मिळतात. बुद्धीला संधीचा उपयोग करितां येत नाहीं; खुबीला तो करितां येतो.

ग्रं० र०

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

TER No. N. 4

किरकोळ अंकास ........................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... .......८१

Six monthly........ 3 .............. 8 as
Single copy ..............................4 as
Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 31 OCTOBER 1898 NO 43
वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख ३१ माहे आक्टोबर सन १८९८ इ० अंक ४३

### जाहिरात

#### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या मेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

### जाहिरात

मी केंब्रीज कालेजांतून पास होऊन आलें। नाहीं ह्मणून माझे औषधाकडे कोणी लक्ष्य देणार नाहींत काय? नामधारी डाक्टर लोकांनीं हात टेकलें ह्मणजे औषधच नसतें का? आज १८ शेंवर रोगी नीट झाले तिकडे कोणी लक्ष्य देणारे नाहींत का! हा माझा लेख कलेक्टर साहेब, पोलीस सुपरीन्टेंडेंट साहेब, नामदार गव्हरनर साहेबाचे सेक्रेटरी आपआपल्या अंमलदारापुढें आणतील काय? माझे ह्मणणें खरें कीं खोटे याचा विचार सरकार व संस्थानिक करतील कां? अगदीं अनुभवानें कळवितो कीं—

**संन्निपात नांवाच्या वनस्पतीच्या मुळ्या मजजवळ आहेत ती मुळी जवळ बाळगल्यानें सांसर्गिक रोग ब्युबानीक प्लेग होत नाहीं, यदा कदाचित् दुर्दैवानें झालाच तर मनुष्य मरणार नाहीं. १६ मुळ्यांस १ रुपया.** प्लेगवरील वनस्पतीचें औषध डबीस रुपये २ ( गांठीवर लावण्याचें व पोटांतील ). धारवाडांत प्लेग फार आहे तर तेथील अंमलदार कलेक्टर साहेब स्वतःस बोलावून उपचार करण्याची परवानगी देतील काय? **३० दिवसांत प्लेग हटविण्याची हमी घेतो.** मुळ्या व औषधी विकण्याकरितां मुंबई व इतर ठिकाणीं दुकानदार किंवा इतर एजंट मिळतील काय!

सरकारास विनंती.

औषधी अनुभवून पहावी. खरी असेल तर त्या प्रमाणें विचार व्हावा, किंवा खोटें असल्यास बंद करावे औषधाचा आयुष्याशीं संबंध असतो.

ता० ९।१०।९८.

वैद्य—जयसिंगराव रामचंद्र.
मुक्काम—पोस्ट केळवे माहीम.

### नोटीस.

नोटीस बेशमी सूर्यभान वल्लद विठोबा पाटील राहणार मौजे पनौर तालुके दर्यापूर यांस:--

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे हिंगणी मिर्जापूर येथील तुमचे नांवची जमीन सरवे नंबर २३-४४ ही जमीन मजकडेस आरद बटाईनीं सन १३०९ फसली अखेर पावेतो आहे त्या प्रमाणें सन १३०७ फसली साली मी जमीन वाहीली. कपाशीची वेचणी सुरू झाल्यापासून मी तुह्मास ह्मणत गेलो कीं मजला रसीद देऊन आरद बटाईचा माल घेऊन जात जावे परंतु तुह्मी मजला रसीद लिहून देऊन माल घेऊन गेला नाहीं. तुमचे शेतात तुमचे हिशाचा माल कापूस खंडी दोन व जवारी खंडी दहा मजपासी आमानत पडला आहे तो ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत घेऊन जाऊन मजला रसीद द्यावी व सालीम शेताचा सरकारी सारा मी दिल्हा आहे त्या प्रमाणें करारा प्रमाणें तुमचे कडेस रुपये १५८—॥ पंधरा रुपये दीड आणा निघत आहे तेही देऊन रसीद द्यावी. तसे तुमचे कडून न झाल्यास व विनाकारण मजवर फिर्याद केल्यास त्या खर्चाची जबाबदारी मजवर नाहीं. तसाच कडब्याचा गुड तुमचे हिशाचा निमे तुमचेच शेतात लावून दिला आहे तो ही रसीद लिहून देऊन न्यावा व सालमजुरीही ह्मणजे सन १३०८ फसली सालीही बरेचवर रसीद लिहून देऊन शेतातील आपले हिशाचा माल घेऊन जात जावे. कळावे तारीख २९ अक्टोबर सन १८९८ इसवी.

सही.
नरसाजी वल्लद हणवतजी ठोळे
राहणार पनौर तालुके दर्यापूर दस्तुर खुद्द.

### नोटीस.

रा० रा० पुंजाजी वल्लद हनवती दराडे राहणार बांबर्डे तालुके अकोट जिल्हे अकोले याजवर.

नोटीस देणार गोपी मर्द माहादु कांदे राहणार आंतरगांव तालुके दर्यापूर जिल्हें इलीचपूर इज तर्फे मुखत्यार बापूजी वल्लद हबाजी काजगे राहणार बांबर्डे याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझी जेठानीं नामे भागाई मर्द पिराजी कांदे राहणार बांबर्डे तालुके अकोट ही हल्ली मैत झालेली आहे इची व माझी सर्व जिनगी वडिलोपार्जित जमीन व घर कवेलूचे वसतीसुद्धा व एक कोठा व एक बैलाची जोडी व एक गाडे, जवारी खंडी ५ व घरातील रोख रुपये ५०० पांचशे व घरांतील जिनगी व चांदी सोन्याचे डागिनें सर्व तुमचे ताब्यांत आहे. याजबद्दल मी दिवाणींत दावा मिळण्याबद्दल सरकारांत काम चालविले आहे तर त्याचा सर्व निकाल होई तो पावेतो तुह्मी त्या जीनगीची अफरातफर करूं नये व अफरातफर केल्यास त्याजबद्दलचे जबाबदार सर्व प्रकारे तुह्मास राहावें लागेल. या शिवाय तुह्मी शेत वगैरे कोणास विकत किंवा खरीदी देऊं नये व दुसरे असे कळविले जाते कीं भागाई मर्द पीराजी इने जे तुह्मास जीवंत असतांनां खरीदी दिल्हे पैकी भांबरडे येथील सरवाई नंबर २३ एकर ५४१ गुंठे अकार रुपये ८ हे शेत घरचे आहे यांत कोणाचा हिस्सा नाहीं व वितापूर येथील शेत सर्वेइ नंबर १४ एकर ३८४७ गुंठे आकार रुपये ६२ व मौजे बांबरडे यथील सर्वेइ नंबर ६८ एकर २१८।३ गुंठे आकार रुपये ३१ यांचे खाते ह्मणजे ह्या दोन्ही शेताचे खाते दुसरे इसमाचे नावे आहेत या दोन्ही शेतात माझा $\frac{1}{4}$ हिस्सा आहे हे तीन्ही शेताची व इस्टेटीची तुह्मास जगाई इने पैसे न घेतां खोटी खरीदी करून दिली आहे तर तुह्मी माझ्या फिर्यादीचा निकाल होई तो पावेतो कोणासही तुह्मी खरीदीखत दिल्यास जबाबदार आहा ह्या नोटीसीचे खर्चां सुद्धां सर्व नुकसान भरून घेतलें जाईल.

सही
गोपी मर्द महादु कांदे तर्फे मुखत्यार बापुजी वल्लद हबाजी
काजगे राहणार बांबरड
दस्तुर खुद्द.

### ॥ श्रीजयतितराम ॥

#### — मंत्र रामायण नं. ४

प्रथम मनुष्यानें आपल्या वर्णाश्रमास अनुरूप क्रिया करून मानस शुद्धी करून घ्यावी. नुसती अमुक एक गोष्ट चांगली किंवा वाईट असें समजणें व त्याप्रमाणें वर्तन घडणें या दोन गोष्टींत फार अंतर आहे हें सिद्ध करण्यास मुळींच श्रम लागणार नाहींत. कोणतीही गोष्ट चांगली समजली किंवा हितकर दिसली ह्मणजे त्याप्रमाणें ती अमलांत आणण्यास नैतिक धैर्य किंवा मानसिक शुद्धि पाहिजे. परद्रव्यापकर्ष करणें ह्मणजे महत्पाप होय हें चोरास सुद्धां समजतें परंतु मानसिक शुद्धीचा अभाव असल्यामुळें त्या प्रमाणें वर्तन होत नाहीं. हीच गोष्ट अंशतः प्रत्येक सुधारणा-अग्रणीस लागूं पडते. मानस शुद्धी होऊन साधनाची सर्व तयारी झाल्यावर मग आत्मबोध होण्यास सद्गुरू शोधावा. मूर्तीची पूजा, मूर्तीचें पूजन, अर्चन व भजन हीं केवळ पुढील ह्मणजे शुद्ध मानस होई तोंपर्यंत अध्यात्मज्ञानाची तयारी होय. ही वास्तविक स्थिती असतांना कित्येक पाद्री हिंदूचा धर्म नीतिविघातक ह्मणून शंखनाद करितात व अतीशय दुःखाची गोष्ट ही कीं आमच्या विद्वान मंडळींतील कांहीं मंडळी तो सूर ओढण्यास तयार असतातच. सर्व वर्णाच्या, सर्व दर्जाच्या, सर्व स्थितींच्या लोकांस त्यांच्या वर्णानुरूप, दर्ज्यानुरूप, स्थित्यनुरूप निरानिराळे मार्ग लावून देणारा व अखेरीस सर्वांसच अर्थातच तो मनुष्य कोणत्याही वर्गाचा, कोणत्याही जातीचा, कोणत्याही स्थितींतला असो:—मानसिक शुद्धि एकदां झाली ह्मणजे भेदाभेद न करितां अध्यात्माच्या एका कंपूत आणून सोडणारा असा हिंदुधर्म कोणीकडे व इतर धर्म कोणीकडे! नुसते रामदास पंथी, ज्ञानेश्वराचे अनुचर, हरबर्ट स्पेन्सरचे निस्सीम भक्त व मिल्ल हिक्सले प्रभृती तत्व ज्ञान्यांचे अनुयायी व 'वादे वादे जायते तत्व बोधः' या वाक्यावर निर्वाह करून हिंदुस्थान समाजाची संक्रमणावस्था आहे असें ह्मणून उदासीन बसणारे भक्त अलिकडे गल्लोगल्लीला आढळतात. परंतु त्यांचा काय उपयोग? मानस शुद्धि होऊन विगतकल्मष वर्तन होई तोंपर्यंत त्यांच्या ज्ञानाचा कांहीं उपयोग नाहीं. धर्माकडे नैतिक दृष्टीनें पहावयास पाहिजे अशी एक नवीनच शाखा उत्पन्न होऊं पहाते आहे त्याचा विचार अन्यस्थलीं करितां येईल परंतु धर्माचा खरा उद्देश व तो हिंदुधर्मानें कितपत साध्य होतो या विषयीं एका पाश्चात्य विद्वानाचें विचार देऊन हें बरेंच लांबलेलें विषयांतर संपवितो.

प्रोफेसर म्याक्समूलर यांनीं मागील वर्षीं वेदांतावर तीन मोठालीं व्याख्यानें दिलीं त्यांत ते असें ह्मणतात:—

If Philosophy is meant to be a preparation for a happy death or Euthnasia, I know of no better preparation for it than the Vedanta philosophy.

पुनः ते ह्मणतात:——

Vedanta is the most sublime philosophy, the most satisfying religion.

जन्मपरंपरा हें हिंदुधर्माचें मुख्य तत्व होय त्यावर ते ह्मणतात:—

Part of the work is already accomplished viz the doctrine of the transmigration of the souls is possibly by this time a general belief in Europe.

दुसऱ्या धर्माशी तुलना केल्यावर ते ह्मणतात:—

The Vedanta religion is of eternal hope.

असल्या अध्यात्मकंपूंत महार, मांग, चांभार, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, ब्राह्मण सर्व येतात व यांचा एक स्वतंत्र अध्यात्म तयार बनते असें ह्मणण्यास हरकत नाहीं परंतु मानसिक शुद्धि होऊन जोंवर त्यांचा तिरस्कार झाला नाहीं तोंपर्यंत कुंभाराचा कुंभार, वाणीचा वाणी, शूद्राचा शूद्र व ब्राह्मणाचा ब्राह्मणच राहिला पाहिजे निरनिराळ्या जातीस निरनिराळा मार्ग लाविला यावरून ब्राह्मणास कांहीं अज्ञ लोक व विशेषतः कलहप्रिय पाद्री मंडळ पक्षपाती असें ह्मणतात, परंतु तसा प्रकार दिसत नाहीं. वर्णाश्रमाप्रमाणें निरनिराळा मार्ग दाखविण्यांत उलटें ब्राह्मणांनीं पूर्वसंस्कारांचें महत्व ( यासच इंग्रजींत Heredity असें ह्मणतात ) दाखवून आपली दूरदृष्टी किती आहे हेंही प्रदर्शित केलें. आलिकडील शास्त्रीय शोधांनीं सुद्धां या पूर्व संस्कारांचें स्वरूप कांहीं तरी ठाम आहे असें निश्चयात्मक सांगतां येतें. असो, हिंदुधर्माचें महत्व वाखाणण्याचें सोडून आपण आपल्या प्रस्तुत विषयाकडे वळूं.

पवित्र शास्त्राचा आकस्मिक उदय झाल्यानें हिंदुंच्या आचार विचारांत काय रूपांतर होईल याची त्यास कल्पना सुद्धां नसावी ह्मणूनच तो विचार करी

नृप मुद्रांकित पत्र प्रजेसि होतें
नसें शिरोधार्य ।
प्रभु चारित मंत्र चिन्हित यास्तव धारितील
मस्तकीं आर्य ॥

असें ह्मणतो. खरेंच आहे. पर द्वीपस्थ नृप मुद्रांकित पत्र स्वातंत्र्याभाव नष्ट दशेनें कसेंही असलें तरी एकदां सोडून शंभरदा शिरोधार्य होतें व झालेंच पाहिजे, परंतु तेंच प्रभुचरित मंत्रचिन्हित पत्र प्रत्यक्ष शासनाभावात् शिरोधार्य न होता उलटे

चरणैरव ताडनानि

सोसण्याच्या बेतांत आलें आहे. धर्माच्या संबंधानें ही अवनति नष्ट होत जाऊन उत्तरोत्तर उर्जित काळ येण्याचें सुचिन्ह दिसत आहे ह्मणून या संबंधानें विशेष लिहावयास नको. अर्थातच तो आपल्या वेळच्या भक्तीच्या साध्या स्वरूपास भुलून

आर्य कथा छंदानें....
.... तनु वाक्कर्म मनः पाप सर्वथा सरलें ॥

असें ह्मणतो.

आपण कवितेमध्यें संस्कृत शद्बाची योजना पुष्कळ करितो व यमकें आणि प्रासानुप्रास यांनी रेलचेल करून देऊन कविता बघून सालंकृत करितो ऐकल्यानेंच तिच्या सत्वस्थवृत्ती बद्दल लोकांच्या मनांत पुढें मागें कदाचित् किंतू येत असेल, व त्यामुळें तिच्याकडे त्यांचे कटाक्षक्षेप फार निराळ्या प्रकारचे होत असतील याची थोडीशी तरी कल्पना कवीस बांधिता आली असावी कारण पुढील पद्यांत तो असें ह्मणतो,

गीर्वाण शद्ब पुष्कळ, जनपद भाषाचि
देखता थोडी ।
यास्तव गुणज्ञलोकीं याची घ्यावी
हळू हळू गोडी ॥

असले आक्षेप आपल्यावरती येतील व विविधज्ञान विस्तारांतिल रसिक शिरोमणी पुढें अर्थाचा अनर्थ करून सोडतील या भितीनेंच कीं काय कवी आपल्या पदरांत हीनपणा घेऊन ह्मणतो.

प्राकृत संस्कृत मिश्रित यास्तव कोणी
ह्मणेल जरि कंथा ।

गोदडीच कां होईना परंतु ती जर चांगली दांडगी असेल तर दुसऱ्या सत्रा पंथा धर्मातील जीर्ण तुकडे घेऊन सच्छिद्र व जर्जर शालजोडी पेक्षांही फार बरी व त्या गोदडीनें जसा

भवशीत भीति भीत स्वांताला दाविला
बरा पंथा ॥

तसाच दुसऱ्या पुष्कळ भाविकांनाही या गोदडीचाच जास्त उपयोग होईल.

भाषेस प्रौढी आणणारा येव्हडा दांडगा कवी परंतु आपल्या स्वतः विषयीं इतक्या नम्रपणानें लिहिणारा क्वचितच आढळेल. परंतु

कोठें दूरान्वित पद, कोठें चुकली अतेल
यति मात्र ।
अतिमात्र दोष ऐसें न वदोत कवी समस्त
गुण पात्र ॥

अशी आपली एक वेळ गुणपात्र वाचकांची दूरान्वयादि दोषाबद्दल माफी मागून कवि काव्यास प्रारंभ करितो.

( पुढें चालूं )

---

## बोर्डाचे मेंबरांची निवडणूक.

नंबर १

( आमच्या सन्माननीय मित्राकडून )

अलीकडे स्थानिक स्वराज्य संस्थेसंबंधानें इतर प्रांता प्रमाणें आपल्या प्रांतीं ही आपल्या सरकारची जरा कडी नजर झाली आहे. ही गोष्ट आपले वाचकांस माहीत आहेच.

म्युनिसिपालटी अगर लोकल बोर्डाचे कामांत लोकांची जरा हयगय दिसली कीं सरकार हात घालण्यास व त्यांचे हक्क कमी करण्यास बिलकूल मागें पुढें पाहत नाहीं. आमचे ऐकण्यांत असें आहे कीं वऱ्हाडांतील बऱ्याच तालुके बोर्डाचे व म्युनिसिपालिटीचे हक्क अलिकडे कमी केले आहेत. उमरावती व इलिचपूर ह्या दोन्ही जिल्ह्यांतील पूर्वींची व्यवस्था नाहींशी करून म्युनिसिपालिटीचीं व लोकल बोर्डाचीं व पब्लीक वर्कचीं कामें एका युरोपिअन इंजिनिअरचे स्वाधीन केलीं आहेत. कांहीं म्युनिसिपालिटीचे इलेक्शनचे हक्क कमी करून सरकारी नेमणुका सुरू केल्या आहेत. व कित्येक लोकल बोर्डाचे कारकुनांच्या जागा अजिबात कमी करून तीं कामें तहशिलींतील कारकुनाकडेस दिलीं आहेत. याप्रमाणें स्थानिक स्वराज्यास वाईट ग्रहाची बाधा सुरू झाली असें दिसतें.

अशा प्रसंगीं लोकांनींही आपले हक्क राखण्याविषयीं जितकी खटपट होईल तितकी केलीच पाहिजे. नाहीं तर. स्थानिक स्वराज्याची जी एवढी अमोल देणगी लार्ड रिपन साहेबांनीं दिली आहे, ती आपल्या हलगर्जीमुळें आपले प्रतिस्पर्धी आपल्या पासून हिरावून घेतील व आपण त्या देणगीस लायक नाहीं असें जग जाहीर करितील.

या कामीं प्रत्येकानें आपले हातून होईल तितकें लोकांस शिक्षण दिलें पाहिजे. पुष्कळ लोकांस आपले काय हक्क आहेत हें समजत नाहीं. कित्येकांस हक्क समजतात परंतु त्यांचा उपयोग कसा करून घ्यावा हें समजत नाहीं. करितां अशा लोकांस त्यांच्या हक्कांची चांगली ओळख करून दिली तर पुष्कळ फायदा होईल असें समजून त्या संबंधानें दोन चार लेख आपणाकडेस पाठविण्याचें मनांत आणिलें आहे.

मुंबई प्रांतांत व इतर दुसरे ठिकाणीं बोर्डाचे सर्व मेंबरांची निवडणूक तीन वर्षांनीं एकदमच होत असे. परंतु आपल्या प्रांतीं निराळी व्यवस्था केली आहे. दर वर्षीं ज्या बोर्डातील मेंबराची तीन वर्षाची मुदत संपली असेल त्यांचे जागीं दुसऱ्या मेंबरांची निवड होत असते. व या पद्धतीनें एकदम बोर्डात सर्वच नवीन मेंबर न येतां दर वर्षास कांहीं नवीन मेंबर येत असतात. ही व्यवस्था खरोखर सोयकर आहे. या नियमास अनुसरूनच येत्या नोव्हेंबर महिन्यांत आकोला जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यांत निवड होणार आहे.

सन १८८९ सालीं बोर्डाचा कायदा झाला आहे. त्यांतील कलम ३३ अन्वयें अलिशान रेसिडेंट साहेबांनीं निवडणूकी संबंधानें व इतर कांहीं बाबतींत नियम केले. ते नियम ता० १६ मार्च सन १८९२ नोटिफिकेशन नंबर ५७ अ. यांत प्रसिद्ध झालेले आहेत.

हे नियम वर लिहिले प्रमाणें जरी प्रसिद्ध झाले आहेत तथापि पुष्कळ मतदार लोकांनीं व मेंबर लोकांनीं पाहिलेही नसतील. शिवाय कायद्याचा व नियमांचा अर्थ करणें जरा कठीण असतें. सदर स्टेशनच्या ठिकाणीं वकील व इतर सुशिक्षित लोक असतात या मुळें तेथें फारशी अडचण पडत नाहीं. परंतु तालुक्यांत मेंबर व मतदार लोक हे बहुतकरून देशमुख, देशपांडे, पाटील, मारवाडी व इतर साहू व सावकार हे असतात. त्यांस कायदाकानू माहित नसतो. ह्मणून पुष्कळ लोक बोर्डाचे मेंबर व मतदार होण्यास लायक असतां त्यास बरोबर न समजल्यामुळें त्याचा उपयोग त्यांस करितां येत नाहीं. ही उणीव थोड्या बहूत अंशानें तरी दूर व्हावी ह्मणून मी आपल्या पुढील पत्रीं मेंबरांची लायकी व मतदारांचे अधिकार ह्याबद्दल थोडी बहूत माहिती देणार आहे.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती अश्विन वद्य २ शके १८२०

### विलायतचें भांडवल इंडियांत आल्या

पासून देशाचा मोठा तोटा झाला आहे. सर्व धनोत्पादक व्यापार विलायतवाल्यांच्या हातीं आहेत; आणि त्यांचा व्यापार सर्वोत्कृष्ट चालण्याला आमचा देश ह्मणजे पृथ्वींतील अप्रतिम क्षेत्र मिळालें आहे. संपत्ति संपवीला ओढते त्याप्रमाणें विलायतच्या भांडवलानें नाना तऱ्हांनीं आमचा पैसा लाबविला आहे. इंडिया देश परिणामीं निःसत्व, दरिद्री, व नष्टश्री होत चालला आहे. विलायतच्या भांडवलानें या देशावर उपकृतीच्या मिषानें मोठमोठे उपकार केले आहेत. या अपकाराचें ठळक उदाहरण ह्मणजे रेलवेचा विस्तार होय रेलवे मुळें कोट्यावधी पौंडाचें भांडवल व्याजीं लागतें आणि सर्व फायदा आमच्या राज्यकर्त्यांच्या देशबंधूस मिळतो. रेलवेच्या विस्ताराला कांहीं मर्यादाच ठेविल्या नाहींत. रेलवेनें इंडियाचा फायदा नाहीं असें आह्मी ह्मणत नाहीं परंतु चांगली वस्तु देखील मिळविण्याचे मार्ग आहेत. इंडियाच्या भांडवलावर रेलवे होतील तितक्या आह्मास पाहिजे आहेत परंतु तीच रेलवे विलायतच्या भांडवलावर होऊं लागली तर ती आह्मास नको.

रेलवेचा मुख्य लाभ दुष्काळाच्या वेळीं चांगला दृष्टोत्पत्तीस येतो. रेलवेनें धान्य सर्वत्र विभागलें जातें; आणि त्या मुळें दुष्काळ कमी कमी दुःखकारक होतो. परंतु दुष्काळ टाळण्याला फार उपयोगीं जे पाट, कालवे, विहिरी वगैरे साधनें अवर्षणाच्या वर्षीं देखील जमिनी सुपीक करून धान्यसमृद्धी उत्पन्न करून देतात त्या साधनांचा प्रसार रेलवेच्या वेडा मुळें सरकार होऊं देत नाहीं ही दुःखाची गोष्ट होय. रेलवेंत भांडवल गुंततें तसें भांडवल जमिनीला पाणी देण्याच्या कृत्रिम उपायांला लागत नाहीं ह्मणून या उपाया विषयीं सरकार अगदीं कानाडोळा करितें. कालवे वगैरे गोष्टींनीं विलायतच्या भांडवाल्यांची तृप्तता होत नाहीं. कालव्यापासून रयतेचा फायदा होतो पण सरकारला रेलवेप्रमाणें चांगलें व्याज त्यांत मिळत नाहीं सर आनटोनी म्याकडोनाल्ड कालव्या सारख्या उपायासंबंधानें लिहितात कीं कालवे, तलाव, विहिरी, हीं साधनें दुष्काळाच्या प्रसंगीं पीकें बुडून देत नाहींत आणि जमिनी अधिकाधीक लागवडींत आणितात इतकेंच नाहीं तर जे लोक पावसावर दृष्टी देऊन कालक्षेप करितात त्यांच्यासारखे प्रारब्धवादी लोक तलाव, विहिरी वगैरे खणण्या या प्रयत्नाला लागले आहेत. सरासरीनें गेल्या दुष्काळांत ५१०७६९ विहिरी आणि ४२२७ इतर मोठमोठीं बांधकामें झालीं; आणि या कामाला निराळी चांगलीशी भर पडेल तर ४६९०० टन धान्य अधीक पीकेल. ही गोष्ट लक्ष्यांत घेतली तर आमचें सरकार रेलवेच्या मागें न लागतां कालव्यांचीं कामें चालू करील. इंडियांत लागवडींत आलेली जमीन २३ कोट एकर आहे आणि १० कोट एकर जमीन लागवड करण्यासारखी आहे. एवढा प्रदेश सुपीक होईल तर दुष्काळाचें वारें देखील येणार नाहीं.

---

जुनी माणसें फार थोडीं मिळतात आणि तशांपैकीं लोककल्याणकारी सद्गृहस्थ निवर्तला ह्मणजे ती हानी राष्ट्रीय हानी आहे असें

आह्मी समजतों. अमदाबादचे विख्यात पुरुष राव बहादूर रणछोडलाल छोटुलाल सी. आय. इ. हे गेल्या बुधवारीं अमदाबादेस वयाचे ७८ वे वर्षी कैलासवासी झाले हें कळविण्यास दुःख वाटतें. हे गुजराथी गृहस्थ राजमान्य होण्याला कारण त्यांची लोकोपयोगी उत्तम कारकीर्द होय. या प्रांतीं त्यांची माहिती पुष्कळास नसेल तथापि त्यांचें निधनवृत्त कळविण्याचा उद्देश असा कीं या सत्पुरुषाचें चरित्र पुष्कळ अंशीं कित्याप्रमाणें [illegible] करण्या सारखें आहे. अमदाबादेस गि[illegible] स्थापन करण्याचें श्रेय त्यांच्या उद्योगाला व प्रयत्नाला आहे. अमदाबाद शहराची मुनसिपालिटी इतकी नांवारूपाला येण्याला कारणीभूत हेच गृहस्थ आहेत, किंबहुना मुनसिपालिटीची सर्व उभारणी त्यांच्याच हातची आहे हे मुंबई सरकारचे कौंसिलदार असतांना त्यांनीं आपली कामगिरी उत्कृष्ट प्रकारें बजावली. हे स्वभावतः फार उदार होते आणि त्यांचीं धर्मकृत्यें हजारो रुपये खर्चाचीं हल्लीं चालू असलेलीं आढळतील राव बहादूर रणछोडलाल मरण पावल्यामुळें जुन्या पिढीची एक दांडगी सांखळी तुटली. त्यांनीं औद्योगिक अभिवृद्धि विषयीं जी राष्ट्रसेवा झाली आहे तीच त्यांचें उत्तम स्मारक होय. जुन्या व नव्या विचारांचें संमेलन यांनीं योग्य प्रकारें घातलें होतें या थोर पुरुषाचे चरित्र पठण करण्याची आमच्या देशबांधवाला इच्छा झाली ह्मणजे त्यांच्या आयुष्यवृक्षाला अमृत फळें आलीं असें आह्मी मानूं.

---

धर्मादायाचा एक चांगला प्रकार मद्रासेस निघाला आहे. गरीब आईबापांच्या लहान मुलांस पाजण्यासाठीं धर्मार्थ दूध देण्याचें एक गृह त्या नगरींत स्थापण्यांत आलें आहे. लहान मुलें ह्मणजे दोन वर्षा खालील वयाचीं मुलें या गृहांत नेलीं असतां तेथें त्यांच्यासाठीं माफक प्रमाणानें सकाळीं दूध देण्यांत येतें या धर्मकृत्यासाठीं निराळा फंड उभारला असून सर्व व्यवस्था नेमस्त मंडळी मार्फत चालते अल्पवयीं मुलें मातेच्या दुधावर व गाई ह्मशींच्या दुधावर पोसलीं जातात. आईचें दूध पुरेसें न मिळालें ह्मणजे वरून गाई ह्मशींचें दूध घालावें लागतें. शेवटचा उपाय वारंवार करावा लागतो. पण लहान मुलांच्या उपयोगीं जसें दूध निरोगी, कसदार, व शुद्ध पाहिजे तसें बहुत प्रसंगी मिळत नाहीं आणि गरीब कुटूंम्बांतल्या माणसांस हा दुधाचा खर्च झेंपतही नाहीं. नादान स्थितींतल्या आईबापांस मदत मिळवी व लहान मुलांस दूध मुबलक, चांगलें व फुकट मिळावें ह्मणून ही दूध पाजणारी संस्था मद्रपरस्थ लोकांनीं काढली आहे. तिचा उपयोग गोरगरीब लोकांस अत्यंत होतो. या धर्मकार्यामुळें अनाथ, पंगू व परवश मुलांचें संगोपन उत्तम होतें आणि भावी पिढी चांगली, सशक्त व मजबूत निघण्याला ही संस्था फार उपयोगीं पडेल. ही दूध पाजण्याची कल्पना प्रांतो प्रांतीं व गांवोगांव स्वीकारण्या सारखी महत्वाची व सुलभ आहे. मुलांचें संगोपन उत्तम दुधावर झाल्यामुळें अल्पवयांत मरणाऱ्या मुलांची संख्या कमी होईल. या दानधर्मा पेक्षां अन्य दानधर्म इतका उमदा आढळण्या सारखा नाहीं. दूध पाजण्याचीं धर्मार्थ गृहें आमच्या प्रांतीं निघण्याला काल लागेल तथापि गोरक्षणा सारख्या संस्थानीं हें धर्मकृत्य सुरूं करावें ह्मणजे लोकांची श्रद्धा बसून त्या संस्थांस जोर येऊन लोकाश्रयही पुष्कळ दांडगा मिळेल असा आमचा समज आहे. आकोल्याची गोरक्षण मंडळी वरील सूचना लक्ष्यांत घेईल तर तिचे लोकांवर मोठे उपकार होतील.

---

स्काट कर्वानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं मनुष्या इतका क्रूर प्राणी दुनियेंत नाहीं. सर्व प्राणी आपल्या जातीच्या प्राण्याला ठार मारीत नाहींत परंतु मनुष्याचा विजयध्वज मनुष्य हानीच्याच पायावर उभारलेला असतो. भूतदयेच्या गोष्टींचा वेदांत कितीही नामी वाटला तरी हल्लीं युरोपांत व आशियांत जी निरनिराळ्या राष्ट्रांची धुमश्चक्री चालली आहे तिजवरून मनुष्य हाच मनुष्याचा यमराज दिसतो. राष्ट्रीय नीतिच असें सांगते कीं लढाईत मनुष्यघातांचें पाप नाहीं आणि उलटें धारातीर्थी मरण पावतो तो परमागतीला पोंचतो. हल्लींच्या कलहाचें मूळ तत्व नीतीपर नसून बळी तो कान पिळी अशा प्रकारचें आहे. युरोपाचीं राष्ट्रें आशियांतील राष्ट्रांची वांटणी करण्याच्या कामांत गुंग आहेत आणि आपापला हक्क लढायीनें शाबित करण्याच्या बेतांत आहेत. युद्धप्रसंग केव्हां येतेल याचा नेम नाहीं आणि सध्यां सक्रांत चीन देशावर आली आहे. रशियन सरकारच्या एका वर्तमानपत्रानें असा अंदाज काढला आहे कीं सर्व जगांत हल्लीं ९२,५०,००० लोक युद्धाला तयार आहेत आणि लढाई उद्भवलीच तर ही संख्या ४,४२,५०,००० लढवय्ये लोका इतकी मोठी होईल. ही संख्या किती मोठी आहे याची कल्पना निराळ्या तऱ्हेनें चांगली येईल; सर्व मानवसृष्टीचा नाश करावयाचा असेल आणि ही कामगिरी या शिपायास सांगितली तर प्रत्येक शिपायाला ३२ माणसें मारावीं लागतील. सर्व लोकसंख्येंत ३२ इसमा मागें एक शिपायी अशी सैन्याची संख्या मोठी प्रचंड आहे. प्रचंड लष्कर ठेवण्याला खर्चही प्रचंड लागणारा आहे. युरोपांतील राष्ट्रांचा वार्षिक लष्करी खर्च सरासरी असा आहेः—

| राष्ट्र | लक्ष पौंड | दरमाणशी खर्च शिलिंग | पेन्स |
|---|---|---|---|
| राशिया | ३१० | ५ | ० |
| जर्मनी | २७० | १२ | १० |
| फ्रान्स | २६० | १५ | ० |
| इंग्लड | २१० | १९ | ६ |
| आस्त्रिया | १८० | | |
| इटली | ११० | | |

या शिवाय अरमारावरील लष्करी खर्च निराळाच आहे. या खर्चामुळें सर्व राष्ट्रें चिरडून गेली आहेत आणि तीच दशा आमच्या देशाची आहे. सध्यां माणसें माणसांला ठार मारण्यांत तत्पर आहेत आणि कांहीं दिवसांनीं प्रस्तुतच्या गोष्टीवरून माणसें माणसांला खाण्याच्या उद्योगाला लागतील असा तर्क आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY, OCTOBER 31 1898

This year's harvest is not very promising. Either the Kharip or the Rabbi crop does not hold forth hopeful prospects. People have begun to feel the pressure of a failing harvest. The business of agriculture is sinking fast; and the disappointment at a partial failure of even 8 or 6 Annas in a rupee will be most harassing to the people. The money-lender as a class presses his demands in a mandatory voice. The middle-man who holds lands from the government and sub-lets them at three or four or five times the rental does his best to get back the dues of his right of occupancy. The last but not the least demand will be the heavy land—tax of the state-the sole proprietor of the province. We think that the cultivating classes will break down under the three-fold pressure. The rainfall being below the normal average is the main cause of the depression in the harvest. To this we shall have to add the extraneous cause viz the prevailing market—prices of cotton. The American cotton—crop is excellent and the consequence is the unprecedented fall in the prices of cotton. The failure of rain and the prices of cotton are two predominent facts in all calculations. Old speculations have been upset and we are afraid that the lower classes of our agricultural society will shortly succumb to the worry and vexation of the Sowkar, the middle—man and the Sarkar. An agriculturist will find himself in a fix. He will realize that he has worked hard for bread but that he will have to content himself with the alms and borrowings that he can control with his lost credit. We raise this note of alarm with a view to ask for mercy or clemency from the Government. The new assessments are beyond the means and the income of the holders of the land. The Government have resolved to realize the full amounts of the assessments. They have even set at naught their first declarations to collect the new assessments with certain reservations. It will be indeed a question as to whether the Government can succeed in a law—suit when the ryots have contracted to hold land on certain payments to be regulated according to a fixed scale of reservations We fail to see the justice of a change in the policy of the Government. We submit that this is a year in which relaxation and suspension of the rental should be permitted in a certain measure. The effects of the last famine have not disappeared. They are palpably felt in spite of the bumper crops of the last year and the miseries of the current year will make matters worse than what they were. We request the Government to find out the real facts and to introduce such a policy as will enable people to earn a competent livelihood. Peace and contentment go hand in hand and if the Government do not care to save the agricultural masses from the growing poverty and loss of vitality we are at a loss to understand the real principles of a good Government.

---

Mr. F. W. A. Prideaux held charge of the Akola district for nearly more than two years. He is transferred to Bassim, and therefore he delivered over charge of his post to Mr. Rustomji Faridunji in the forenoon of 26th October 1898. During this short period which was frought with momentous events to try his tact, vigour and strength of mind, he endeared himself to the people of his district by his unique personal qualities. He is a very good man, noble at heart sincere in action, and obliging. His sympathetic heart was early moved to set about providing against the late famine and he did his best to minimise the horrors of famine by carrying out the famine relief scheme in a very successful, manner. The famine was more keenly felt in the Akola District than else where in Berar except in the Melghats and it was therefore especially necessary that relief measures should have been introduced earlier and carried out more systematically and successfully in this district. Mr. Prideaux perceived this and successfully fought with the famine and saved the poor. His action in famine times has evoked a wave of affectionate feeling all over the district which will not fade away for years to come. The gratitude, love and good will of the people which he has deservedly earned manifested themselves in the various private friendly Pansupari entertainments which were held here by the people of Akola and others in the last week. The literary class paid their respect by inviting him to a Pansupari at the Native General Library buildings. The Mittra Samaj which is composed of all the gentry of the town did the same at the Samaj rooms. It is worth this while to observe that Mr. Prideaux was a member of this Samaj. The Deshpandes and Deshmukhs of the district held a similar Pansupari and expressed most clearly how greatly the people in the district of all grades and stations liked him for his goodness His sympathy for the poor and his anxious solicitude for them won him popular esteem and admiration and on the 27th. October he offered himself to be drawn in a photo amidst the very poor people who were dying for want of food and clothing during the famine days and who have to-day survived contentfully to earn a pleasant livelihood through his goodness. We have therefore great pleasure to congratulate Mr. Prideaux upon his popularity and goodness and we hope he will ever continue to be so wherever it may please God to station him. We wish him success in his career and pray that he be blessed with happiness and prosperity althrough his life.

---

## वऱ्हाड

मे० प्रीडो साहेब डेपुटी कमिशनर यांनीं गेल्या बुधवारीं या जिल्ह्याचा चार्ज मे० रुस्तुमजी फर्दूनजी साहेब यांस दिला. सध्यां ते मुंबईस गेले असून एक दोन दिवसांत वाशिमास जातील. त्यांच्या सन्मानार्थ येथील आफिसरानीं मेजवान्या, आणि गांवकऱ्यांनीं व जिल्ह्यांतील लोकांनीं पानसुपाऱ्या दिल्या.

अलिशान रेसिडेंट सर प्लौडन हे लवकरच परत हैदराबादेस येतील आणि मि. क्राफर्ड साहेब कमिशनरचे जागीं परत उमरावतीस येत्या आठवड्याच्या अखेरीला येतील असें ह्मणतात.

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं मौजे बांबर्डे येथील सर्वे नंबर २३ व ६८ आणि इसापूरचा सर्व्हे नंबर १४ आणि शिवाय इतर स्थावर जंगम इस्टेट कवेलू घर बैल जोडी वगैरे सुद्धा कोणीही पुंजाजी कडून विकत किंवा बक्षीस घेऊं नये. घेणारा जबाबदार राहील. कळावे. तारीख २८।१०।९८ इसवी.

( सही )

गोपी मर्द महादू तर्फे मुखत्यार
बापुजी वल्लद हबाजी काजगे
राहणार बांबरडी दस्तुर
खुद.

---

वर्तमानसार

The Vedanta religion is of eternal ope.

असल्या अध्यात्मकंपूंत महार, मांग, चांभार, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, ब्राह्मण सर्व गतात व यांची एक स्वतंत्र अध्यात्म तच बनते असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु मानसिक शुद्धि होऊन जोंवर त्यांचा तःस्ते झाला नाहीं तोंपर्यंत कुंभाराचा कुंभार, वाणीचा वाणी, शूद्राचा शूद्र व ब्राह्मणाचा ब्राह्मणच राहिला पाहिजे निरनिराळ्या जातीस निरनिराळा मार्ग लाविला असें ह्मणून ब्राह्मणास कांहीं अज्ञ लोक व विशेषतः कलहप्रिय पाद्री मंडळ पक्षपाती असें ह्मणतात, परंतु तसा प्रकार दिसत नाहीं. वर्णाश्रमाप्रमाणें निरनिराळा मार्ग दाखविण्यांत उलटें ब्राह्मणांनीं पूर्वसंस्कारांचें महत्व ( यासच इंग्रजींत Heredity असें ह्मणतात ) दाखवून आपली दूरदृष्टी किती आहे हेंही प्रदर्शित केलें. अलिकडील शास्त्रीय शोधांनीं सुद्धां या पूर्व संस्कारांचें स्वरूप कांहीं तरी ठाम आहे असें निश्चयात्मक सांगतां येतें. असो, हिंदुधर्माचें महत्व वाखाणण्याचें सोडून आपण आपल्या प्रस्तुत विषयाकडे वळूं.

पवित्र शास्त्राचा आकस्मिक उदय झाल्यानें हिंदुंच्या आचार विचारांत काय रूपांतर होईल याची त्यास कल्पना सुद्धां नसावी ह्मणूनच तो विचार करी

नृप मुद्रांकित पत्र प्रजेसि होतें
नसें शिरोधार्य ।
प्रभु चरित मंत्र चिन्हित यास्तव धरितील
मस्तकीं आर्य ॥

असें ह्मणतो. खरेंच आहे. पर द्वीपस्थ नृप मुद्रांकित पत्र स्वातंत्र्याभाव नष्ट दशेनें कसेंही असलें तरी एकदां सोडून शंभरदां शिरोधार्य होतें व झालेंच पाहिजे, परंतु तेंच प्रभुचरित मंत्रचिन्हित पत्र प्रत्यक्ष शासनाभावात् शिरोधार्य न होता उलटे

चरणैरव ताडनानि

सोसण्याच्या बेतांत आलें आहे. धर्माच्या संबंधानें ही अवनति नष्ट होत जाऊन उत्तरोत्तर उन्नति काळ येण्याचें सुचिन्ह दिसत आहे ह्मणून या संबंधानें विशेष लिहाव्यास नको. अर्थातच तो आपल्या वेळच्या भक्तीच्या साध्या स्वरूपास भुलून

आर्य कथा छंदानें....
.... तनु वाक्कर्म मनः पाप सर्वथा सरलें ॥

असें ह्मणतो.

आपण कवितेमध्यें संस्कृत शब्दाची योजना पुष्कळ करितो व यमकें आणि प्रासानुप्रास यांची रेलचेल करून देऊन कविता बहुत सालंकृत करितो ऐकल्यानेंच तिच्या सत्तस्फूर्ती बद्दल लोकांच्या मनांत पुढें मागें कदाचित् किंतु येत असेल. व त्यामुळें तिच्याकडे त्यांचे कटाक्षक्षेप फार निराळ्या प्रकारचे होत असतील याची थोडीशी तरी कल्पना कवीस वाचिता आली असावी कारण पुढील पद्यांत तो असें ह्मणतो,

गीर्वाण शब्द पुष्कळ, जनपद भाषाचि
देखता थोडी ।
यास्तव गुणज्ञलोकीं याची घ्यावी
हळू हळू गोडी ॥

असले आक्षेप आपल्यावरती येतील व विविधज्ञान विस्तारांतिल रसिक शिरोमणी पुढें अर्थाचा अनर्थ करून सोडतील या भितीनेंच कीं काय कवी आपल्या पदरांत हीनपणा घेऊन ह्मणतो.

प्राकृत संस्कृत मिश्रित यास्तव कोणी
ह्मणेल जरि कंथा ।

गोदडीच कां होईना परंतु ती जर चांगली दांडगी असेल तर दुसऱ्या सत्रा पंधरा धर्मांतील जीर्ण तुकडे घेऊन सच्छिद्र व जर्जर शालजोडी पेक्षांही फार बरी व त्या गोदडीनें जसा

भवशीत भीति भीत स्वांताला दाविला
बरा पंथा ॥

तसाच दुसऱ्या पुष्कळ भाविकांनाही या गोदडीचाच ज्यास्त उपयोग होईल.

भाषेस प्रौढी आणणारा येव्हडा दांडगा कवी परंतु आपल्या स्वतः विषयीं इतक्या नम्रपणानें लिहिणारा क्वचित् आढळेल. परंतु

कोठें दूरान्वित पद, कोठें चुकली असेल
यति मात्र ।
अतिमात्र दोष ऐसे न वदोत कवी सकस्त
गुण पात्र ॥

अशी आपली एक वेळ गुणपात्र वाचकांची दूरान्वयादि दोषाबद्दल माफी मागून कवि काव्यास प्रारंभ करितो.

( पुढें चालू )

## बोर्डाचे मेंबरांची निवडणूक.

नंबर १

( आमच्या सन्माननीय मित्राकडून )

अलीकडे स्थानिक स्वराज्य संस्थेसंबंधानें इतर प्रांता प्रमाणें आपल्या प्रांतींही आपल्या सरकारची जरा कडी नजर झाली आहे. ही गोष्ट आपले वाचकांस माहीत आहेच.

म्युनिसिपालटी अगर लोकल बोर्डाचे कामांत लोकांची जरा हयगय दिसली कीं सरकार हात घालण्यास व त्यांचे हक्क कमी करण्यास बिलकूल मागें पुढें पाहत नाहीं. आमचे ऐकण्यांत असें आहे कीं वऱ्हाडांतील बऱ्याच तालुके बोर्डाचे व म्युनिसिपालिटीचे हक्क अलिकडे कमी केले आहेत. उमरावती व इलिचपूर ह्या दोन्ही जिल्ह्यांतील पूर्वीची व्यवस्था नाहींशी करून म्युनिसिपालिटीचीं व लोकल बोर्डाचीं व पब्लीक वर्कचीं कामें एका युरोपियन इंजिनिअरचे स्वाधीन केलीं आहेत. कांहीं म्युनिसिपालिटीचे इलेक्शनचे हक्क कमी करून सरकारी नेमणुका सुरू केल्या आहेत. व कित्येक लोकल बोर्डाचे कारकुनांच्या जागा अजिबात कमी करून तीं कामें तहशिलींतील कारकुनाकडे दिलीं आहेत. याप्रमाणें स्थानिक स्वराज्यास वाईट ग्रहाची बाधा सुरू झाली असें दिसतें.

अशा प्रसंगीं लोकांनींही आपले हक्क राखण्याविषयीं जितकी खटपट होईल तितकी केलीच पाहिजे. नाहीं तर, स्थानिक स्वराज्याची जी एवढी अमोल देणगी लार्ड रिपन साहेबांनीं दिली आहे, ती आपल्या हलगर्जीमुळें आपले प्रतिस्पर्धी आपल्या पासून हिरावून घेतील व आपण त्या देणगीस लायक नाहीं असें जग जाहीर करितील.

या कामीं प्रत्येकानें आपले हातून होईल तितकें लोकांस शिक्षण दिलें पाहिजे. पुष्कळ लोकांस आपले काय हक्क आहेत हें समजत नाहीं. कित्येकांस हक्क समजतात परंतु त्यांचा उपयोग कसा करून घ्यावा हें समजत नाहीं. करितां अशा लोकांस त्यांच्या हक्कांची चांगली ओळख करून दिली तर पुष्कळ फायदा होईल असें समजून त्या संबंधानें दोन चार लेख आपणाकडेस पाठविण्याचें मनांत आणिलें आहे.

मुंबई प्रांतांत व इतर दुसरे ठिकाणीं बोर्डाचे सर्व मेंबरांची निवडणूक तीन वर्षांनीं एकदमच होत असे. परंतु आपल्या प्रांतीं निराळी व्यवस्था केली आहे. दर वर्षी ज्या बोर्डांतील मेंबरांची तीन वर्षांची मुदत संपली असेल त्यांचे जागीं दुसऱ्या मेंबरांची निवड होत असते. व या पद्धतीनें एकदम बोर्डांत सर्वच नवीन मेंबर न येतां दर वर्षास कांहीं नवीन मेंबर येत असतात. ही व्यवस्था खरोखर सोयकर आहे. या नियमास अनुसरूनच येत्या नोव्हेंबर महिन्यांत आकोला जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यांत निवड होणार आहे.

सन १८८९ सालीं बोर्डाचा कायदा झाला आहे. त्यांतील कलम ३३ अन्वयें अलिशान रेसिडेंट साहेबांनीं निवडणूकी संबंधानें व इतर कांहीं बाबतींत नियम केले. ते नियम ता० १६ मार्च सन १८९२ नोटिफिकेशन नंबर ६७ अ. यांत प्रसिद्ध झालेले आहेत.

हे नियम वर लिहिले प्रमाणें जरी प्रसिद्ध झाले आहेत तथापि पुष्कळ मतदार लोकांनीं व मेंबर लोकांनीं पाहिलेही नसतील. शिवाय कायद्याचा व नियमांचा अर्थ करणें जरा कठीण असतें. सदर स्टेशनच्या ठिकाणीं वकील व इतर सुशिक्षित लोक असतात या मुळें तेथें फारशी अडचण पडत नाहीं. परंतु तालुक्यांत मेंबर व मतदार लोक हे बहुतकरून देशमुख, देशपांडे, पाटील, मारवाडी व इतर साहू व सावकार हे असतात. त्यांस कायदाकानू माहित नसतो. ह्मणून पुष्कळ लोक बोर्डाचे मेंबर व मतदार होण्यास लायक असतां त्यास बरोबर न समजल्यामुळें त्याचा उपयोग त्यांस करितां येत नाहीं. ही उणीव थोड्या बहूत अंशानें तरी दूर व्हावी ह्मणून मी आपल्या पुढील पत्रीं मेंबरांची लायकी व मतदारांचे अधिकार ह्याबद्दल थोडी बहूत माहिती देणार आहे.

वऱ्हाडसमाचार

मिती अश्विनवद्य २ शके १८२०

विलायतचें भांडवल इंडियांत आल्यापासून देशाचा मोठा तोटा झाला आहे. सर्व धनोत्पादक व्यापार विलायतवाल्यांच्या हातीं आहेत; आणि त्यांचा व्यापार सर्वोत्कृष्ट चालण्याला आमचा देश ह्मणजे पृथ्वीतील अप्रतिम क्षेत्र मिळालें आहे. संपत्ति संपत्तीला ओढते त्याप्रमाणें विलायतच्या भांडवलानें नाना तऱ्हांनीं आमचा पैसा लावविला आहे. इंडिया देश परिणामीं निःसत्व, दरिद्री, व नष्टश्री होत चालला आहे. विलायतच्या भांडवलानें या देशावर उपकृतीच्या मिषानें मोठमोठे उपकार केले आहेत. या अपकारांचें ठळक उदाहरण ह्मणजे रेलवेचा विस्तार होय रेलवे मुळें कोट्यावधी पौंडाचें भांडवल व्याजीं लागतें आणि सर्व फायदा आमच्या राज्यकर्त्यांच्या देशबंधूस मिळतो. रेलवेच्या विस्ताराला कांहीं मर्यादाच ठेविल्या नाहींत. रेलवेनें इंडियाचा फायदा नाहीं असें आह्मी ह्मणत नाहीं परंतु चांगली वस्तु देखील मिळविण्याचे मार्ग आहेत. इंडियाच्या भांडवलावर रेलवे होतील तितक्या आह्मास पाहिजे आहेत परंतु तीच रेलवे विलायतच्या भांडवलावर होऊं लागली तर ती आह्मास नको.

रेलवेचा मुख्य लाभ दुष्काळाच्या वेळीं चांगला दृष्टोत्पत्तीला येतो. रेलवेनें धान्य सर्वत्र विभागलें जातें; आणि त्या मुळें दुष्काळ कमी कमी दुःखकारक होतो. परंतु दुष्काळ टाळण्याला फार उपयोगी जे पाट, कालवे, विहिरी वगैरे साधनें अवर्षणाच्या वर्षी देखील जमिनी सुपीक करून धान्यसमृद्धी आणतात त्या साधनाचा प्रसार रेलवेच्या वेडामुळें सरकार होऊं देत नाहीं ही दुःखाची गोष्ट होय. रेलवेंत भांडवल गुंतवें तसें भांडवल जमिनीला पाणी देण्याच्या कृत्रिम उपायांला लागत नाहीं ह्मणून या उपाया विषयीं सरकार अगदीं कानाडोळा करितें. कालवे वगैरे गोष्टींनीं विलायतच्या भांडवलवाल्यांची तृप्तता होत नाहीं. कालव्यापासून त्यांचा फायदा होतो पण सरकारला रेलवेप्रमाणें चांगलें व्याज त्यांत मिळत नाहीं सर आनटॉनी म्याकडानाल्ड कालव्या सारख्या उपायासंबंधानें लिहितात कीं कालवे, तलाव, विहिरी, हीं साधनें दुष्काळाच्या प्रसंगीं पीकें बुडून देत नाहींत आणि जमिनी अधिकाधीक लागवडींत आणितात इतकेंच नाहीं तर जे लोक पावसावर दृष्टी देऊन कालक्षेप करितात त्यांच्यासारखे प्रारब्धवादी लोक तलाव, विहिरी वगैरे खणण्या या प्रयत्नाला लागले आहेत. सरासरीनें गेल्या दुष्काळांत ६६०७६९ विहिरी आणि ४२२७ इतर मोठमोठीं बांधकामें झालीं; आणि या कामाला निराळी चांगलीशी भर पडेल तर ४६६०० टन धान्य अधीक पीकेल. ही गोष्ट लक्ष्यांत घेतली तर आमचे सरकार रेलवेच्या मागें न लागतां कालव्यांचीं कामें चालू करील. इंडियांत लागवडींत आलेली जमीन २३ कोट एकर आहे आणि १० कोट एकर जमीन लागवड करण्यासारखी आहे. एवढा प्रदेश सुपीक होईल तर दुष्काळाचें वारें देखील येणार नाहीं.

जुनी माणसें फार थोडीं मिळतात आणि तशांपैकीं लोककल्याणकारी सद्गृहस्थ निवर्तला ह्मणजे ती हानी राष्ट्रीय हानी होते असें

आह्मी समजतों. अमदाबादचे विख्यात पुरुष राव बहादूर रणछोडलाल छोटुलाल सी. आय. इ. हे गेल्या बुधवारीं अमदाबादेस वयाचे ७८ वे वर्षीं कैलासवासी झाले हें कळविण्यास दुःख वाटतें. हे गुजराथी गृहस्थ राजमान्य होण्याला कारण त्यांची लोकोपयोगी उत्तम कारकीर्द होय. या प्रांतीं त्यांची माहिती पुष्कळास नसेल तथापि त्यांचें निधनवृत्त कळविण्याचा उद्देश असा कीं या सत्पुरुषाचें चरित्र पुष्कळ अंशीं कित्याप्रमाणें [illegible] करण्या सारखें आहे. अमदाबादेस गिरण्या स्थापन करण्याचें श्रय त्यांच्या उद्योगाला व प्रयत्नाला आहे. अमदाबाद शहराची मुनसिपालिटी इतकी नांवारूपाला येण्याला कारणभूत हेच गृहस्थ आहेत, किंबहुना मुनसिपालिटीची सर्व उभारणी त्यांच्याच हातची आहे हे मुंबई सरकारचे कौंसिलदार असतांना त्यांनीं आपली कामगिरी उत्कृष्ट प्रकारें बजावली. हे स्वभावतः फार उदार होते आणि त्यांचीं धर्मकृत्यें हजारो रुपये खर्चाचीं हल्लीं चालू असलेलीं आढळतील राव बहादूर रणछोडलाल मरण पावल्यामुळें जुन्या पिढीची एक दांडगी सांखळी तुटली. त्यांनीं औद्योगिक अभिवृद्धि विषयीं जी राष्ट्रसेवा झाली आहे तीच त्याचें उत्तम स्मारक होय. जुन्या व नव्या विचारांचें संमेलन यांनीं योग्य प्रकारें घातलें होतें या थोर पुरुषाचे चरित्र पठण करण्याची आमच्या देशबांधवाला इच्छा झाली ह्मणजे त्यांच्या आयुष्यवृक्षाला अमृत फळें आलीं असें आह्मी मानूं.

---

धर्मादायाचा एक चांगला प्रकार मद्रासेस निघाला आहे. गरीब आईबापांच्या लहान मुलांस पाजण्यासाठीं धर्मार्थ दूध देण्याचें एक गृह त्या नगरींत स्थापण्यांत आलें आहे. लहान मुलें ह्मणजे दोन वर्षा खालील वयाचीं मुलें या गृहांत नेलीं असतां तेथें त्यांच्यासाठीं माफक प्रमाणानें सकाळीं दूध देण्यांत येतें या धर्मकृत्यासाठीं निराळा फंड उभारला असून सर्व व्यवस्था नेमस्त मंडळी मार्फत चालते अल्पवयीं मुलें मातेच्या दुधावर व गाई ह्मशीच्या दुधावर पोसलीं जातात. आईचें दूध पुरेसें न मिळालें ह्मणजे वरून गाई ह्मशींचें दूध घालावें लागतें. शेवटचा उपाय वारंवार करावा लागतो. पण लहान मुलांच्या उपयोगीं जसें दूध निरोगी, कसदार, व शुद्ध पाहिजे तसें बहुत प्रसंगी मिळत नाहीं आणि गरीब कुटुंम्बांतल्या माणसांस हा दुधाचा खर्च झेंपतही नाहीं. नादान स्थितींतल्या आईबापांस मदत मिळवी व लहान मुलांस दूध मुबलक, चांगलें व फुकट मिळावें ह्मणून ही दूध पाजणारी संस्था मद्रपरस्थ लोकांनीं काढली आहे. तिचा उपयोग गोरगरीब लोकांस अत्यंत होतो. या धर्मकार्यामुळें अनाथ, पंगू व परवश मुलांचें संगोपन उत्तम होतें आणि भावी पिढी चांगली, सशक्त व मजबूत निघण्याला ही संस्था फार उपयोगीं पडेल. ही दूध पाजण्याची कल्पना प्रांतो प्रांतीं व गांवोगांव स्वीकारण्या सारखी महत्वाची व सुलभ आहे. मुलांचें संगोपन उत्तम दुधावर झाल्यामुळें अल्पवयांत मरणाऱ्या मुलांची संख्या कमी होईल. या दानधर्मा पेक्षां अन्य दानधर्म इतका उमदा आढण्या सारखा नाहीं. दूध पाजण्याचीं धर्मार्थ गृहें आमच्या प्रांतीं निघण्याला काल लागेल तथापि गोरक्षणा सारख्या संस्थानीं हें धर्मकृत्य सुरूं करावें ह्मणजे लोकांची श्रद्धा बसून त्या संस्थांस जोर येऊन लोकाश्रयही पुष्कळ दांडगा मिळेल असा आमचा समज आहे. आकोल्याची गोरक्षण मंडळी वरील सूचना लक्ष्यांत घेईल तर तिचे लोकांवर मोठे उपकार होतील.

---

स्काट कर्वानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं मनुष्या इतका क्रूर प्राणी दुनियेंत नाहीं. सर्व प्राणी आपल्या जातीच्या प्राण्याला ठार मारीत नाहींत परंतु मनुष्याचा विजयध्वज मनुष्य हानीच्याच पायावर उभारलेला असतो. भूतदयेच्या गोष्टींचा वेदांत कितीही नामी वाटला तरी हल्लीं युरोपांत व आशियांत जी निरनिराळ्या राष्ट्रांची धुमश्चक्री चालली आहे तिजवरून मनुष्य हाच मनुष्याचा यमराज दिसतो. राष्ट्रीय नीतिच असें सांगते कीं लढाईत मनुष्यघातांचें पाप नाहीं आणि उलटे धारातीर्थीं मरण पावतो तो परमगतीला पोंचतो. हल्लींच्या कलहाचें मूळ तत्व नीतीपर नसून बळी तो कान पिळी अशा प्रकारचें आहे. युरोपाचीं राष्ट्रें आशियांतील राष्ट्रांची वांटणी करण्याच्या कामांत गुंग आहेत आणि आपापला हक्क लढायीनें शाबित करण्याच्या बेतांत आहेत. युद्धप्रसंग केव्हां बेतेल याचा नेम नाहीं आणि सध्यां सक्रांत चीन देशावर आली आहे. रशियन सरकारच्या एका वर्तमानपत्रानें असा अंदाज काढला आहे कीं सर्व जगांत हल्लीं ९२,५०,००० लोक युद्धाला तयार आहेत आणि लढाई उद्भवलीच तर ही संख्या ४,४२,५०,००० लढवय्ये लोका इतकी मोठी होईल. ही संख्या किती मोठी आहे याची कल्पना निराळ्या तऱ्हेनें चांगली येईल. सर्व मानवसृष्टीचा नाश करावयाचा असेल आणि ही कामगिरी या शिपायास सांगितली तर प्रत्येक शिपायाला ३२ माणसें मारावीं लागतील. सर्व लोकसंख्येंत ३२ इसमा मागें एक शिपायीं अशी सैन्याची संख्या मोठी प्रचंड आहे. प्रचंड लष्कर ठेवण्याला खर्चही प्रचंड लागणारा आहे. युरोपांतील राष्ट्रांचा वार्षिक लष्करी खर्च सरासरी असा आहे:—

| राष्ट्र | लक्ष पौंड | दरमाणशी खर्च शिलिंग | पेन्स |
|---|---|---|---|
| रशिया | ३१० | ५ | ० |
| जर्मनी | २७० | १२ | १० |
| फ्रान्स | २६० | १५ | ० |
| इंग्लड | २१० | १९ | ६ |
| आस्त्रिया | १८० | | |
| इटली | ११० | | |

या शिवाय अरमारावरील लष्करी खर्च निराळाच आहे. या खर्चामुळें सर्व राष्ट्रें चिरडून गेली आहेत आणि तीच दशा आमच्या देशाची आहे. सध्यां माणसें माणसांला ठार मारण्यांत तत्पर आहेत आणि कांहीं दिवसांनीं प्रस्तुतच्या गोष्टीवरून माणसें माणसांला खाण्याच्या उद्योगाला लागतील असा तर्क आहे.

---

The Berar Samachar

MONDAY, OCTOBER 31 1898

This year's harvest is not very promising. Either the Kharip or the Rabbi crop does not hold forth hopeful prospects. People have begun to feel the pressure of a failing harvest. The business of agriculture is sinking fast; and the disappointment at a partial failure of even 8 or 6 Annas in a rupee will be most harassing to the people. The money-lender as a class presses his demands in a mandatory voice. The middle-man who holds lands from the government and sub-lets them at three or four or five times the rental does his best to get back the dues of his right of occupancy. The last but not the least demand will be the heavy land—tax of the state-the sole proprietor of the province. We think that the cultivating classes will break down under the three-fold pressure. The rainfall being below the normal average is the main cause of the depression in the harvest. To this we shall have to add the extraneous cause viz the prevailing market—prices of cotton. The American cotton—crop is excellent and the consequence is the unprecedented fall in the prices of cotton. The failure of rain and the prices of cotton are two predominent facts in all calculations. Old speculations have been upset and we are afraid that the lower classes of our agricultural society will shortly succumb to the worry and vexation of the Sowkar, the middle—man and the Saikar. An agriculturist will find himself in a fix. He will realize that he has worked hard for bread but that he will have to content himself with the alms and borrowings that he can control with his lost credit. We raise this note of alarm with a view to ask for mercy or clemency from the Government. The new assessments are beyond the means and the income of the holders of the land. The Government have resolved to realize the full amounts of the assessments. They have even set at naught their first declarations to collect the new assessments with certain reservations. If will be indeed a question as to whether the Government can succeed in a law—suit when the ryots have contracted to hold land on certain payments to be regulated according to a fixed scale of reservations We fail to see the justice of a change in the policy of the Government. We submit that this is a year in which relaxation and suspension of the rental should be permitted in a certain measure. The effects of the last famine have not disappeared. They are palpably felt in spite of the bumper crops of the last year and the miseries of the current year will make matters worse than what they were. We request the Government to find out the real facts and to introduce such a policy as will enable people to earn a competent livelihood. Peace and contentment go hand in hand and if the Government do not care to save the agricultural masses from the growing poverty and loss of vitality we are at a loss to understand the real principles of a good Government.

---

Mr. F. W. A. Prideaux held charge of the Akola district for nearly more than two years. He is transferred to Bassim, and therefore he delivered over charge of his post to Mr. Rustomji Faridunji in the forenoon of 26th October 1898. During this short period which was frought with momentous events to try his tact, vigour and strength of mind, he endeared himself to the people of his district by his unique personal qualities. He is a very good man, noble at heart sincere in action, and obliging. His sympathetic heart was early moved to set about providing against the late famine and he did his best to minimise the horrors of famine by carrying out the famine relief scheme in a very successful, manner. The famine was more keenly felt in the Akola District than else where in Berar except in the Melghats and it was therefore especially necessary that relief measures should have been introduced earlier and carried out more systematically and successfully in this district. Mr. Prideaux perceived this and successfully fought with the famine and saved the poor. His action in famine times has evoked a wave of affectionate feeling all over the district which will not fade away for years to come. The gratitude, love and good will of the people which he has deservedly earned manifested themselves in the various private friendly Pansupari entertainments which were held here by the people of Akola and others in the last week. The literary class paid their respect by inviting him to a Pansupari at the Native General Library buildings. The Mittra Samaj which is composed of all the gentry of the town did the same at the Samaj rooms. It is worth this while to observe that Mr. Prideaux was a member of this Samaj. The Deshpandes and Deshmukhs of the district held a similar Pansupari and expressed most clearly how greatly the people in the district of all grades and stations liked him for his goodness His sympathy for the poor and his anxious solicitude for them won him popular esteem and admiration and on the 27th. October he offered himself to be drawn in a photo amidst the very poor people who were dying for want of food and clothing during the famine days and who have to-day survived contentfully to earn a pleasant livelihood through his goodness. We have therefore great pleasure to congratualate Mr. Prideaux upon his popularity and goodness and we hope he will ever continue to be so wherever it may please God to station him. We wish him success in his career and pray that he be blessed with happiness and prosperity althrough his life.

---

## वऱ्हाड

मे० प्रीडो साहेब डेपुटी कमिशनर यांनीं गेल्या बुधवारीं या जिल्ह्याचा चार्ज मे० रुस्तुमजी फर्दूनजी साहेब यांस दिला. सध्यां ते मुंबईस गेले असून एक दोन दिवसांत वाशिमास जातील. त्यांच्या सन्मानार्थ येथील आफिसरानीं मेजवान्या, आणि गांवकऱ्यांनीं व जिल्ह्यांतील लोकांनीं पानसुपाऱ्या दिल्या.

अलिशान रेसिडेंट सर प्लौडन हे लवकरच परत हैदराबादेस येतील आणि मि. क्राफर्ड साहेब कमिशनरचे जागीं परत उमरावतीस येत्या आठवड्याच्या अखेरीला येतील असें ह्मणतात.

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं मौजे बांबर्डे येथील सर्वे नंबर २३ व ६८ आणि इसापूरचा सर्व्हे नंबर १४ आणि शिवाय इतर स्थावर जंगम इस्टेट कवेलू घर बैल जोडी वगैरे सुद्धा कोणीही पुंजाजी कडून विकत किंवा बक्षीस घेऊं नये. घेणारा जबाबदार राहील. कळावे. तारीख २८।१०।९८ इसवी.

( सही )

गोपी मर्द महादू तर्फे मुखत्यार
बापुजी वल्लद हबाजी काजगे
राहणार बांबरडी दस्तुर
खुद.

---

## वर्तमानसार

चीनच्या उत्तरभागांत रशियानें बरीच पुंडाई चालविली आहे. त्या अंगास मांचुरिया नांवाचा जो एक रेलवेचा रस्ता करण्याचा रशियाचा उद्योग चालू आहे त्या रस्त्याचे त्यानें चार भाग केले असून तो रस्ता पुरा करण्याची फार घाई चालविली आहे. त्यांतील एका भागाच्या कामावर तर आज ४०,००० माणसें खपत आहेत. इतक्या घाईने हा रस्ता तयार करून रशियास पुढें कोठें जावयाचें आहे कोण जाणे. रेलवे रस्ता पुढें नेणें ह्मणजे त्या पुढल्या भागांतला व्यापार आपल्या हातांत घेणें आहे व त्या करतांच रशियाचा हा उद्योग असावा.

रशियाचा परराज्यासंबंधी प्रधान पारीस येथें गेला असून फ्रान्सच्या प्रेसिडेंटाचें व याचें खलबत होत आहे. उभय सरकारांत कांहीं गुप्त करार झाला असेंही ह्मणतात. उभय सरकारांच्या दरम्यान जो जुना स्नेह आहे तो या करारानें ताजा झाला असेंही सांगतात. तिकडे जर्मन बादशहा टर्कीच्या सुलतानाच्या भेटीस गेला असून तिकडे त्याचा विलक्षण मान सन्मान व थाटमाट चालला आहे. या दोन्ही राजकीय खटपटींचा, क्रीट बेटाच्या संबंधानें चार राजांनीं सुलतानास जी नोटीस दिली आहे, त्याच्याशीं संबंध आहे असें ह्मणतात. त्या नोटीशीवर फ्रान्स, रशिया, इंग्लंड व इटाली यांच्या सह्या आहेत; आणि त्या बेटावरील सुलतानचा बादशाहीपणा कायम राखण्याची व त्यांतील मुसलमानांचें रक्षण करण्याची योग्य व्यवस्था करण्यापूर्वीं सुलतानास तशी नोटीस देणें अविचाराचें व जोखमीचें आहे अशा सबबीनें जर्मनीनें त्या नोटिशीवर सही करण्याचें नाकारलें व आस्ट्रियासही जर्मनीनें तसाच सल्ला दिल्यामुळें त्यांणेंही सही करण्याचें नाकारलें; आणि त्या कारणानेंच या खटपटी चालल्या असाव्या असें कित्येकांचें अनुमान आहे. जर्मन बादशहा व सुलतान यांच्या या भेटीबद्दल रशियास काळजी लागली आहे.

सेंटरल इंडिया हार्सच्या १ल्या रिसाल्याचे रिसालदार बाहदीनखान यांस चांगल्या कामगिरीबद्दल चिनाब कालव्याजवळ १२०० एकर जमीन व घर बांधण्यास पैसे असे सरकारानें दिले.

पिसाळलेल्या कुत्र्याच्या विषावर काळ्या धोतऱ्याचा फार चांगला उपयोग होतो असें सगळ्या हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे. या संबंधाची पुढीलप्रमाणें अनुभवसिद्ध एक गोष्ट नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. तो सांगतो कीं, पिसाळलेलें कुत्रें चावल्यापासून चाळीस दिवसांनीं तो माणूस पिसाळतो. कधींकधीं दोन किंवा तीन आठवड्यांच्या आंतही पिसाळतो. पूर्वीं हें औषध त्यास पोंचलें ह्मणजे बस होतें. कुत्रें चावल्यानंतर दोन आठवड्यांनीं या रोग्यास हा उपचार सुरू करावा. चावल्यापासून १५व्या दिवशीं सकाळीं समचासर चहांत चार्कोल लांकडाची पूड घालून त्यास द्यावी. नंतर अर्ध्या तासानें काळ्या धोतऱ्याच्या पानांचा एक औंस रस द्यावा. त्या रसानें वांती होते, जरी वांती होऊन तो रस पडून जाऊं नये ह्मणून वांती न होण्याचीं औषधें. नंतर त्या माणसानें पिसाळून दुसऱ्या माणसांस इजा करूं नये ह्मणून त्यास गच्च बांधून टाकावा आणि चार पांच तास उन्हांत ठेवावा इतकें झालें ह्मणजे तो माणूस पिसाळूं लागतो आणि पिसाळलेल्या कुतऱ्यासारखीं चिन्हें करूं लागतो. इतकें झालें ह्मणजे त्यास चावलेलें कुत्रें पिसाळलेलेंच होतें असें समजावें आणि तो माणूस खचित बरा होणार असेंही समजावें. हा इतका प्रकार झाल्यावर तिसऱ्या प्रहरीं त्याच्या डोक्यावर शेंकडों घागरी थंड पाणी ओतावें. या पाणी ओतण्यानें रोगी अगदीं त्रासून जातो व पाणी ओतण्याचें बंद करा असें आरडून ओरडून ह्मणूं लागतो. नंतर तो बरा झाला असें समजून पाणी ओतण्याचें बंद करून त्यास प्रथम थोडें व हलकें अन्न देऊन सावध करूं लागावें. कुत्रें चाऊन माणूस पिसाळण्यासारखें करूं लागल्यावर जर हा उपचार करावयाचा असेल तर वरील सर्व प्रकार करून त्याशिवाय धोत्र्याच्या पानांचा रस पोटांत देण्याच्या वेळीं दुसरें असें करावें कीं, रोग्याच्या डोक्याच्या पुढच्या आंगास—टाळवेत एक लहानशी जखम करून त्यांतून थोडें रक्त वगैरे वाहूं द्यावें आणि मग धोतऱ्याच्या पानांचा रस डोक्यास चोळून तो डोक्यांत जिरवावा ह्मणजे झालें.

जर्मन बादशहास ठार मारण्याचा यत्न केल्याबद्दल अलेक्झांड्रिया येथें ९ इटालियन लोक पकडले आहेत. केरो येथें त्या बादशहावर सोडण्याकरतां तयार केलेले दारूचे कित्येक बाण एकाच्या बिऱ्हाडांत सांपडले. त्या बादशहानें इजिप्त येथें जाण्याचा आपला बेत रहित केल्यावर आनर्किस्ट ह्मणजे राजघराण्यांचे विध्वंसक असे दोघे केरो येथून पालस्टाईन येथें जाण्यास गेले व ते अजून सांपडले नाहींत. ते रवाना झाले तसेंच बाणांनीं भरलेली एक पेटीही अलेक्झांड्रिया येथून पोर्ट सैड येथें रवाना झाली व ती अधिकाऱ्यांनीं पकडली.

चितगांग प्रांतांत जो धरणीकंप वगैरे झाला त्यांत झालेल्या नुकसानीचा नक्की तपशील आतां बाहेर आला आहे. कुतुबदिया व मोसकल या बेटांची लांबी रुंदी १९३ चौरस मैल असून त्यांत ८६,००० लोकवस्ती होती. त्यांपैकीं १४,००० माणसें व १९,००० गुरें ठार झालीं. घरादारांवाचून उघड्या पडलेल्या माणसांची संख्या वेगळीच आहे. या विपत्तींत सांपडलेल्या लोकांस मदत करण्याकरतां दुष्काळ फंडांतले ५०,००० रुपये दिले असून शिवाय वर्गणीनेंहि ७,६७४ रुपये जमले. या शिवाय त्या लोकांस पोसण्याकरितां ह्मणून जीं कामें सुरू केलीं त्याकरितां सरकारांतून १,१९,६३१ रुपये मंजूर केले आहेत. शेतकऱ्यांस १,३४,२९९ रुपयांची जमीनधाऱ्याची सूटही दिली.

सदरलंडची राणी पारिस येथें आगगाडींतून जात असतां त्यांचें अडीच लाखांचें जवाहिर चोरीस गेलें.

एक फ्रेंच मिशनरी व कांहीं चिनी बाप्ते यांस चिनी लोकांनीं मारून जाळलें ह्मणून फ्रान्सानें चीनच्या मागें धोशा लावला आहे.

फ्रान्सच्या लष्करी खात्यांत कांहीं फितुरा फितुरी झाली आहे, पण कच्चा तपशील अजून बाहेर येत नाहीं. लोकांनीं कट केल्याबद्दल ह्मणून पारीस येथें जी ४०,००० फौज जमा झाली आहे त्यांतच त्या फितुरीचें मूळ आहे असें ह्मणतात.

आमची पुढील कारकीर्द पाण्यांतली आहे असें जर्मन बादशहानें नुकतेंच एका प्रसंगीं बोलून दाखविलें. यावरून जर्मनी आपलें आरमार वाढविणार असें होतें अ०

रेल्वे करण्याची एतद्देशीयांस इच्छाः—खा. ब. हाजी सज्जनलाल नामक मुसलमान गृहस्थानें रायचूर पासून बंडाळी पर्यंत ६२ मैल रस्ता आपण करूं चाहतों, परवानगी असावी, ह्मणून निजाम सरकारांस अर्ज केला आहे, व्याजाची हमी वगैरे कांहींएक हा गृहस्थ मागत नाहीं फक्त जमीन मुफत द्या एवढेंच त्याचें मागणें आहे. पुढील आठवड्यांत या अर्जाचा विचार निजामच्या दरबारांत होणार आहे. जमीन मुफत देण्याला निजाम सरकारास खर्च किती येईल व निजाम सरकारास हिंदुस्थान सरकारच्या परवानगी शिवाय मंजुरी देतां येईल कीं नाहीं, हे दोनच प्रश्न विचाराचे आहेत.

अरिष्ट फीः—रेसिडेन्सी डाक्टर लारी यानां एका मुसलमान गृहस्थानें आपल्या घरीं बायको आजारी होती तिला पाहावयास बोलाविलें. डाक्टर साहेबांनीं शेख उमार यांजवर आपल्या भेटीची फी रुपये २ हजार ह्मणून बिल पाठविलें. शेख उमार यांनां ही अरिष्ट फी पाहून आश्चर्य वाटलें. त्यांनीं बील नाकारलें कोर्टा पर्यंत प्रकरण जाऊं पहात होतें, पण शेख उमार ८०० रुपये देतो ह्मणतात व तेवढ्यावर समजूत करून घेण्यास डाक्टर लारी तयार आहेत. पण रेसिडेंटाची मंजुरी डाक्टरांस अद्याप मिळाली नाहीं. ती मंजुरी देऊं नये असें हैद्राबादचें पत्र शिफारस करीत आहे!

असेंच सर्वत्र व सदा व्हावें:—जिल्हा रजिस्टर व सब रजिस्टरच्या पांच जागा खालीं आहेत त्या भरावयाच्या होत्या. गेल्या १० व्या तारखेस उघड परीक्षा घेऊन गुणानुसार जागा भरण्यांत आल्या. एकंदर उमेदवार आले त्यांत १० जण परीक्षा पास झाले. त्या दहा जणांपैकीं ८ मुसलमान व हरी नारायण व गणपतलाल हे दोघेच हिंदु होते. उघड परीक्षेंत भरलेल्या जागीं मुसलमान जास्त आले ह्मणून हिंदूला वाईट वाटण्याला मग जागा राहत नाहीं. ह्मणून परीक्षा उघड अशा घेऊनच जागा भराव्यात असा आमचा आग्रह आहे. क. त.

बंगाल नागपूर रेल्वेची सर्व मुख्य आफिसे कलकत्यास नेण्याचें ठरलें असून, या रेल्वेच्या कारखान्याचें मुख्य ठिकाण ( वर्कशॉप ) मिदनापूर येथें करण्यांत येणार आहे. याचप्रमाणें, जी. आय. पी. रेल्वे कंपनीची मुदत संपल्यावर सरकाराकडून ह्या सर्व लाइनचें काम आपल्याकडे घेण्याची खटपट बंगाल नागपूर रेल्वे कंपनी करीत आहे. तसें झालें ह्मणजे कलकत्यापासून मुंबई पर्यंत बिनहरकत गाड्या जाण्यायेण्यास अडचण पडणार नाहीं. तेणेंकरून लोकांची वेळ व खर्च पुष्कळच वांचणार आहे. आणि तसें झालें ह्मणजे मग जी. आय. पी. आर. हें नांव लुप्त होऊन तिला मुंबई-बंगाल रेल्वे कंपनी असें नांव देण्यांत येईल असें ह्मणतात सारांश. आतां बराच मोठा फेरफार रेल्वेच्या व्यवहारांत होण्याचा सुमार दिसत आहे; आणि मुंबई व कलकत्ता हे प्रांत एकमेकांत विशेष मिळून मिसळून जातील असें वाटतें.

हिंदुस्थानाशीं व्यापार वाढविण्याकरितां अमेरिकेची खटपट—हिंदुस्थान आणि यूनायटेड स्टेट्स् यांमध्यें थेट जाणाऱ्या आगबोटी आतापर्यंत नव्हत्या. पण आपल्या या देशाशीं असलेला व्यापार वाढविण्याकरितां यूनायटेड स्टेट्सनें आतां आगबोटींचे दोन दोन तोंड तयार केले आहेत. पैकीं एकाच्या आगबोटी अटलांटिक महासागरांतून जिब्राल्टर व सुएझ मार्गानें एडनला येऊन तेथून मुंबई, कोलंबो, मद्रास व कलकत्ता येथें जातील, व दुसऱ्याच्या आगबोटी पॅसिफिक महासागरातून जपान व चीनशी व्यापार करीत करीत हिंदुस्थानास येतील. दुसऱ्या तांड्यांतील आगबोटी जपानाशीं हिंदुस्थानचा असलेला व्यापारही बहुतेक आटोपतील असें दिसतें. आधींच जपानांत आजपर्यंत इकडील सुत वगैरे जात होतें तें बहुतेक बंद होऊन हल्लीं नुसता कापूस जात आहे. अमेरिकेनें आपला जपानाशीं हल्लीं असलेला व्यापार वाढविला ह्मणजे इकडील कापसाचें देखील गिऱ्हाईक नाहींसें होईल. हिंदुस्थानें थोडाबहुत फायदेशीर व्यापार परदेशांशीं चालविला आहे तो अजीबात बसला ह्मणजे इकडील लोकांस निव्वळ शेतीशिवाय दुसरा ह्मणण्यासारखा उद्योगच राहणार नाहीं. हिंदुस्थानचें नष्टचर्य अजून संपलें नाहीं हेंच खरें.

लखनौमध्यें एक स्त्री रस्त्यांत फिरत असे. तिणें भराभर मुठीच्या मुठी भरून लोकांस पैसे देत जावें. तिच्या भोंवतीं नेहमी पैसे मागणारांची अतिशय गर्दी जमत असे. तिणें भराभर त्याचे अंगावर पैसे फेंकीत जावें. असे कित्येक दिवस चाललें होतें. सदर बाई आतां कोठें नाहींशी झाली तिचा पत्ता नाहीं. असें तेथील अड्व्होकेट पत्रावरून कळतें. अड्व्होकेट पत्रांत सदर बाईचा पैसे वांटण्याचा चमत्कार अनेकांनीं प्रत्यक्ष पाहून आपल्यास कळविला आहे असें प्रसिद्ध झालें आहे.

पुणें. मानेवर डागणें व तिखट टाकणें.—ढमढेऱ्यांचे बोळांत राहणाऱ्या कोणा गोदुबाई उर्फ आनंदीबाई भ्रतार विष्णुपंत नेने नांवाच्या विधवा बाईनें. तिचे घरीं राहणाऱ्या मोरोपंत पटवर्धन नांवाच्या रेल्वेकडील नोकराचे सारजाबाई नांवाच्या १७ वर्षांच्या बायकोला तिणें विचारल्या वांचून घरांतील कांहीं पदार्थ खाल्ला ह्मणून, तिचे डोळ्यांत तिखट टाकून व लोखंडी पळी लाल तापवून तिणें तिचे मानेवर वगैरे डाग दिल्याबद्दल शहर मामलेदार रा. सा. रणसिंग यांचे समोर खटला चालू आहे. ज्ञा० च०

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे “वऱ्हाड समाचार” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.